
# श्री साईलीला



नोव्हेंबर-डिसेंबर दिवाळी अंक १९७७

किंमत १.२५ पैसे

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्रीसाई वाक्सुधा

मी तों सदा अविवेकी मूढ ।
आहे अविद्याव्यवधान निगूढ ।
बुद्धि सर्वदा कुतर्कारूढ ।
तेणेंचि हें गूढ पडलें मज ॥१२॥

गुरु वेदान्तवचनीं भरंवसा ।
ठेवीन मी अढळ ऐसा ।
करी मन जैसा आरसा ।
निजबोध ठसा प्रकटेल ॥१३॥

वरी सद्गुरो साईसमर्था ।
करवीं या ज्ञानाची अन्वर्थता ।
विना अनुभव वाचविग्लापनता ।
काय परमार्थ साधील ॥१४॥

म्हणोनि बाबा आपुल्याप्रभावें ।
हें ज्ञान अंगें अनुभवावें ।
सहज सायुज्य पद पावावें ।
दान हें द्यावें कृपेनें ॥१५॥

तदर्थ देवा सद्गुरुसाई ।
देहाहंता वाहतों पायीं ।
आतां येथून तुझें तूं पाहीं ।
मी पण नाहींच मजमाजीं ॥१६॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २६ वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] नोव्हें-डिसें. ७७ [ अं. ७-८

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# श्रीसाईलीला – अनुक्रमणिका

## १९७७ च्या दिवाळी अंकाचे मानकरी साईभक्त

१ श्री. एन. एल. हेबळीकर, मुंबई
२ डॉ. सुमती खानविलकर, लोनावळा
३ ,, शामसुंदर तेंडुलकर, पुणे
४ ,, श्री. दि. परचुरे, मुंबई
५ प्रा. र. श्री. पुजारी, पुणे
६ ,, एम. एम. अमीनगड, गुळंचे
७ श्री. ज. प्र. मिरीकर, एरंडवणा
८ ,, अ. ज. चितांबर, अहमदनगर
९ ,, मधुकर मी. देशपांडे, पुणे
१० सौ. उषा प्र. अधिकारी, रत्नागिरी
११ ,, अनिता अनंत नाईक, मुंबई
१२ श्री. रमेश डी. चव्हाण, नवापूर
१३ ,, उज्ज्वल कुलकर्णी, नंदुरबार
१४ ,, प्रकाश देवकुळे, सातारा
१५ ,, मनुभाई शहा, नवापूर
१६ ,, सूर्यकांत गर्जे, पुणे
१७ ,, शं. गं. सारंगधर, कांदिवली
१८ ,, ज. प्र. देशमुख, अहमदनगर
१९ ,, गजानन देशपांडे, पुणे
२० ,, विजय हजारे, बोरीवली
२१ सौ. लुसी गुप्ते, बडोदे
२२ श्री. स. मा. मुन्हार, नागपूर
२३ सौ. सरला गर्जे, पुणे
२४ श्री. सुरेश सातपुते, मुंबई
२५ सौ. विजयालक्ष्मी तावडे, अंधेरी
२६ श्री. एल. बी. गोलतकर, घाटकोपर
२७ सौ. विनिता डाहाके, अकोला
२८ श्री. नंदकुमार खेले, पुणे
२९ कु. शैला अं. सरोदे, दादर
३० श्री. मोहन शं. कुलकर्णी, कोल्हापूर
३१ सौ. अस्मिता क. दांडेकर, गिरगाव
३२ श्री. गुलाबराव देशमुख, पनवेल
३३ सौ. विमलादेवी, नागपूर
३४ श्री. अनिल रसाळ, वडाळा
३५ कु. प्रतिभा पाटील, कुरुळ
३६ श्री. शा. द. महाजन, नागपूर
३७ सौ. सुलभा ऋषी, रेनुकुट
३८ श्री. ए. पी. लवंदे, गोवा
३९ सौ. मालती रणदिवे, दादर
४० श्री. चकोर आजगावकर, बांद्रा
४१ ,, पु. वि. वावकर, भांडूप
४२ सौ. हिराबाई केरकर
४३ श्री. गणेश बर्वे, बडोदा
४४ श्री. शंकर पोटे, आर्वी
४५ कु. लीलाताई गोल्तकर, नागपाडा
४६ श्री. बापूसाहेब निरखे, इंदूर
४७ सौ. नलिनी नानोटी, नागपूर
४८ ,, शालिनी जोशी, सिकंदराबाद

❁ ओम श्री साई समर्थ ❁



❁ ओम श्रीसाई शरणम् मम् ❁

ही दीपावली व नूतन वर्ष
आमच्या सर्व साईभक्तांना
हितचिंतकांना, लेखक-कवींना
सुखाचे समृद्धीचे व भरभराटीचे
जावो ही श्रीसाई चरणी प्रार्थना

संपादक

# श्रीसाईभक्त स्वानुभव विशेषांक

श्रीसाईबाबाय नमः



श्रीसाईनाथाय नमः

श्रीसाईनंदाय नमः

बाबा कल्पतरु, सदाप्रियकरु, भक्तांकृपासागरु ।
बाबा दण्डधरु, खला सुखकरु योगी जनां शंकरु ॥
बाबा शार्ङ्धरु भवाब्धिपतिता सत्कर्ण धारु नरु ।
बाबा दत्तगुरु नमोमम तया सर्वेश्वरु सद्गुरु ॥

# भक्तांच्या स्वानुभवांचा आमच्यावर अक्षरशः वर्षाव

## संपादकीय—

स. न. वि. वि.

श्रीसाईलीला मासिकाचा हा खास दिपावली अंक आमच्या श्रीसाईभक्तांच्या हाती देण्यात आम्हास अतीव आनंद होत आहे. गेल्या चार वर्षापासून आम्ही दिवाळी अंक हा भक्तांना श्रीसाईबाबांच्या आलेल्या विविध सुखद व अवर्णनीय अशा अनुभवांचा असा काढीत आलो आहोत. सांगावयाची गोष्ट म्हणजे आमच्या या अंकाचे भक्तांनी, वाचकांनी किती अभूतपूर्व असे स्वागत केले आहे, हे अंक चाळताना सहजासहजी दिसून येईल. याबद्दल वेगळे सांगण्याची काही आवश्यकताच नाही. देशातल्या सर्व भागातून भक्तांनी मजकूर पाठवून श्रीबाबांच्यावरची आपली दृढ श्रद्धा व भक्ती प्रगट केली आहे. यंदा तर आमच्यावर स्वानुभवांचा अक्षरशः वर्षाव झाला. या वर्षावातून निवडक असे अनुभव या अंकात दिले आहेत. जागेच्या अभावी अनेक लेखांचा या अंकात समावेश करता आले नाही याबद्दल भक्तांनी आम्हाला क्षमा करावी. काही भक्त मंडळींनी तर लेख खूप उशिरा पाठविले तर काहींनी लेखनाचे नियम पुन्हा पुन्हा सांगूनही अजिबात पाळले नाहीत त्यामुळे त्यांचे लेख साहजिकच भाऊगर्दीत पाठीमागे पडले. असो, शिल्लक राहिलेले निवडक असे लेख यापुढील अंकातून प्रसिद्ध केले जातील.

### आमचे पुढील पाऊल

श्रीसाईलीलेच्या वर्गणीदारांचा हा चालू अंक वेष्टनावर त्यांचे नाव-पत्ता-ग्राहक क्रमांक इत्यादी माहितीने युक्त असा अत्याधुनिक ॲडमा प्लेटवर छापून रवाना होत आहे याबद्दल आनंद वाटतो. आतापर्यंत गेली ५५ वर्षे वेष्टनावर हाताने नाव-पत्ता लिहून अंक वर्गणीदारांकडे जात होता. श्रीसाईलीलेची ही प्रगती व पुढचे पाऊल पाहून कुणासही कौतुक करावेसे वाटेल परंतु या यशात सर्वस्वी श्रीसाई भक्तांचा वाटा आहे व श्रीबाबांचे शुभाशिष सदैव पाठीशी आहेत हे विसरून चालणार नाही.

श्रीसाईबाबांचे आपणास व आपल्या कुटुंबीयास दिवाळी मंगलसणाप्रित्यार्थ शुभाशिष !

# संकट निवारणारी अद्भुतशक्ति

# श्रीसाईबाबा

[ रिझर्व्ह बँकेचे जॉइंट चिफ ऑफिसर श्री. एन. एल. हेबळीकर, बी. ए. बी. कॉम. एल. एल. बी. यांना आलेले अनुभव.]

शब्दांकन—श्री. शं. दा. बर्डे,
असिस्टंट चिफ ऑफिसर रिझर्व्ह बँक, मुंबई
वैशाली, संत रामदास मार्ग, मुलुंड, मुं. ८१

● रिझर्व बँकेच्या, शेती–कर्ज खात्याचे, जॉइंट चिफ ऑफिसर, श्री. एन. एल. हेबळीकर हे श्रीसाईबाबांचे एकनिष्ठ भक्त आहेत. गेल्या पंचवीस वर्षाहून अधिक काळातील श्रीबाबांची त्यांची तपस्या अत्यंत तेजस्वी म्हणावी लागेल. त्यांच्या जीवनात श्रीसाईबाबांचे इतके अढळ श्रद्धास्थान निर्माण झालेले आहे, की कोणत्याही कार्याची सुरुवात बाबांचे स्मरण व चिंतन केल्याशिवाय होत नाही. बाबांची प्रतिमा असलेली अंगठी त्यांच्या उजव्या हाताच्या तर्जनी जवळच्या बोटात सदैव असते. त्याला ते स्पर्श करून बाबांचे 'सान्निध्य' साधतात. श्री. हेबळीकरांचे आयुष्य संपूर्ण 'बाबामय' झालेले आहे.

## पुट्टपारथीमार्गे पुन्हा शिरडी

मी लहान असता माझ्या मावशीच्या घरी बंगलोरला रहात असे. माझी मावशी ही शिरडीच्या साईबाबांची निस्सीम भक्त असल्याने तिच्या घरी बाबांची तसबीर होती. मी जेमतेम आठ वर्षाचा असेन. परंतु तेव्हापासून बाबांच्याबद्दल माझ्या मनात भक्तिभाव निर्माण झाला. नंतर माझ्या एका स्नेह्याच्या–श्री. जी. व्ही. राव यांच्या सहवासामुळे मी पुट्टपारथी ( आंध्र प्रदेश ) येथील श्रीसत्यसाईबाबांकडे वळलो. १९४६ ते १९५१ पर्यंतच्या काळात मी पुट्टपारथीला अनेक वेळा गेलो व मला अनेक अनुभव आले. पण एक दिवशी मला स्वप्नदृष्टांत झाला. त्यावेळी मी पुण्याला भांडारकर रोडवर रहात होतो. मी खोलीत झोपलो होतो. एकदम एक उजेडाची प्रभावळ कोपऱ्यात दृश्यमान झाली ! पहातो तर तेथे सत्यसाईबाबा उभे असल्याचे दिसले. त्यांनी हात आशिर्वादासाठी उचलला होता. अन् सत्यसाईबाबाच्या हृदयावर मात्र शिरडीच्या साईबाबांची प्रतिमा दिसली ! खरं म्हणजे मी दिङ्मूढ

झालो; गांगरून गेलो अन् काय करावे ते समजेना. भक्तिभावाने माझे हात आपो-आप जुळले गेले. तोच एक गंभीर वाणी माझ्या कानावर आली. "बेटा घाबरू नकोस. असं गांगरून जाण्याचं तुला काही कारण नाही. मला माहित आहे, माझ्या-वर तुझा विश्वास आहे. मी तुझे सदैव रक्षणच करीन. पण तुला शिरडी संस्थान जवळ असता मूर्खासारखा एवढया लांब पुट्टपार्थीला कशाला येतोस ! आम्ही दोघेही एकच आहोत. यापुढे तू शिर्डीलाच येत जा" एवढे बोलून श्रीसत्यसाईबाबा अंतर्धान पावले. मी आश्चर्यचकित झालो. कारण मी पुण्यालाच होतो !

तरीसुद्धा गंमत पुढे आहे. दुसऱ्या दिवशी गुरुवार होता म्हणून आईने श्रीसाईबाबांच्या तसबिरीपुढे प्रसादासाठी आंबा कापून ठेवला. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी एक आश्चर्यजनक घटना घडली. आंब्याच्या कापलेल्या दोन्ही फोडींवर सुरेख (आशीर्वाद देणाऱ्या श्रीसत्यसाईबाबांच्या) हाताचे ठसे उमटले होते. त्याचा मी फोटो घेऊन ठेवलेला असून जिज्ञासूंना मी दाखवू शकेन.

परंतु पुट्टपार्थीला जाऊन यावे असे मनात पुन्हा पुन्हा वाटायला लागले म्हणून दोन महिन्यांनी मातोश्री, मित्रमंडळी यांच्या समवेत मी पुट्टपार्थीला श्रीसत्यसाईबाबांच्या दर्शनाला गेलो. आश्चर्याची गोष्ट अशी की माझी आई, आजी वगैरेंना त्यांनी दर्शन दिले, परंतु मला मात्र त्यांनी टाळले. त्यांचे दर्शन व्हावे म्हणून मी सतत दोन दिवस प्रयत्न केले, पण ते निष्फळ झाले. मी अक्षरशः रडकुंडीला आलो. आणखी एक प्रयत्न फुकट गेल्यावर मात्र माझ्या अश्रूंना वाट करून देणं भाग पडले. मी एका कोपऱ्यात बसून रडत होतो. तेवढयात कुठूनतरी श्रीसत्यसाई-बाबा माझ्यापुढे प्रकट झाले. मी चक्रावून गेलो अन् माझा विश्वासहि बसेना. मी त्यांचे चटकन् पायच पकडले. त्यांनी मला ममतेने उठवले व माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हटले,

"तू का रडतो आहेस त्याचं कारण मला माहित आहे. तू येथे आलास म्हणून मी तुझ्यावर रागावलो नाही. तुला आठवतय मी तुला सांगितले की, पुट्ट-पार्थीला तू येण्याचे कारण नाही. तू शिरडीला जा. तेथे तुला माझे दर्शन होईल. मी शिरडीच्या साईबाबांचा अंश आहे.."

'बाबा, मला येथेच दर्शनासाठी येण्याची अनुज्ञा द्या. मला तुम्ही प्रत्यक्ष –मानवी स्वरुपात भेटता व मी तुमच्याशी बोलू शकतो. म्हणून मला येथे यावेसे वाटते' मी बाबांना गळ घातली. पण ती त्यांनी मान्य केली नाही. इतकेच नव्हे तर त्यानंतर मी पुट्टपार्थीला तीनचार दिवस ठिय्या करून राहलो, तरी त्यांनी मला दर्शन दिले नाही. माझी आई व आजी यांना

मात्र ते दर्शन देत असत. मी निराश होत्साता पुण्याला परत आलो. नंतरसुद्धा परत एकदा पुट्टपार्थीला जाऊन श्रीसत्यसाईबाबांचे दर्शन घेण्याचा प्रयत्न केला परंतु तोसुद्धा व्यर्थ गेला. 'माझे मूळस्थान शिरडी आहे. त्या मूळस्थानाला तू जा' ही श्रीसत्यसाईबाबांची आज्ञा मला शिरसावंद्य मानावीच लागली. अन् माझा परमप्रिय मित्र, श्री. जी. व्ही. राव (त्याला आम्ही प्रेमाने 'गोपू' म्हणतो) याच्या सल्ल्यानुसार मी १९५१ साली शिरडीच्या श्रीसाईबाबांचे दर्शन घेतले ! अशा प्रकारे मी पुट्ट-पार्थीमार्गे परत शिरडीला आलो ! १९५१ नंतर मात्र पुट्टपार्थीला कायमचा रामराम ठोकला. आता माझं दैवत शिरडीचे श्रीसाईबाबा ! माझा साई दयासिंधू, दीन अनाथांचा बंधू ।।

## ॥ यमयातनांमधून सुटका–साईकृपा ॥

आता शिरडी हेच माझे जीवनसर्वस्व झालं आहे. स्नान झाल्यावर मी रोज ' स्तवनमंजिरी ' म्हणतो. मला श्रीसाईबाबा सर्वत्र दिसतात. माझ्या संकटसमयी ते धावून येतात व मला संकटमुक्त करतात, माझे दुःखापासून संरक्षण करतात. त्याबाबतीतल्या अनेक अनुभवांपैकी शारीरिक दुःखाशी [संबंधित एक अनुभव साईभक्तांच्या माहितीसाठी मी सांगतो. मध्यंतरी मला पाठीच्या मणक्यांचे दुखणे झाले होते. हे दुखणे अत्यंत विकोपाला गेलं होतं. मला धड बसतासुद्धा येत नव्हतं. जीवनाला मी अगदी कंटाळून गेलो होतो. पुण्यातील डॉ. कोयाजी, डॉ.मोदी अशा ख्यातनाम धन्वंत-ऱ्यांच्या औषधोपचाराचा काहीसुद्धा परिणाम माझ्या दुखण्यावर झाला नाही. एक्स-रे काढले. शरीरातील कॅलशियमची त्रुटी भरून काढण्यासाठीहि औषधोपचार केले. पण मज्जारज्जूंना जे दुखणे झाले होते, त्यात काही उतार पडला नाही. कदा-चित् हाडांचा क्षय असावा, इतक्या टोकापर्यंत रोगनिदान होऊन त्यानुसार ट्रीटमेंट दिली. पण व्यर्थ ! मनात मला विचार आला की, मी साईभक्त असून असा त्रास का व्हावा ? पण माझ्या अंतर्मनाने उत्तर दिलं की, कदाचित् बाबा तुझ्या सहनशक्तीची परिक्षा घेत असतील. काही का म्हणाना, परंतु पाठीच्या मणक्याच्या दुखण्यामुळे मी बेजार होऊन गेलो होतो. शेवटी मी निर्णय घेतला व माझ्या मातोश्रींना बरोबर घेऊन शिरडीला गेलो. श्रीसाईबाबांचे रोज चिंतन करावे, पाण्यात उदी टाकून आंघोळ करावी, बाबांचा दर्शन–प्रसाद घ्यावा व संबंध दिवस बाबांच्या ध्यानधारणेत घालवावा असा उपक्रम सुरू केला. हा उपक्रम चांगला सात-आठ दिवस सतत चालू ठेवला. अन् एके दिवशी मध्यरात्री चमत्कार घडला. मी एकदम जागा झालो अन् माझ्या पाठीची सर्व हाडे मोडावी असा कडड्कड्ड आवाज झाल्याचा भास मला झाला. मी घाबरून आईला झोपेतून उठवले आणि तो प्रकार निवेदन केला. तेव्हा

आईने उभं रहायला सांगितलं आणि तुम्हांला आश्चर्य वाटेल पण माझ्या पाठीचे दुखणे त्या क्षणी संपूर्णपणे बरे झाल्याचे मला जाणवले. या घटनेला सुमारे वीस वर्षे होऊन गेली असून त्यानंतर माझी पाठ कधीच दुखली नाही. हा श्रीसाईबाबांचा कृपा–प्रसादच मी मानतो.

## मृत्यूच्या कराल दाढेतून सुखरूप–साईप्रसाद

असाच माझ्यावर एक अत्यंत कठीण प्रसंग आला होता. ही भीषण घटना २१ फेब्रुवारी १९७६ रोजी घडली त्यावेळी मी बंगलोरला कनिंगहॅम रोडजवळ रहात होतो. माझी अॅंबेसॅडर गाडी मी नवीन घेतली तेव्हा शिरडीला जाऊन श्रीबाबांचे दर्शन घेऊन आलो होतोच. लांब पल्ल्याचा तो पहिलाच प्रवास मी अॅंबेसॅडरने केला. तेव्हापासून सुमारे ११ वर्षं मी गाडी चालवीत असल्याने मला कोणी नवखा ड्रायव्हर म्हणणार नाही. तसेच मी कायद्याचे पालन करणारा नागरिक असल्यानं, रहदारीचे सर्व नियम पाळतो. असं असतां देखील २१ फेब्रुवारी १९७६ रोजी (शनिवार होता तो दिवस ) मी ऑफिसमधून परतत असता, कनिंगहॅम रोड-जवळील सर्कलजवळ माझ्या गाडीवर दुसरी गाडी उजव्या बाजूने येऊन आदळली. मला क्षणभर काहीच उमगलं नाही. माझ्या गाडीवर दुसरी गाडी आदळल्यामुळे माझी अॅंबेसॅडर तीन वेळा चक्राकार फिरली. गाडीच्या आत हॅन्डलजवळच्या जागेत मी श्रीसाईबाबांचा फोटो (मॅग्नेटिक) लावलेला आहे. त्या फोटोकडे मी पाह्यलं व श्रीबाबांचा धावा मनात सुरू केला. एवढयात माझ्या गाडीचा दरवाजा उघडला गेला अन् मी रस्त्यावर फेकला गेलो. नंतरचे मला आठवत नाही, परंतु डोळे उघडून पाह्यलं, तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये असल्याचं मला समजलं. त्या भीषण अपघातातून मी वाचलो. माझ्या डोक्याला टाके घालावे लागले. खरं म्हणजे मृत्यु समोर टाकला होता. परंतु माझी अशी मनोधारणा आहे की श्रीसाईबाबांच्या कृपाप्रसादामुळे मी मृत्यूच्या कराल दाढेतून वाचलो ! मनोमन मला वाटतं की आजच्या वैभवाप्रत मी पोहोचलेलो आहे, ते केवळ माझ्यावर श्रीबाबांचा वरदहस्त आहे, त्यामुळेच. म्हणून म्हणतो–

माझा साई दयासिंधू । दीन अनाथाचा बंधू
संकटात घेई धांव ।। त्याचे चरण धरितां ।।

मला स्वतःला वाटतं की, श्रीसाईबाबा ही संकट निवारण करणारी एक अद्भुत शक्ति आहे. माझे त्या शक्तीला कोटी कोटी प्रणाम.

# श्री साईबाबा दत्ताचा अवतार आहेत

—डॉ. सौ. सुमती खानविलकर,
लोनावळा

● माझा नातू राहूल हा अडीच वर्षाचा असताना त्याला सतत १५ दिवस संध्याकाळी ताप भरे व पहाटे उतरू लागे. दिवसभर चांगला असे. खाणे पिणे कमी झाले. अशक्त झाला. औषधोपचार चालू होते काहीच उपयोग होत नव्हता.

एक दिवस माझी मैत्रीण डॉ. इंदू नाईक यांच्या मनात आले की, आपण श्रीबाबांना दत्ताचा अवतार समजतो तर त्यांनाच सांगू बाबा औषधाचा उपयोग होत नाही. आम्हाला तुमच्याशिवाय कोणी नाही. तरी गाणगापूरला जशी कोणतीही भूतबाधा अगर अन्यप्रकारे होणारा त्रास नाहीसा होतो व त्या माणसाला पूर्ण आराम मिळतो तरी आज मी तुमचे स्मरण करून तुमची उदी त्याला लावते व पाण्यातून पिण्यास देते. जर अंगचा रोग असेल तर ताप नेहमीपेक्षा जास्त भरू दे व दिवसापण राहूदे आणि भूतबाधेसारखी गोष्ट असेल तर मात्र ताप १२ च्या आत उतरून तो खाण्यापिण्यास लागू दे व स्वतःच्या तोंडाने खाण्यास मागू दे.

त्या दिवशी रात्री अकरा वाजता तो उठला व कॉफी मागू लागला. मी व इंदूने ताप पाहिला. ताप९८° होता. लगेच मी उठले व त्याला घेऊन देवखोलीत गेले आणि सुनेला कॉफी करण्यास सांगितले. तोपर्यंत तो चांगला जागा झाला होता. मी म्हटले. राहूल बाबांना नमस्कार करा.

काय आश्चर्य तो माझ्या जवळून उतरला व मोठ्याने किंचाळला आणि मोठमोठ्याने ओरडू लागला. विचित्र हातवारे करून देवापुढे नाचू लागला. त्याला आम्ही शांत करण्यासाठी प्रयत्न करत होतो पण तो चार-पाच जणानासुद्धा ऐकत नव्हता. कुठून एवढी ताकद त्याला आली होती कोण जाणे ! सव्वाबारा नंतर थोडे थोडे प्रमाण कमी होऊ लागले. साडेबाराला तर तो निपचित पडला. आम्ही घाबरूनच गेलो. ताप उतरला. काय करावे समजेना श्रीबाबांची करुणा भाकली आणि त्याला मांडीवर घेतले. राहूल कॉफी देवू का ? पाणी पितोस का ! सर्वजण गांगरून गेले होते. इतक्यात तोच मला म्हणाला, आई मला कॉफी देना ! लगेच कॉफी दिली. स्वतःच्या हातानी प्यायला. खेळला आणि पहाटे पहाटे झोपला. सकाळी उठला तर अगदी तापाचा, अशक्तपणाचा त्याच्या तोंडावर लवलेशही नाही. त्या दिवसापासून तो अगदी व्यवस्थित आहे. ताप पळाला. अशी आहे बाबारुपी दत्तगुरुची किमया-

श्रीदत्तगुरु बाबा साई तुजवाचूनी मज आश्रय नाही. *

# आशीर्वादाचा देखता हात
# शांती सबूरी उमटली मन्मनात

● तारीख ११–८·७७ ला सकाळी माझ्या मुलीचे (सुप्रभाचे) लग्न होते लग्न मुंबईत डोंबिवली मुक्कामी करण्याचे ठरले. यशवंतराव विचारे हे आमचे मोठे जावई, त्यांच्याकडे आम्ही ८ ऑगस्ट ७७ ला रहाण्यास गेलो. तेथे गेलो तर मोठ्या मुलीने माझ्या हातात चिठी दिली. ती तिच्या मिस्टरांनी लिहिली होती. चिठीत पुढील मजकूर होता :माझी आई अत्यवस्थ असल्याचे पत्र आले व आता तार आली आहे. तरी मी वरवडे येथे जात आहे. तरी लग्न उरकून घेणे. मन एकदा बेचैन झाले. कारण त्यांनीच सर्व कार्याची जबाबदारी घेतलेली तेच या लग्नाला नाहीत. त्यांच्याच घरी लग्नसोहळा व घरचे वातावरण चिंताग्रस्त काय करावे काही सुचेना. भांबावून गेले. लग्न पुढे ढकलावे तरी योग्य नाही व करावे तर घरात प्रसन्न वातावरण नाही. काही सुचेना. मन गांगरून गेले इतक्यात माझ्यासमोर श्रीबाबांच्या आशीर्वादाच्या हाताचा फोटो होता. त्याच्याकडे लक्ष गेले व मन एकदम भरून आले डोळयातून पाणी वाहू लागले माझी आई म्हणाली, अग असे तूच हातपाय गाळलेस तर कसे होईल. मी श्रीबाबांच्याच छबीकडे पहात होते. तो आशीर्वादाचा हात पाहून डोळे आपोआप मिटले गेले आणि मनाला एकदम समाधान, धीर, आल्यासारखे वाटू लागले व थांब मी आहे ना असा त्या हातातून संदेश मिळाला. दुःखाश्रूंच्या ठिकाणी आनंदाश्रूंनी जागा घेतली. मी मनातल्यामनात बाबांना माझी अडचण सांगितली.

बाबा, ज्यांच्या घरी लग्न त्यांची अशी परिस्थिती. लोक काय म्हणतील? ज्यांनी कार्याचा सर्व भार आनंदाने स्वीकारला तेच या लग्नसोहोळयाला हजर नाहीत. घरात चिंतेचे वातावरण ! बाबा तुम्हीच रखवाली. बाबा त्यांच्या आईची चोवीस तासात खुशाली कळू दे व ते लग्नाला हजर राहू देत. मजा पाहायला सारे आहेत. हात द्यायला कोणी नाही. बाबा तुमच्या या हाताचा मी मनोमन आज किती वर्षे हाच अर्थ धरला आहे की, थांब घाबरू नकोस. माझ्या भक्ताच्या संकटसमयी मी धावून येणारच काही काळजी करू नकोस. मनाचा गेलेला तोल बराच सावरला गेला.

दुसऱ्या दिवशी आम्ही सगळे विचार करत बसलो असताना एकाएकी तारवाला आला पण कोणीच ती तार घ्यायला व ती फोडायला तयार होईना. शेवटी

जिचे लग्न होते त्याच मुलीला मी म्हटले, घे बाबांचे नाव नि फोड तार. आतापर्यंत बाबांनी नाना तऱ्हेने आपल्याला मदत केली मग आताच काय टाकणार आहेत आपल्याला. तिने मग विश्वासाने तार फोडली आणि काय आश्चर्य त्यात त्यांच्या आईची तब्बेत थोडी थोडी सुधारत आहे. लग्नाच्या दिवशी सकाळी मी येतोच. सुप्रभाला सांगणे मी लग्नाला हजर आहे. त्याप्रमाणे ते लग्नाला हजर राहिले. या हातापासून मी सबूरी व विश्वास हे शिकले.


प्रदर्शन ! प्रदर्शन ! प्रदर्शन !!

**भगवान श्रीसाईबाबांच्या छायाचित्रांचे व**

**सर्व भाषेतील प्रकाशित श्रीसाई साहित्याचे अपूर्व प्रदर्शन**

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथी निमित्ताने शिरडी येथे नोव्हेंबर महिन्यात दिनांक १४ ते २१ तारखेपर्यंत एक भव्य प्रदर्शन भरविण्यात येत आहे. या प्रदर्शनात श्रीसाईबाबांची आतापर्यंत उपलब्ध असलेली सर्वप्रकारची लहान मोठी व रंगीत छायाचित्रे तसेच आतापर्यंत प्रकाशित झालेली लहान मोठी सर्व भाषेतील श्रीसाईबाबांच्या वरील पुस्तके, ग्रंथ आणि विविध भाषेतील नियतकालिके यांचा प्रामुख्याने समावेश असेल. हे प्रदर्शन आठवडाभर केवळ भक्तांसाठी खुले ठेवण्यात येईल. पुढे हेच प्रदर्शन सवडीने दादर येथे भरविण्यात येईल.

या भव्य व अपूर्व प्रदर्शनात ज्या साई भक्त लेखकांना आपल्या साहित्य कृती ठेवायच्या असतील त्यांनी आपापल्या साहित्याच्या दोन प्रती संपादक श्रीसाईलीला, साई निकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई, ४०००१४ या पत्त्यावर ५ नोव्हेंबर १९७७ पर्यंत रवाना कराव्यात. या प्रदर्शनात विक्री मात्र करण्यात येणार नाही.

—कार्यकारी संपादक श्रीसाईलीला.

# श्रीबाबांनी मला गीता शिकविली !

—डॉ. श्यामसुन्दर शंकर तेंडुलकर,
जुना २९१/नवा ७१० सदाशिव पेठ, पुणे ३०

● श्रीबाबांच्या हयातीत त्यांच्या दर्शनाचा योग मला लाभला नाही. त्यांनी देह ठेवला तेव्हा मी अवघा अकरा वर्षांचा होतो, आणि तरीहि मी म्हणतो, "बाबांनी मला गीता शिकविली !" हीच तर बाबांची लीला !

काळ पुढे जात असला तरी गीता तत्त्वज्ञान आणि संतांची शिकवण यासारख्या गोष्टी त्रिकाल बाधीत असतात. हेच तर चिरंजीवित्व !

बाबांचा भक्त म्हणून घेण्याचीसुद्धा माझी पात्रता नाही. पण गेली पंचेचाळीस वर्षांपासून बाबांचे प्रेम माझ्यावर आहे आणि ते जागृत आहे. ही गोष्ट मी विसरू शकत नाही. अशाच प्रेमरज्जुने श्रीबाबांनी मला आपल्या पायाशी बांधून घेतले आहे.

'श्रीसाईलीला' मासिकाच्या एकाही संपादकांशी माझी तोंडओळखसुद्धा नव्हती. आजही नाही ! माझे लेख व पत्रव्यवहार हीच आमची जानपछान. त्याकाली श्रीसाईलीलेची परिस्थिती कठीण होती. ती चालू ठेवणे मुष्कील झाले होते. अशी ही लीलेची एकादशी आणि इकडे माझी होती शिवरात्र. मी लीलेचा वर्गणीदार सुद्धा होऊ शकत नव्हतो. एकतर कठीण परिस्थिती आणि दुसरे लीलेविषयी मला आकर्षण नव्हते. अशा पेचातच श्रीबाबांनी आमचे गाठोडे बांधले मला वेठीला धरून लेख लिहविले आणि 'सुमनसुंदर' या टोपण नावाखाली ते 'लीले'तं प्रसिद्ध करविले. ही मोट बाबांनी बांधली नसती तर 'लीला' माझ्या वाचनात आली नसती व बाबांची गीता शिकवण मला लाभली नसती ! बाबांचे प्रेम माझ्यावर आहे असे मी म्हणतो ते या अनुभवाने !

त्यावेळी श्रीसाईलीलेच्या एप्रिल-मे-जून १९४३ या जोडअंकात गीतेविषयी श्रीबाबांनी भक्तावर कै. नानासाहेब चांदोरकर यांना पुढील बोध केल्याचे माझ्या वाचनात आले.

'धर्मक्षेत्रे' 'कुरुक्षेत्रे' समवेता युयुत्सवः ॥
मामकाः पाण्डवाश्च किंमकुर्वत संजय ॥

भ. गी. १–१

सर्वसामान्य उपेक्षित अशा या श्लोकाबद्दल बाबा म्हणाले, "यातील 'धर्म-क्षेत्र', 'कुरुक्षेत्र' 'मामक' व 'पाण्डव' या चार शब्दांचा अर्थ जो समजून घेईल त्यालाच गीता कळली!" आणि हे वाचताच माझ्या विचाराना चेतना मिळाली व 'नामांचा पाठ' हा माझा त्यावरील लेख पुढे प्रसिद्धही झाला.

या चार शब्दांचा मला झालेला बोध थोडक्यात असा : "आपला देह हा धर्मसंरक्षणाचे 'धर्मक्षेत्र' व कर्मयोगाची 'कुरुक्षेत्र' आहे. त्यात जीवात्म्याला अहंममतेच्या पाशात गुंतवून ठेवणारी जीवात्म्याची मायिक (मामक) उपाधि व याला स्वरुपानुसंधान साधून देणारी 'सोऽहं' रूपी 'आत्मिक' उपाधि यांचे रणकंदन अखंड चालू आहे व सद्‌गुरुरूप कृष्णपरमात्म्याच्या सारथ्याने 'मायिक' उपाधिचा संपूर्ण पराजय करुन 'आत्मिक' उपाधिला विजय मिळविणे-जीवनमुक्त होणे. हेच प्रत्येकाच्या जीवनाचे सार्थक आहे."

उपेक्षित अशा अवघ्या चार शब्दांकडे लक्ष वेधून श्रीबाबांनी केवढी शिकवण दिली, आणि हा अनुभव आज पुनः नव्याने सांगण्याचे कारण, नुकतेच गीतातत्व-ज्ञानावरील एक निबंध लिहिताना मला याच शिकवणीचा आधार लाभला व तसा तो घेताना श्रीबाबांनी त्यात आणखी बोध करून-दिला की, "गीता तत्त्वज्ञान-रूपी वृक्षाचा पहिला श्लोक हा बीजांकूर आहे, तर शेवटचा श्लोक त्या ज्ञानवृक्षाला लाभलेले 'अमृतफळ' आहे तो श्लोक असा:–

"यत्र योगेश्वरो कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयोभूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥"

अध्यात्माचा हलका फुलका बोध करून श्रीबाबा आत्मज्ञानाची ज्योत प्रज्वलित करतात ती अशी! ❋

श्री. सदानंद चेंदवणकर यांचे चव्वेचाळीसावे पुस्तक
'बच्चोंके साईबाबा'
मूळ मराठी लेखक : कै. प्रा. द. दि. परचुरे
हिंदी अनुवाद : सदानंद चेंदवणकर
किंमत ७५ पैसे
प्राप्तीस्थळ — साईनिकेतन, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.

# श्रीसाईबाबांचे अज्ञात संकेत

—डॉ. श्रीराम दिनकर परचुरे

कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला (इंग्रजी आवृत्ती)
गजानन भुवन ..सखाराम कीर रोड मुं. नं. १६

● आपल्या एकनिष्ठ भक्तांची काळजी देव सतत वहात असतो व त्यांच्यासाठी तो वाटेल ते कष्ट सोसतो. भक्त दामाजीसाठी पंढरीच्या विठोबाने महाराचे रूप घेतले व बादशहाला जोहार केला. भक्त जनाबाईसाठी परमेश्वराने दळण-कांडण केले. भक्त एकनाथांच्या घरी परमेश्वर श्रीखंड्याच्या रूपाने येऊन राहिला व त्यांच्या घरी चंदन उगाळणे व पाणी भरणे ह्यासारखी कामे त्याने केली. ही उदाहरणे लक्षात घेऊनच पुढच्यासारखी गाणी काही कवींनी रचली असावीत. "भक्तांचिया कामासाठी सोडली मी लाजरे" "साधूंचिया प्रेमासाठी सोडलीच लाजरे" जी गोष्ट ईश्वराची तीच गोष्ट साधुसंतांची त्यांनाही भक्तांची फार फार काळजी असते. आपल्या एकनिष्ठ भक्तांसाठी ते सतत प्रयत्न करीत असतात. "तुम्ही माझी आठवण करा म्हणजे मलाही तुमची आठवण राहील व तुमच्या कामासाठी मी सदैव तुमच्या पाठीशी-उभा राहीन" "जरी मी ह्या नाशिवंत शरीराचा त्याग केला, तरी माझी हाडे माझ्या समाधीतून तुमच्याशी बोलतील आणि तुम्ही बोलवाल त्यावेळी मी तुमच्या मदतीला धावून येईन" अशा प्रकारची बाबांची वचने भक्तांच्या अनुभवातून नेहमी दिलेली असतात आणि ह्या वचनांची पूर्ति करण्यासाठी बाबा कसे झटत असतात ह्याची वर्णने भक्तांच्या अनुभवात केलेली असतात. मला ह्या बाबतीत जो अनुभव अगदी अलीकडे आला तो मी पुढे देत आहे. त्यावरून आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी श्रीसाईबाबा कसे झटत असतात व आपल्या सामान्यजनांना व कळणाऱ्या अशा त्यांच्या व्यवस्था कशा चालू असतात, ते सर्व भक्तांस कळेल आपल्या हयातीत श्रीबाबांनी जी आश्वासने आपल्या भक्तांना दिली होती ती पाळण्यांत श्रीबाबा अजून किती दक्ष आहेत हेही स्पष्ट होईल.

दि. २६ सप्टेंबर १९७७ च्या सकाळी दाढी, मिशा वाढविलेला सुमारे पन्नाशीचा एक गृहस्थ माझ्याकडे आला, चौकशी करता असे कळले की, माहीम येथील एक साईभक्त श्री. नंदवाणी ह्यांचेकडून ते माझ्याकडे आले आहेत. 'आपले काय काम आहे' असे विचारता आलेल्या गृहस्थानी पुढील खुलासा केला, 'माझे नाव व्हिक्टर

ॲलबी. मी एक साईभक्त आहे. माझे मूळ गाव केरळात असून सध्या मी चंदीगढ येथे रहातो. हल्ली मी शिरडीला होतो तेव्हा मला बाबांची आज्ञा झाली की, 'त गुरुचरित्राचे पारायण कर माझ्या धंद्यानिमित्ताने जरी मला बऱ्याच भारतीय भाषा कळतात व बोलताही येतात, तरी मला इंग्रजीशिवाय अन्य कोणतीही भाषा वाचता येत नाही. तेव्हा गुरुचरित्राचे पारायण मी कसे करणार ? पण श्रीबाबांची आज्ञा केव्हाही अयोग्य असणार नाही. चौकशी करता मला कळले की, श्रीगुरुचरित्राचे इंग्रजी भाषांतर श्रीसाईलीला मासिकात अलीकडे प्रसिद्ध झाले आहे. तेव्हा त्याच लेखाचे पारायण करण्याचे मी ठरविले व माझे मित्र व परम साईभक्त श्री. नंदवाणी ह्यांचेकडे ते अंक मिळतील, म्हणून मी त्यांचेकडे गेलो; परंतु १९७५ सालचे अंक त्यांचेकडे आता नसल्याचे त्यांनी सांगितले व आपणाकडे गेल्यास आपण ते मला मिळवून द्याल असा विश्वास व्यक्त करून त्यांनी मला आपणास भेटण्यास सांगितले आहे तेव्हा आपणास अशी विनंती आहे की ते अंक आपण मला देण्याची व्यवस्था करावी. दोनचार दिवसात माझे काम होईल व ते सर्व अंक मी आपणास परत करीन.'

श्री. व्हिक्टर ह्यांची वरील विनंती ऐकताच साईबाबांची अतर्क्य लीला पाहून माझ्या डोळयात आनंदाश्रु उभे राहिले व श्रीसाईबाबा आपल्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यासाठी सर्व सूत्रे पडद्यामागून कशी हलवून ठेवीत असतात हे पाहून अचंबा वाटला. आपल्या साईलीला मासिकाची इंग्रजी आवृत्ति १९७४ सालापासून रा. मालवणकर बंधूंच्या मराठा प्रिंटिंग प्रेसमध्ये छापण्यात येते. हे श्रीसाईबाबांचे काम म्हणून साईभक्त मालवणकरबंधू प्रेमाने व भक्तीने करीत असतात. त्यांचा प्रेस नायगाव क्रॉस रोडला आहे व मासिकाची मुद्रिते तपासण्यासाठी त्यांच्या छापखान्यात महिन्यातून सुमारे पंधरा दिवस तरी मला तेथे जावे लागते. सर्व छापखान्यांच्या पद्धतीप्रमाणे रा. मालवणकरबंधूहि मासिकाच्या दोन चार प्रति जास्त छापतात व त्या आपल्याकडे ठेऊन देतात. येणारे जाणारे कोणी साईभक्त त्यापैकी काही केव्हा उचलून वाचण्यासाठी नेतात व पूर्वीचे काही संदर्भ पहावयाचे झाल्यास मलाही त्यांचा उपयोग होतो. अलिकडे तीन वर्षांचे बरेच अंक त्यांच्या छापखान्यात साठल्यामुळे व एका गृहस्थांनी त्यातील काही अंक मागितल्यामुळे, माझा त्या मासिकावरील पहिला हक्क मान्य करून, मालवणकरबंधूंनी मला सांगितले की, "तुम्हाला ह्यातील काही अंक पाहिजे असल्यास पहा, नाहीतर पूर्वीच्या वर्षांचे अंक आम्ही एका गृहस्थांना देऊन टाकणार आहो." साईलीला मासिकाचा कार्यकारी संपादक म्हणून मी गेली सुमारे चार वर्षे काम करीत आहे, तरी ते अंक

बांधून घेऊन आपल्या संग्रही ठेवावे असे मला वाटले नव्हते; कारण तसे ते शिरडी संस्थानच्या कार्यालयात शिरडी येथे व दादर येथील साईनिकेतनमध्ये ठेवलेले असतातच! परंतु मालवणकर बंधु बाइंडिंगचे कामही छापखान्यापुरते करतात हे पाहून मी ठरविले की ही, एक संधी सहज आली आहे, तर मिळतील तेवढे अंक बांधून घेऊन आपल्याकडे ठेवावे. म्हणून मालवणकरबंधूंच्याकडे मिळालेल्या अंकातून १९७५ व १९७६ ह्या दोन वर्षांचे अंक एकत्र करून ते बांधण्यासाठी मी केवळ तीनच दिवसांपूर्वी त्यांचेकडे देऊन ठेवले होते.

श्री. व्हिक्टर माझेकडे येऊन नेमक्या १९७५ च्याच अंकाची मागणी करू लागले आणि मला बाबांच्या अतर्क्य लीलेचा अचंबा वाटला! "बाबा एक भक्त मी तुझ्याकडे पाठविणार आहे. त्याला १९७५ सालचे अंक लागणार आहेत, तरी ते एकत्र करून ठेव." अशी आज्ञाच जणु काही बाबांनी मला दिली होती व केवळ श्री. व्हिक्टर माझ्याकडे येण्यापूर्वी तीनच दिवस हे काम माझेकडून करून ठेवविले होते. तसा मालवणकर बंधूच्या छापखान्यात मी गेली तीन वर्षांहून अधिक काळ जात आहे; परंतु मासिकाचे अंक मात्र करून ठेवून बांधून घेण्याचे माझ्या मनात फक्त तीन दिवसापूर्वीच का यावे? "भक्तांचिया कामासाठी" अशी ही संतांची लीलाच म्हटली पाहिजे दुसरे काय?

श्रीबाबांची लीला येथेच संपत नाही. श्री. व्हिक्टर ह्यांना घेऊन मी मालवणकर बंधूंच्या छापखान्यात गेलो व तेथील मासिकांचे १९७५ सालचे एकत्र करून ठेवलेले अंक त्यांना दिले. तेवढ्यात सुटकेचा निःश्वास टाकीत श्री. मालवणकर मला म्हणाले, "काय, तुम्ही आफिसमध्ये (साईनिकेतन) जाऊन आलात? आत्ताच ऑफिसमधून फोन आला होता." त्यांनी पुढे सांगितले की, दि. ९–१०–७७ ला किंग जॉर्ज हायस्कूलमध्ये साईभक्तांचे एक सम्मेलन भरणार आहे व त्याची माहिती मासिकात द्यावी असे दूरध्वनीद्वारा सुमारे अर्ध्या तासापूर्वी आम्हाला सांगण्यात आले. तेव्हा तुम्हाला हे कसे कळवावे ह्याच विवंचनेत मी होतो. तुम्ही आलात ते फार बरे झाले. ही बाबांची आणखी एक अतर्क्य लीला! व हाच त्यांचा एक अज्ञात संकेत! वस्तुतः आदल्याच दिवशी संध्याकाळी (दि. २५–९–७७) ऑक्टोबरच्या अंकाची शेवटची मुद्रिते तपासून ती मी मालवणकरांना दिली होती व सांगितले होते की, "मी आता १ तारखेला येतो. पण दिनांक ९ ला भरणाऱ्या संमेलनाची बातमी ऑक्टोबरच्या अंकात येणे आवश्यक होते आणि त्याप्रमाणे ती छापून येण्यासाठी श्री. व्हिक्टर ह्यांना पाहिजे असलेल्या अंकांचे निमित्त करून श्रीबाबांनी मला मालवणकर बंधूंच्या छापखान्यात पाठविले व संमेलन भरविणाऱ्या साईभक्तांची इच्छा, त्यांच्या संमेलनाची

बातमी छापून आणून, अशाप्रकारे पुरी केली! किती ही भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याची बाबांची काळजी!

साईभक्तहो, श्री. व्हिक्टर ह्यांना पाहिजे असलेले अंक नेमके तीनच दिवस आधी मी एकत्रित करून मालवणकरबंधूंच्या छापखान्यात ठेवले व ते अंक श्री. व्हिक्टर यांना देण्यासाठी प्रिंटिंग प्रेसमध्ये अशा वेळी उपस्थित होणे की ज्यावेळी साईभक्तांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या संमेलनाची बातमी ऑक्टोबरच्या अंकात छापून आणण्यासाठी माझी आवश्यकता छापखान्यात होती, ह्या दोन्ही गोष्टींचा पुढे मी विचार करू लागलो तेव्हा मला असे वाटू लागले की, ह्या दोन्ही गोष्टी केवळ यदृच्छया किंवा योगायोगानेच घडल्या काय? नाही. भक्तांच्याबद्दल साईबाबांच्या मनात निरातिशय प्रेम होते आणि भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याबद्दल ते जिवंतपणी सर्व प्रकारचे प्रयत्न करीतच होते व आता महासमाधी घेतल्यावरही त्यांनी आपल्या भक्तांना जिवंतपणी जे वचन दिले होते ते पाळण्यात ते फार तत्पर आहेत असे आपणास दिसेल. निष्ठा आणि सबूरी ह्या त्यांच्या दोन गोष्टींचा अवलंब सर्व भक्तांनी केल्यास त्यांचेही मनोरथ श्रीबाबांच्या आश्वासनानुसार पुरे झाल्याशिवाय रहाणार नाहीत. चला तर आपण अनन्यभावाने आणि दृढ निष्ठेने त्यांची भक्ति करू या व त्यांना शतशः प्रणाम करू या.

—श्रीसाईलीला—

जगातील सर्वांत स्वस्त सचित्र मासिक

वर्षभर श्रीसाई साहित्याचा आपल्या घरात सुगंध पसरवा

वर्षातून पाच खास अंक

वा. वर्गणी ६ रु. [ट ह. सह] किं. ६० पैसे

# कार्याध्यक्ष महागणपती श्रीबाबा

● प्रा. र. श्री. पुजारी
रमा-निवास, ९९२, सदाशिव पेठ,
पुणे–३०

* भारतीय संस्कृतीत कोणत्याही मंगलकार्यारंभी विघ्नहर्त्या श्रीमहागणपतीची प्रतिष्ठापना करून कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी प्रार्थना करतात.

महागणपतीरूपी श्रीसाईनाथ मात्र स्वतःच एखादे कार्य काढून छवी किंवा मूर्तीच्या रूपाने त्या घरी येऊन कार्याध्यक्षपद स्विकारतात आणि कार्य पुरे झाले तरी निघून जात नाहीत.

२९ सप्टेंबर १९७१ या दिवशी आमच्या घरी असलेल्या वाढदिवस, वर्धापन–दिन आणि दसरा या तीन शुभप्रसंगाच्या निमित्ताने एका छोट्या मूर्तीच्या रूपाने ते आले आणि कायमचे स्थानापन्न झाले.

दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी ही छोटीशी मूर्ती बैठकीच्या खोलीत अन-पेक्षितपणे पाहून मी प्रथम थोडासा नाराज झालो. नंतर भेट म्हणून ही मूर्ती सादर करणाऱ्या व्यक्तीच्या बुद्धीची कींव वाटली. पण अखेरीस ती भेट देणाऱ्या व्यक्तीची मजविषयीची प्रेमभावना ध्यानी घेऊन आलेली भेट मी निमूटपणे ठेवून दिली. श्रीसाईबाबांविषयी फारशी माहिती नसलेली ही एक व्यक्ती !

मूर्ती, फोटो किंवा अशाच वस्तूंमुळे घरातील अडगळ हळुहळू वाढते, चिम-ण्यांना घरटी बांधण्याचे निमंत्रण होते आणि राहते घर हा एक अजबखाना होऊन जातो या कल्पनेमुळे साहजिकच ती मूर्तीही दर्शनी ठिकाणी राहिली नाही !

पुढे त्यांचे चरित्र लिहित असताना ध्यानी आले की दोन वर्षे आधीचा दसऱ्याचा आपल्या पुण्यतिथीचा मुहूर्त साधून, शिरडीनिवासी सच्चिदानंद-सद्गुरु श्रीसाईनाथ आमच्या घरी आले ! जणू त्या चरित्राची प्रेरणा देऊन, त्याचे पहिले प्रकरण त्यांनी पुढे बसून मजकडून लिहून घेतले आणि १९७३ च्या श्रीसाईलीलेच्या दिवाळी–अंकात प्रथम क्रमांकाने ते छापवूनही आणले !

श्रीसाईनाथ ललितचरित्राच्या लेखनाची सुरवात ही अशी गंमतीची होऊनही मी त्यांचा भक्त झालो नाही किंवा त्यांचा फोटो आणून घरी लावावा असे वाटले

नाही. तरीसुद्धा १९७५ च्या मे महिन्यात एका कॅलेंडराच्या रूपाने ते कोठूनसे आमच्या घरी पुन्हा आले, संपूर्ण चरित्र छापून होईपर्यंत माझ्या लेखनाच्या खुर्चीसमोरील भिंतीवर स्थानापन्न झाले आणि पुस्तक जसे छापून झाले तसे वाऱ्याने गिरक्या घेत घेत भिंतीचा संबंध सोडून एक दिवस ते दूर झाले.

नंतर ध्यानी आले की, श्रीसाईलीलेतून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या चरित्रातील लहान मोठ्या त्रुटी पुऱ्या करण्यासाठी ते आमच्या घरी पुन्हा आले होते! फोटोला आमचा विरोध होता म्हणून कॅलेंडरच्या रूपाने ते आले होते!

परंतु एवढयावरच त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. मी एक नित्य-पठनाची पोथी लिहावी अशी त्यांची इच्छा होती. ती पुरी झाल्याशिवाय आपले अध्यक्षस्थान ते सोडणार नव्हते. म्हणूनच की काय, एका साईभक्त मित्रांच्या हस्ते शिरडीहून ते फोटोच्या रूपाने आमच्या घरी आले आणि माझ्या लेखनाच्या खुर्ची-समोरील भिंतीवर कॅलेंडरच्या जागी विराजमान झाले!

तो प्रसंगही मोठाच नाटयपूर्ण म्हणता येईल.

श्रीसाईनाथ ललितचरित्राच्या मुखपृष्ठावर श्रीबाबांच्या तीन रंगी सुन्दर चित्राची योजना हवी म्हणून तसा ब्लॉक शिरडी संस्थानकडून मुंबईच्या ऑफिस-मधून मी मिळविला. पण माझे काम होताच तो ब्लॉक परत करताना मात्र माझे अंतःकरण अति हळुवार झाले. बाबा आपल्या घरून निघाले या भावनेने डोळ्यातून अनावर अश्रुपात सुरू झाला. अखेर 'पुनरागमनायच' ची प्रार्थना करून ब्लॉकचे ते खोके बंद केले अणि गणपतीविसर्जनानंतर जड अंतःकरणाने घरी परतावे त्या-प्रमाणे पुण्या-मुंबईची तातडीची कामे करणाऱ्या 'प्रवासी' कंपनीकडून मी घरी परत आलो.

पुढे काही दिवस गेले असतील नसतील, घर सांगितल्याप्रमाणे अगदी त्याच ब्लॉकवर छापावे असे, पण त्या ब्लॉकच्या जवळ जवळ चौपट मोठे, तीन रंगी तसेच चित्र अगदी अनपेक्षितपणे एका शुभ दिनी येऊन आमच्या समोर हजर झाले!

मी लिहीत असलेल्या 'श्रीसाईमाहात्म्य' या चोवीस अध्यायी पोथीच्या कामासाठी या चित्राच्या रूपाने श्रीबाबा आमच्या घरी आले होते अणि पोथी पुरी ाल्याविना ते आपल्या जागेवरून हलणार नव्हते!

अखेर १८९९ ओव्यांची, एका दिवसाच्या पारायणाची ही 'श्रीसाईमाहात्म्य' पोथी 'श्रीसाईनाथ' प्रमाणेच श्रीबाबांच्या प्रेरणेने पुरी झाली आणि २१ एप्रिल १९७७ या दिवशी गुरुवारी, अक्षय-तृतीयेच्या शुभमुहूर्तावर शिरडीस श्रीबाबांच्या चरणी मी ती अर्पण केली.

संतचरित्रविषयक लेखनाची सुरुवात करणे लेखकाच्या हाती असते; पण ते लेखन तडीस जाणे मात्र त्या लेखकाच्या किंवा अविश्रांत परिश्रमांवरही अवलंबून नसते.

श्रीबाबांनीच समोर बसून हे लेखन माझ्याकडून करवून घेतले अशी मागील अनेक 'अनुभवां' वरून माझ्या मनाची भावना झाली. ती कल्पनेचा खेळ नसून सत्यात्मकच आहे.

.............

# एम्. एड. परीक्षा व मी

प्राचार्य **श्री. अमिनगड** एम्. एम्.
मु. पो. गुळुंचे ता. पुरंदर
जि. पुणे

● १९५९ साली मी एम्. एड्. परिक्षेला बसलो आणि परीक्षेपूर्वी अभ्यासाला म्हणून मी १५ दिवस खुर्चीला खिळून बसलो होतो, आणि ज्या दिवशी परीक्षा सुरू होणार होती त्या दिवशी पहाटे ५ वाजल्यापासून माझे अर्धे डोके दुखू लागले. मला काहीएक समजेना. मी बाबांवर विश्वास ठेवून परीक्षेला जाण्यापूर्वी बाबांच्या छायाचित्रासमोर उदबत्ती लावून ( माझे जवळ बाबांची उदी नसल्यामुळे ) परिक्षेमध्ये यश मिळवून देण्यासाठी बाबांची प्रार्थना करून उदबत्तीची उदी कपाळाला लावून परिक्षेला जात असे. परीक्षा मंदिरात जाण्यापूर्वी बाबांचे नाव घेऊन प्रवेश करीत असे. प्रश्नपत्रिका दिल्यानंतर बाबांचे नाव घेऊन लिहिण्यास सुरुवात करीत असे. एकदा लिहिण्यास सुरुवात केल्यानंतर सर्व प्रश्न पूर्ण करून लेखणीला मी विश्रांती देत असे व दोन तासामध्ये पेपर संपवून बाहेर येत असे. सतत पाच दिवस अर्धे शिशी ( अर्धे डोके ) त्रास देत होती परंतु त्याही परिस्थितीमध्ये मी पेपर लिहून बाहेर येत असे. ज्या दिवशी शेवटचा पेपर त्या दिवशी अर्धे शिशी थांबली, परंतु या डोकेदुखी मध्ये मी काय लिहित होतो हे माझे मलाच समजत नव्हते आणि प्रत्येक पेपर दोन तासामध्ये लिहून बाहेर आलेले पाहून माझी सर्व मित्रमंडळी मला म्हणत तू पास कसा होणार ? मी त्यांना ठामपणे उत्तर दिले, 'बाबा माझे पाठीशी

आहेत आणि ते मला पास करणार आहेत.' ज्या दिवशी परिक्षेचा निकाल लागला त्या दिवशी मी पास झालेलो पाहून ज्याना मी नापास होणार असे वाटत होते त्यांना आश्चर्य वाटले होते व तेच नापास झाले.

पुढे मी एम्. ए. परिक्षेला बसलो होतो त्या वेळीसुद्धा मी बाबांचा धावा करूनच पेपर लिहित होतो आणि ज्यावेळी शेवटचा पेपर संपला त्यावेळी मी बाबांची प्रार्थना केली की, एम्. ए. चा निकाल लवकर कळू दे. माझे गावापासून ३ मैलावर माझा एक मित्र रहात होता. त्या मित्राच्या मुलीचे लग्न होते. त्याने मुलीची लग्नपत्रिका दुसऱ्या कोणालाही न पाठविता लग्नाअगोदर १५ दिवस मुलाकडून मला लग्नपत्रिका पाठवून दिली अणि पत्ता लिहिताना माझे नाव लिहून एम्. ए. एम्. एड. लिहिले होते. त्यावर लिहिलेले एम्. ए. एम्. एड. पाहून मला असे वाटले की, मी निश्चित परीक्षेत पास होणार. अशारीतीने बाबांनी माझी प्रार्थना ऐकली व पूर्ण केली.

माझे मुलांचे व मुलींचे लग्न १९७३ साली ठरले. सर्वांनी गावी लग्न करण्याचे ठरविल्यामुळे गावी जाण्यासाठी सर्व सामान बांधून ठेवले होते. त्यावेळी पैशाची अत्यंत गरज होती. कितीही प्रयत्न केले तरी पैसे मिळाले नाहीत. आम्ही सर्व मंडळी निराश होऊन सर्व भार बाबांवर टाकून निष्काळजी बसलो होतो. अशा वेळी माझे शेजारी राहाणारे प्राथमिक शाळा शिक्षक श्री. कांबळे यानी दुपारच्यावेळी सहज विचारले आज आपण जाणार होता ना. मी त्यांना सर्व सत्य परिस्थिती सांगितली. त्यांनी आम्हाला दिलासा दिला. आपण काळजी करू नका. मी संध्याकाळपर्यंत पैसे आणून देईन असे सांगितले त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी आम्ही लग्नस्थळी जाऊन सर्व विधी बाबांच्या कृपेने व्यवस्थित पार पडला. लग्नपत्रिका शिर्डीला साईबाबांना पाठविली होती. त्याप्रमाणे बाबांनी आम्हाला आशीर्वाद दिला होता.

आमच्या सरस्वती मंदिराच्या तपासणीसाठी शाळा अधिकारी येणार होते. परंतु त्यांच्या नियमाप्रमाणे आमचे मंदिरात काहीं वस्तुंची उणीव होती. ज्या दिवशी त्या उणिवांची पूर्तता झाली त्याच दिवशी तपासणीसाठी अधिकारी आले. त्यांचे नाव श्री. पाटील होते. सुदैवाने तेही साईभक्त होते.

माझ्या पत्नीची बदली झाली होती. आणि झालेली बदली रद्द करून घ्यायची होती, आणि त्याबद्दल काही ज्योतिषांना विचारलेही, बदली रद्द होईल की नाही. परंतु प्रत्येकाने काही ना काही अडचणी येतील असे सांगितले. आपण त्याबद्दल प्रयत्न करू नये पण आमच्यावर बाबांची सदैव कृपा असल्याने बाबांच्या मंदिराचे प्रमुख व प्रतिष्टित व्यक्ती, तसेच डॉ. भापकर व इतर दोन मित्रांनी मला मदत केली, व त्यांचे सहाय्याने माझे पत्नीची बदली रद्द झाली ही साईबाबांची कृपा असे मी समजतो. *

# साईंनी घरात चमत्कार दाखवावा असा आग्रह धरला आणि.......

— श्री. ज. प्र. मिरीकर, एम. एस्सी.
रमाप्रसाद, ३७–४ बी, एरंडवणा, पुणे

● मी नोकरीनिमित्त १९४६ ते १९४९ पर्यंत, सावळीविहीर येथे (शिरडी-पासून ४ मैल) असताना, नेहमी शिर्डीस जात असे, त्यामुळे साईबाबांचा भक्त बनलो. दरवेळी शिरडी येथे गेल्यावर साईंनी दाखवलेले चमत्कार कानावर येत. 'साईलीला' मासिकात प्रसिद्ध झालेले साई चमत्कार मी नियमित वाचीत असे. त्यामुळे मला वाटत असे की, साई माझ्या घरी असा चमत्कार का दाखवीत नाहीत ? तसा चमत्कार दाखवावाच अशी आग्रहपूर्वक प्रार्थना मी केल्यानंतर तिसऱ्याच दिवशी त्याची प्रचिती आली, ती अशी–

ही घटना जुलै १९५४ मधील आहे. त्यावेळी, मी कारवार जिल्ह्यातील जंगलात एका सिंधी वसाहतीमध्ये नोकरीत बदलून गेलो होतो. 'साईलीला' मासिकाचे वाचन चालूच होते. दि. ८ जुलै १९५४ गुरुवार या दिवशी नित्यनेमाप्रमाणे 'साई-स्तवन मंजीरी' सायंकाळी वाचून बाबांना मनातून आग्रहपूर्वक प्रार्थना केली की, त्यांनी मला माझे घरी पूजेच्या मंडपात चमत्कार दाखवावा. त्यावेळी त्यासाठी मंडप पुसून ठेवला. नंतर शुक्रवार दि. ९ व शनिवार दि. १० या दोन्ही दिवशी सायंकाळी पुन्हा आग्रहपूर्वक तीच प्रार्थना केली व मंडप पुसून ठेवला. रविवार दि. ११ जुलै १९५४ रोजी सकाळी उठल्याबरोबर मंडपाजवळ ठेवलेल्या साईंच्या फोटोस नमस्कार केला, त्यावेळी मंडपाच्या आत पृष्ठभागावर दोन राखी रंगाची छोटी पाऊले उमटलेली दिसली. मंडप शिसवीचा, म्हणजे काळया लाकडाचा आहे म्हणून, राखी रंगाच्या पादुका उठून दिसत होत्या व त्या पादुका हातानी पुसल्या तरी जाईनात. मला भास होतोय की काय अशी शंका येऊन माझ्या नोकरास (घरात मी एकटाच होतो) मंडपात काय दिसते ते पाहाण्यास सांगितले. त्याने 'पादुका दिसत आहेत' असे म्हटल्याबरोबर माझा आनंद गगनात मावेना. लगेच मी त्याला शिरा-प्रसाद करायला सांगितला व त्याचा नैवेद्य दाखवला. सायंकाळी नेहमीप्रमाणे रेडिओवर ग्रामीण कार्यक्रम ऐकला त्यावेळी समजले की, त्या दिवशी आषाढी एकादशी आणि पंढरपूर यात्रा होती. वेडयासारखा आग्रह धरला म्हणून

साई रागावले तर नाहीतच, उलट अशा उत्तम दिवशी साई माझ्या घरी येऊन गेले व माझी आग्रहाची प्रार्थना पूर्ण केली.

पुढे उमटलेल्या पादुका–बरहुकूम चान्दीच्या पादुका धारवाड येथे करून घेतल्या. मंडपावर उमटलेल्या पादुका नाहीशा झाल्या म्हणून या चान्दीच्या पादुकांची पूजा माझ्या घरी आजवर अव्यांहतपणे चालू आहे. या चान्दीच्या पादुकाही साईंनी त्यानंतर चमत्कार दाखवून पुनीत केल्या आहेत. या पादुकांच्या उजव्या पायावर फेब्रुवारी ५७ मध्ये मी पाडेगाव (निरा) येथे नोकरीनिमित्त असताना कापराच्या काजळीच्या स्वरुपात "ॐ" अक्षर उमटले. पादुका वरील अक्षर कालांतराने पुसले गेले आहे पण त्याचा फोटो आजही मजजवळ आहे.

यानंतर आग्रह न धरताही साईंचे चमत्कार व त्याची कृपा अगणित प्रसंगी मी अनुभवलेले आहेत. साई अत्यंत दयाळू अंतःकरणाचे आहेत हे खरे.


## संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबा

आता लौकरच प्रकाशित होणार

: लेखक :

● श्री. का. सी. पाठक
कोर्ट रिसिव्हर, श्रीसाईबाबा संस्थान

● सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला

+ श्रीसाईबाबांचे सचित्र चरित्र
+ श्रीसाईनाथकालीन व्यक्तींची भरपूर छायाचित्रे
+ श्रीसाईनाथांचे मुखपृष्ठावर संग्राह्य चित्र

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे नवे प्रकाशन

# श्रीसाईनाथमहाराजांनी मला दिलेला दृष्टांत

-- श्री. अनंत जयदेव चितांबर
तांबे ब्लॉक्स, दिल्लीदरवाजा जवळ
अहमदनगर

● मी त्यावेळी १५ वर्षांचा होतो, आणि कै. नानासाहेब ऊर्फ काकासाहेब अवस्थी, पुणे यांचे घरी त्यांचा आश्रित विद्यार्थी म्हणून त्यांचेकडे राहात होतो. नूतन मराठी विद्यालयाचा मी विद्यार्थी.

पुष्कळ वेळा घरी परत येताना बुधवार चौकातून स्वारगेटकडे जाणाऱ्या रस्त्याने जाऊन, काकाहलवाई यांच्या दत्तमंदिरात जाऊन त्या सुंदर व मनोवेधक श्रीदत्तमूर्तीचे दर्शन घेऊन घरी जात असे.

एका रात्री मला, मी गाढ निद्रेत असताना एक स्वप्न पडले. ती वेळ रात्री १२ ते २ या दरम्यानची असावी. ते स्वप्न असे:–

एका प्रशांत रात्री मी बुधवार चौकातून घरी येत होतो. सर्व दुकाने बंद असून रस्त्यावर कसलीही वाहतूक नव्हती. मी एकटाच काकाहलवाई यांच्या श्रीदत्त मंदिराकडे चालत होतो. बाहुलीच्या हौदाजवळ आलो तो समोर एक दृश्य दिसले. एक मुसलमान गृहस्थ श्रीदत्त मंदिराच्या बाहेरच श्रीदत्त मूर्तीसमोर उभा राहून हात जोडून 'अल्ला', 'अल्ला' या नावाचा घोष करून श्रीदत्तमूर्तीस नमस्कार करीत होता मला, मी रस्त्यात त्याच्या मागे असल्याने त्याची पाठ व पोषाख ही दिसत होती. मी आश्चर्याने त्याच्याकडे पाहून नंतर श्रीदत्तमूर्तीकडे माझी दृष्टि गेली. श्रीदत्त मंदिर उघडे होते. मंदिरात कोणीही माणूस नव्हता. रस्त्यात अगदी शांतताच रात्रीची होती. कसलाही इतर आवाज नव्हता. मी 'अल्ला', 'अल्ला' हे शब्द त्या मुसलमानाचे तोंडून निघणारे ऐकत असताना जे श्रीदत्तमूर्तीकडे पाहिले, तो ती दत्तमूर्तीने डोक्यापासून ते थेट खालच्या पायापर्यंत हळू हळू श्रीसाईनाथांचे स्वरूप धारण केले व श्रीसाईनाथमहाराज शिळेवर बसतात, त्याप्रमाणे ते मला बसलेले दिसले. मीही त्या श्रीसाईनाथमहाराजांना, दिसले तसे त्यांना रस्त्यातून उभे राहून शिर लववून, हात जोडून नमस्कार केला आणि नंतर काय ते स्वप्न संपले आणि झोपेतून जागा झालो. श्रीसाईबाबांनी मीच दत्त आहे असा मला लहानपणीच दृष्टांत दिला.

# ही तर बाबांची करणी—

श्री. मधुकर भीमाशंकर देशपांडे बी. ए. (ऑ.)
३३ कसबा, पुणे ११

या गोष्टीला आठ दहा महिने झाले असतील. एक दिवस अचानक माझे मनात आले की आज मामांच्या घरी जाऊन त्यांना माझी 'श्री साईमहिमामृत' ही पोथी भेट म्हणून द्यावी. मी मामांची माडी चढून वर आलो तो मला एक धक्का बसल्यासारखे झाले. ज्यांना भेटण्यासाठी मी आलो ते माझे मामा अंथरुणाला खिळून होते आणि गेले चार-सहा दिवस तर त्यांची तब्येत बरीच नाजूक बनली होती. जवळ जवळ बेशुद्धावस्थेतच ते होते. मी आल्याची चाहूल त्यांना लागली नाही. मी जवळच्याच एका खुर्चीवर बसलो. तेवढ्यात स्वयंपाकघरातून मामी तेथे आल्या आणि मामांच्या दुखण्याबद्दलची सारी हकीगत मला सांगितली. मामांचे सर्व शरीराला सूज आली होती आणि ते दृष्य पाहून मी इतके दिवस त्यांचे भेटीला का आलो नाही याची मला खंत वाटू लागली. कदाचित् या वेळी मुद्दाम बाबांनीच मला येथे पाठविले असेल अशी शंकाही चाटून गेली. पिशवीतून माझी पोथी बाहेर काढीत मी मामींना म्हणालो, 'मामी, मी ही पोथी लिहिली आहे आणि मामांना भेट देण्यासाठी म्हणून मी मुद्दाम आलो आहे. परंतु मामा तर बोलण्याच्या किंवा पहाण्याच्याही अवस्थेत नाहीत, मी ही पोथी तुमचे देवापुढे ठेवतो.''

तेवढ्यात मामी पाट आणण्यासाठी स्वयंपाकघरात गेल्या. पोथी हातात घेऊन मी बाबांची मनोमन प्रार्थना केली, 'बाबा, माझ्या मामांनी मला माझ्या लहानपणापासुन फार लळा लावला आहे आणि त्यांची ही परिस्थिती पाहून मी बावरून गेलो आहे. माझे मामा आपल्या या दुखण्यातून उठले पाहिजेत आणि माझे मामा माझे घरी आपल्या पायांनी चालत आले पाहिजेत. ही माझी मागणी. आपण पूर्ण केली पाहिजे.'' तेवढयात मामी पाट घेऊन आल्या. देवापुढे त्यांनी तो पाट ठेवला. मी मस्तकी पोथी लावून पाटावर ठेवली, आणि साश्रूनयनाने बाबांची करुणा भाकली. काही तरी बोलायचे म्हणून बोललो, 'मामी, ही पोथी मामांचे जवळ बसून दिवसातून एकदातरी जरूर वाचा. एक अध्याय रोज वाचला तरी चालेल. मामांच्या तब्येतीत खात्रीने उतार पडेल असे मला वाटते.''

" मी जरूर वाचीन " मामींनी होकार देत म्हटले. थोडा वेळ थांबून मी माझ्या घरी आलो.

दोन दिवसानंतर माझी मावशी अचानक माझे घरी आली. ती मामांना–तिच्या भावाला–भेटण्यासाठी आली होती. मला पहाताच ती म्हणाली, "मधू, मामांची तब्येत आता सुधारत आहे. मामी म्हणाल्या, 'मधूनी पोथी ठेवली त्यावेळेपासून मामांच्या प्रकृतीत अचानक सुधारणा घडून आली. मामा आता थोडे बोलू लागले आहेत आणि काल त्यांनी थोडा भातही खाल्ला."

मावशीच्या या उद्गाराने माझ्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. केवढे मोठे संकट मी माझ्या बाबांवर घातले होते आणि त्यांनी माझ्यासारख्या यत्‌किंचित भक्ताची विनवणी ऐकून केवढी मोठी करणी केली. माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी रडण्याशिवाय माझेजवळ दुसरे साधनच नव्हते. थोडावेळ जाताच मावशीला मी सारी हकीगत सांगितली आणि म्हणालो, "माझे बाबा मामांच्या साहाय्यार्थ धावून आले आणि मला खात्री आहे की मामा या जीवघेण्या दुखण्यातून बाहेर येऊन माझे घरी चालत येतील."

"माझ्या ह्या उद्गारांनी मावशीचे डोळे पाण्याने डबरले आणि बाबांच्या रूपानेच ती म्हणाली, खरंच मामा तुझे घरी वेळीच चालत येतील."

आणि एके दिवशी सकाळीच माझ्या दारावर टिकटिक आवाज आला. दार उघडून पहातो तो मामा माझ्या दारात दत्त म्हणून उभे. काही कल्पना नसतानाही मामा हजर होते. चेहऱ्यावरील नेहमीचे प्रेमळ हास्य पाहून मला गहिंवरून आले. आणि कसाबसा म्हणालो, 'मामा, बसा ना!'

ते नेहमीच्याच स्वरात म्हणाले, "मला आता वेळ नाही, पण उद्या तुम्ही सर्वांनी आमचेकडे जेवावयास आले पाहिजे. अजून बरीच बोलावणी करावयाची आहेत." असे म्हणून नेहमीच्या थाटात बरे आहे येतो हं सुनबाई, असे म्हणून सौभाग्यवतीचा निरोप घेऊन ते निघालेही.

मामांची ती पाठमोरी आकृती पाहून माझ्या मनात गतगोष्टीचा सारा इतिहास चलत चित्रपटाप्रमाणे सरकला आणि बाबांच्या फोटोकडे नजर जाताच मी उद्गारलो "बाबा! बाबा!! तुमचे उपकार मी कसे फेडू?"

# ओढाळ मनाला ताळ्यावर आणले

● सौ. उषा अधिकारी
सावित्री भुवन, बंदर रोड, रत्नागिरी

● लहानपणापासून माझा पौराणिक वाङ्मयाकडे कल. सिनेमा पहावयाचे पौराणिक. पुस्तके वाचावयाची, तीसुद्धा संतचरित्रे. इतर 'रामायण, महाभारत, भागवत यासारखी. रामायण वाचले तेव्हा राम मला आदर्श वाटला. मी रामनामाचा जप करावा. पुढे श्रीकृष्णचरित्र वाचले, पांडवप्रताप, हरिविजय ग्रंथ वाचले, आणि माझा देव बदलला. मी रामनाम सोडून दिले व श्रीकृष्णाची भक्ति करू लागले. वय जसजसे वाढू लागले तसतसे ज्ञानेश्वरी वाचावी, गीता वाचावी असे वाटू लागले. तीही वाचून काढली. शिक्षण संपले. प्रायमरी स्कूलमध्ये नोकरी धरली. मुलांना गोष्टी सांगता सांगता आणखी आणखी पुस्तके वाचून काढली यात माणिकप्रभू अक्कलकोट महाराज, ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, गुळवणी महाराज यांचीही चरित्रे वाचली आणि देवाकडचा ओढा संतांकडे वळला. प्रत्येक संताची भक्ती आपण करावी असे मला वाटू लागले. गेल्या २/३ वर्षात तर विशेषत्त्वाने जे दत्तभक्त आहेत त्यांची चरित्रे वाचून नरसोबाची वाडी, औदुंबर गाणगापूर या क्षेत्री जाऊन यावे असे मला वाटू लागले. या वेळेपर्यंत शिरडीचे साईबाबांचे नाव माझ्या ऐकण्यात होते. आमचे-कडे त्यांचा फोटोही होता, पूजा होत होती पण शिरडीस जावयाचे कधी मनात आले नव्हते. पण तो योग होता.

आम्ही नरसोबाच्या वाडीला जाण्यासाठी सर्व कुटुंबीय मंडळीचे सकाळच्या गाडीचे रिझर्व्हेशन केले. गुरुवारी निघावयाचे म्हणून आदल्या दिवशी संध्याकाळी ७॥ चे सुमारास बाजारात जाऊन किरकोळ खरेदी करणार तोच आमच्या एस्. टी. मधील एक टी. सी. श्री. कांबळे वाटेत मला भेटले व म्हणाले, "साहेब तुम्ही वाडीला उद्या जाणार असे ऐकले ! अहो, वाडी काय इथून जवळ आहे केव्हांही दर्शन करता येईल उद्या गुरुवार आहे तुम्ही शिरडीला जा. रात्रीपर्यंत निश्चित पोचाल.' हे म्हणाले, "अहो, आमचे रिझर्व्हेशन झालेले आहे आणि आयत्या वेळी पुणे गाडीला जागा कशी मिळेल ? आम्ही सात माणसे आहोत." त्यावर ते हसून म्हणाले, ते माझ्याकडे लागले. मी जाऊन सर्व व्यवस्था करतो. तुम्ही सगळीजण ६॥। ला स्टँडवर हजर राहा. आता बेत बदलल्यामुळे आम्हाला आणखी काही खरेदी करावी लागली. ती करून आम्ही घरी आलो. बदललेला

बेत सांगताच सर्वजण चिडली पण एकदाची यायला तयार झाली. दुसरे दिवशी म्हणजे गुरुवारी १२ मे १९७६ ला सायंकाळी ५ ला पुण्यात पोचलो. आश्चर्य म्हणजे आमच्या गाडीत एक कोपरगावला जाणारा प्रवासी होता. त्याने आपणहून आमच्याशी ओळख करून घेऊन प्रवासाची कल्पना दिली. पुण्याहून सातला गाडीत बसून साडेअकराला शिरडीला पोचलो. त्यावेळी आम्ही सर्व माणसे कोणत्याही प्रकारचा जरासुद्धा त्रास न होता एका दिवसात एवढा मोठा प्रवास कसा झेपला याचाच विचार करत होतो. गुरुवारची गर्दी असूनही आमची छान व्यवस्था झाली. शुक्रवारी लवकर उठून आंघोळ वगैरे करून आम्ही समाधीमंदिरात दर्शनाला गेलो तोच क्षण माझ्या भाग्याचा होता. मी बाबांकडे पाहिले आणि माझे भान हरपले. ओठ थरथरू लागले. डोळ्यांतून अश्रु येऊ लागले कंप सुटला. माझा देव माझे सद्गुरु ज्यासाठी मी अहोरात्र धडपडत आहे ते मला तिथे सापडले. माझ्याने एक अक्षर बोलवेना की तिथून हलवेना. मुलांनी मला जवळजवळ ओढूनच द्वारकामाईतच नेले. तिथे गेल्यावरसुद्धा तोच प्रकार. माझे सुखनिधान ते हेच असा मला साक्षात्कार झाला. मी द्वारकामाईत पुन्हापुन्हा भिरीभिरी हिंडले. बाबांचे रूप डोळ्यात साठवून घेतले आणि म्हणाले, हे चरण मी कधीच सोडणार नाही. आता रक्षणकर्ता, सुखकर्ता, दुःखहर्ता, मातापिता सगळं काही तूच, तूच आहेस. आज मी कृतार्थ झाले, धन्य झाले आणि माझे मन शांत झाले. मनाची चंचलतेची पुटे आज गळून पडत आहेत आणि हृदय संपुटात एक तुझीच मूर्ति विराजमान होत आहे ती तशीच राहू दे. माझ्या ओढाळ मनाला तू आज ताळ्यावर आणलेस ते तसेच स्थिर राहू दे. त्या वेळचे ते ३।४ दिवस माझ्या आयुष्यातील परमोच्च सुखाचे गेले. त्यानंतर ३० जानेवारी ७७ ला पुन्हा माझी शिरडीस जाण्याची इच्छा पुरवली. त्यावेळी माझ्या मनातील वैयक्तिक अभिषेक, सत्यनारायण पूजा, मार्तंड भगतांची मुलाखत, साकोरी आश्रम दर्शन, म्हाळसापतींचे व इतर तिथे असलेल्या भक्तांच्या समाधीचे दर्शन या सर्व गोष्टी मनासारख्या पार पडल्या. आता मी स्थिर आहे. उठता जेवता, खाता, पिता मला साईच दिसतात. तेच आठवतात. त्यांच्याच गोष्टी मी सांगते. थोडक्यात माझे जीवन एक साईमय झाले आहे. आता कुणी काही सांगितले, कोणा सत्पुरुषाचे वर्णन ऐकवले किंवा पाहिले तरी आदराने मान वाकते पण मन विचलीत होत नाही.

# श्रीसाईनाथांचा अभिषेक

● सौ. अनिता अनंत नाईक
ए।६ वेस्ट क्वार्टर्स, वडाळा डेपोजवळ
वडाळा, मुंबई ३१

'नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥

● साईवचनातील बाबांचे हे उद्‌गार किती यथार्थ आहेत ह्याची प्रचिती प्रत्येक साईभक्तास श्रीबाबा कधीना कधी दाखवितात.

आमच्याच घरचे उदाहरण सांगते. घरात आम्हा सर्वांचीच बाबांवर गाढ श्रद्धा आहे. आमच्याकडे असलेल्या साईबाबांच्या संगमरवरी मूर्तीला अभिषेक करून तिची रोजच्या पूजेत स्थापना करा असे पुष्कळजणांनी आम्हास सुचविल्यामुळे आम्ही त्या मूर्तीचा अभिषेक करण्याचे ठरविले. परंतु हा आमचा अभिषेकाचा बेत काहीना काही कारणाचे लांबणीवर पडत होता. अशीच एकदा दुपारची मी माझ्या पतीसमवेत गॅलरीत गप्पा मारत बसले असता एक फकिर आमच्या दाराशी आला. श्रीबाबां-प्रमाणेच काहीसा त्याचा वेष होता. भगवी कफनी, डोक्यास फेटा व खाकेत झोळी होती. आमच्याकडे पैशाची वगैरे काही याचना न करता त्याने 'नवनाथ की जय' असे म्हणून आपल्या झोळीतून नवनाथांचा फोटो काढून आम्हाला दाखविला व साईबाबांच्या आशिर्वादाच्या हाताप्रमाणे आपला उजवा हात आम्हाला आशीर्वाद देण्यासाठी वर करून तो म्हणाला, 'बेटा, मेरे हातकी तरफ देखो । आपके पीछे श्रीसाईनाथ का हात है । वे आपकी हर मनोकामना पूरी करेंगे । आप श्रीसाई-बाबाको अभिषेक जरूर करना, और उसके साथ श्रीसत्यनारायणकी पूजा भी करना ये अधिक मासमें की गई पूजा का भगवान आपको अच्छा फल देगा । आप और सोम-वारका जो उपवास करते हैं वो हमेशा करते रहना ।' असे म्हणून आम्हास काही बोलण्याची संधी न देता तो आला तसाच निघून गेला. आम्ही करीत असलेला सोमवारच्या उपासाचा उल्लेख त्याने अचूक कसा केला ह्याचे आम्हाला नवल वाटले. तेव्हा बाबांनीच आमच्या मनातील अभिषेकाची इच्छा जाणून आम्हास येऊन मार्ग दाखविला अशी आमची ठाम खात्री झाली. नाहीतर आम्ही बाबांचा अभिषेक करण्याचे योजिले आहे हे त्या फकिरास कसे कळले ?

शनिवार दिनांक २३ जुलै १९७७ या दिवशी आम्ही श्रीसाईबाबांच्या मूर्तीचा अभिषेक व श्रीसत्यनारायणाची पूजा केली. त्या दिवशी श्रीबाबांस पुरणपोळी व लोण्याचा नैवेद्य दाखवून आम्ही सर्वांनी भोजन केले. अशा प्रसंगी बाबा कोणत्याही रूपात येऊन भोजन करून जातात असा अनुभव पुष्कळ साईभक्तांना आलेला आहे म्हणून आपल्या घरीही आज बाबांनी भोजनास यावे असे मला सारखे वाटत होते. परंतु माझी निराशा झाली होती. माझ्याकडून श्रीबाबांच्या सेवेत काही चूक झाली असेल का असे शल्य मनास टोचत होते. पण त्या कृपाळू साईमाऊलीस आपल्या भक्तांची इच्छा कशी कळल्याशिवाय राहिल? अभिषेकाच्याच दिवशी तिन्हीसांजेस थंडीने कुडकुडत असलेले एक कुत्र्याचे पिल्लू आमच्या घराच्या पायरीजवळ बसलेले मला दिसले. त्यादिवशी सतत पाऊस पडत होता व ते पिल्लू पावसाने भिजले होते. बाबांच्या जवळपास नेहमी कुत्रा असायचा. तेव्हा आम्हास त्या कुत्र्याची दया आली. पुरणपोळीवर बाबांच्या आवडीचे लोणी घालून मी ती पोळी त्या पिल्लास खाऊ घातली. पोळी खाऊन झाल्यावर ते पिल्लू जणू त्याचे एखादे कार्य झाल्याप्रमाणेच आमच्या घरापुढून निघून गेले. श्रीसाईच श्वानरूपात आमच्या घरी पुरणपोळी व त्यांच्या आवडीचे लोणी खाऊन गेले ह्या जाणिवेने मी सद्गदित होऊन बाबांच्या मूर्तीस वंदन केले.

अभिषेकाच्या दिवसानंतर पाच-सहा दिवसांनी माझ्या पतीस बाबा आमच्या-बरोबर घरात पंक्तीस बसून भोजन करीत आहेत असे स्वप्न पडले. स्वप्नात भोजन करीत असता बाबा यांना म्हणाले, "मैं तो अब तुम लोगों के घर आया हूँ। मुझे हररोज तुम लोगों के साथ भोजन नहीं दोगे? मैं तो पाच-छः दिनसे भूखाही हूँ।" ह्या दृष्टांतानंतर माझ्या पतीस खडबडून जाग आली व आम्हा सर्वांना त्यांनी बाबांचा दृष्टांत सांगितला. आम्ही हात जोडून बाबांची मनोमन माफी मागितली. तेव्हापासून आम्ही रोज साईबाबांस लोणी व वरणभाताचा नैवद्य न चुकता दाखवितो. अशाप्रकारे कृपाळू साईमाऊली नानाविध किमया करून व दृष्टांत देऊन आपल्या भक्तांकरवी इच्छित कार्य करवून घेतात.

भक्तांच्या हाकेस सत्वर धावणाऱ्या त्या साईमाऊलीच्या चरणी मस्तक लीन होऊन आपल्या हृदयात सहाजिकच दासगणूने म्हटलेल्या पंक्तींच्या स्वरांची वीणा झंकारते—

**रहम नजर करो अब मोरे साई।**
**तुम बीन नही मुझे माँ-बाप भाई॥**
**तुम्हारे मशीदका झाडू 'गणू' है।**
**मालिक हमारे तुम बाबा साई॥**

# भेट होऊनही....ओळख पटली नाही !

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजर लेन
नवापूर, जि. धुळे
४२५४१८

● शिर्डीला जायचे जायचे म्हणून आम्ही तीन-चार मित्र कैक वेळा ठरवित होतो. या आधी आम्ही प्रत्येकजण शिर्डीला गेलो होतो. परंतु मित्रमंडळीने एकत्र जायचे असे सारखे मनात होते. मी व माझे तीन मित्र असे चौघांनी जायचा पक्का विचार केला. त्या दृष्टीने प्रवासाचे आयोजन करू लागलो. प्रथम नवापूरहून निघून सप्तशृंगी देवीच्या दर्शनाला गडावर जायचे तेथून नासिक, पुढे नासिकरोड येथील मुक्तीधाम व शेवटी शिर्डीला जायचे. शिर्डीला बुधवार रात्री १२ पर्यंत पोहोचून गुरुवारी सबंध दिवस-रात्र रांहायचे. कारण तेथे होणाऱ्या सर्व आरत्यांना हजर राहून जास्तीत जास्त बाबांची सेवा करण्याची संधी घ्यायची. रविवारी निघून बुधवारी रात्रीपर्यंत शिर्डीला जायचे असे निश्चित ठरले. चौघांपैकी एक मित्र शिर्डीला परस्पर येणार होता.

आम्ही तिघेजण रविवारी नवापूरहून निघून पिंपळनेरला बहिणीकडे थांबलो. दुसऱ्या दिवशी सोमवारी दुपारी नांदुरीला निघालो. रात्रभर सप्तश्रृंग गडावर मुक्काम करून मंगळवारी नासिकला गेलो. नासिकची पवित्र मंदिरे पाहून बुधवारी नासिक-रोडला दुपारपर्यंत पोहोचलो. मुक्तीधाम पाहून होईतो दुपारचे चार वाजले. आता आमचे मन बाबांकडे धाव घेऊ लागले, केव्हा शिर्डीला जाऊ असे झाले होते. तितक्यात नासिकहून कोपरगाव गाडी आली परंतु आमच्यातला एका मित्राने थेट गाडीने जावयाचे असा हट्ट धरला. आम्ही पुष्कळ समजविण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ ! कोपरगावहून पुष्कळ बसेस असतात पण मित्राने ऐकलेच नाही. डायरेक्ट गाडीची वाट पाहाण्यात पाच वाजत आले तरीही शिर्डी जाणारी बस आली नाही. शेवटी नासिक सिन्नर एस. टी. आली. नासिकरोडलाच उशीर होत चालला म्हणून नाईलाजाने सिन्नरची तिकिटे घेतली सिन्नरहून पुढे शिर्डीला जाऊ असा विचार. सिन्नरला सहासाडेसहाच्या दरम्यान पोहोचलो.

सिन्नरच्या बसस्टॅण्डवर कंट्रोलरला भेटून शिरडी गाडीचा तपास केला. तेव्हा ते म्हणाले,"आता पहाटेलाच बस आहे. आम्ही पुन्हा पुन्हा विचारले तरीही त्यांचे

उत्तर तेच ! आम्ही हिरमुसले झालो तरीही मनाची उमेद दांडगी होती. गावात जाऊन रिक्षा अगर मालट्रक मिळाल्यास त्या वाहनाने जायचे. रिक्षावाल्याने शंभर रुपये भाडे सांगितले. ते आमच्या आर्थिक परिस्थितीला परवडण्यासारखे नव्हते. दुसरा मार्गच नव्हता. पुन्हा स्टॅण्डवर जाऊन गाडी कितीला असते ते पाहून पुढील वेळ घालवायचा म्हणून सिनेमाला जायचे असे ठरविले.

बस स्टॅण्डवरून आम्ही सिनेमा टॉकीजकडे निघालो. सिनेमाच्या आवारात पाऊल ठेवणार तोच एक म्हातारा बाबा आमच्याजवळ येऊन म्हणाले, "तुम्हाला शिर्डीला जायचे आहे ना ? मलाही शिर्डीलाच जायचे आहे. चला आपण स्टॅण्डवर जाऊ !"

आम्ही त्यांना शिर्डी गाडीविषयी पुष्कळ सांगितले पण त्यांनी ऐकले नाही. आज मुंबईकडून गाडी येईलच. आम्ही त्यांच्याबरोबर स्टॅण्डवर आलो. पुन्हा एकदा खात्री करावी म्हणून त्या म्हातारे बाबांसह कंट्रोलरकडे विचारणा केली. त्यावेळी कंट्रोलरने पहाटेलाच गाडी आहे असेच सांगितले.

तरीही ते म्हातारे बाबा म्हणाले तुम्ही ९–९॥ वाजेपर्यंत थांबा. जरूर गाडी येईल. अखेर त्यांच्या आग्रहास्तव आम्ही थांबायचे ठरविले. आम्ही बाबांना जेवणा विषयी विचारले. त्यांनी नाही म्हटले, निदान चहा तरी घ्या. तरीही त्यांनी नाहीच म्हटले. गप्पागोष्टीत रात्रीचे साडेनऊ केव्हा वाजले ते कळलेसुद्धा नाही. आणि मुंबई-शिर्डी डायरेक्ट गाडी त्या दिवशी थोड्याशा रिपेरिंगसाठी स्टॅण्डवर आली.

आम्ही अवाक झालो. कंडक्टरला भेटून विनंती केली. त्यांनी घेऊन जायचे कबूल केले. आमच्या संगती ते बाबासुद्धा गाडीत चढले. खूप गर्दी असल्यामुळे उभ्यानेच प्रवास होता, आणि ठीक १२ वाजता शिर्डीला पोहोचलो. गाडीतून उतरल्यानंतर बाबांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गाडीजवळ त्यांची उतरण्याची वाट पाहू लागलो. पण ते म्हातारे बाबा गाडीतून उतरताना दिसलेच नाहीत. दुसऱ्या दिवशी आम्ही त्यांचा खूप शोध घेतला; परंतु पुन्हा दिसलेच नाहीत.

भक्तांची काळजी दूर करण्यासाठी साईबाबा त्या म्हाताऱ्याच्या रूपाने आमच्या सहवासात राहिलेत. भेट होऊनही आम्ही त्यांना ओळखू शकलो नाहीं हेच खरे असा अनुभव देणाऱ्या साईबाबांना शतशः प्रणाम ! !

॥ ॐ श्रीसाईनाथसमर्थ । जय जय साईसमर्थ ॥

# अशक्य ते शक्य श्रीसाईकृपेने–

—श्री. उज्ज्वल वामनराव कुळकर्णी
८९६/१ तांबोळी गल्ली, नंदुरबार, जि. धुळे

● भोपाळला राहणारी माझी मावस बहीण व तिचे पती श्रीसाई माऊलीचे दर्शन घेऊन आमच्याकडे आले. श्रीसाईकृपेच्या गोष्टी निघाल्या तेव्हा माझ्या बहिणीने कल्पितापेक्षा सत्य किती आगळे असू शकते हे सार्थ ठरविणारा श्रीसाई-कृपेचा स्वानुभव सांगितला. तो तिच्याच शब्दात असा–

मी व माझे पती भाच्याच्या मुंजीकरिता भोपाळहून दुगला गेलो. बरेच दिवसात बहिणीची भेट नसल्याने सहाजिकच ओढ जास्त होती. घाईघाईने आवरा-आवर करून आम्ही निघून गेलो. मुंज आनंदात पार पडली. दिवस कसे भुर्कन् उडून गेले. साश्रू नयनांनी निरोप घेतला. परतीचा प्रवास सुरू झाला. आपल्यापुढे कोणते संकट वाढून ठेवले आहे याची तेव्हा मात्र कल्पना तीळमात्र नव्हती.

आमचा बंगला वस्तीच्या एका टोकाशीच आहे. टेम्पो करुन बंगल्याच्या कंपाऊंडपर्यंत आलो. तो काय ! घराचे कुलूप बदललेले आणि त्यास सील मारलेले. तोच शेजारचे गृहस्थ आले. त्यांनी प्रथम आम्हास त्यांच्या घरात नेऊन पाणी पाजले, चहा दिला. परंतु ते काही बोलेनात. तेव्हा ह्यानीच विचारले, का हो घराला सील कसे ? चोरी वगैरे तर झाली नाही ना ?' शेजारच्यानी त्यावर खुलासा केला की आम्ही गावाला गेल्यावर तिसऱ्या दिवशी रात्री घरात चोरी झाली. पोलीस सील मारून गेले आहेत.

हे ऐकताच मी मात्र हाय खाल्ली. सारा संसार आता उध्वस्त होणार या कल्पनेने गर्भगळीत झाले. हे पण सुन्न झाले परंतु म्हणाले, "साईकृपेने काय वाचलंय ते तर पाहू' पुढे पोलिसाने कुलूप उघडले. धडधडत्या अंतःकरणाने आम्ही आत प्रवेश केला. सारी खोली अस्ताव्यस्त केलेली. उशांचा कापूस, गादीचा कापूस खोली-भर. एकही ट्रंक घरात नाही. पंखा नाही. स्टीलची भांडी नाहीत. आणि अचानक मला आठवलं की माझे पाच तोळ्याचे सोन्याचे तोडे व चांदीचं जुने वजनदार ताट बँकेत न ठेवता कपाटातच ठेवलं होतं. क्षणभर माझं हृदय थांबलच म्हणा ना ! मी कपाट उघडलं. माझ्या सात आठ साड्या नव्हत्या. मी आतल्या खणात हात घातला. आश्चर्याने वेडी व्हायचीच वेळ ती. चांदीचे ताट व तोडे जिथल्या तिथे. ही साईकृपाच म्हणायची ! मनाला समजावून व्यवहार सुरू झाला अन् अचानक एक दिवस पोलीस इन्स्पेक्टरने निरोप पाठविला की तुमचं काही सामान सापडलय, ओळख

फटवून घेऊन जा. पोलीसचौकीत पंखा, चार-पाच साड्या, नाल्यात फेकलेल्या ट्रंका, स्टीलची काही भांडी सुखरूप मिळाली. श्रीसाईवर माझी व माझ्या पतीची नितांत श्रद्धा ह्याचेच हे फळ ! श्रीसाईकृपेनेच माझ्या संसारात सौख्य आलं नाहीतर काय झालं असतं ह्याचा विचार न केलेलाच बरा !

साईभक्त श्री. वामनराव विचोरे व सौ. कुमुद विचोरे ह्यांच्या आयुष्यातील हा साईकृपेचा अनुभव म्हणजे श्रीसाईकृपेचा जिवंत पुरावाच होय.

*

## बाबा आणि माझा विवाह

—श्री. प्रकाश ज. देवकुळे
३९ भवानी पेठ, सातारा ४१५००२

सद्‌गुरु साईबाबांच्या चरणी भक्ती होण्यास एक क्षुल्लक घटना घडली. साधारणतः १९६५–६६ साली एका सिनेमा संगीताची पुस्तके मिळण्याच्या दुकानात इतर पुस्तकांबरोबर 'श्रीसाईबाबांचे' एक पुस्तक दिसले. सहज कुतुहलाने ते घेतले. वाचत असताना त्यात त्यांच्या इतर भक्तीप्रकारांबरोबर संकट निवारणासाठी किंवा इच्छापूर्तीसाठी काही मार्गदर्शन होते. आपला रोजच्या जेवणातील एक आवडता पदार्थ खाण्याचे सोडल्यास बाबा भक्तांची इच्छा हमखास पूर्ण करतात असे लिहिले होते. त्यावेळी मी माझे लग्न करण्याच्या योजनेत होतो. आंतरजातीय विवाह असल्याने व तो कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होणे आवश्यक असल्याने कोणतेही उपाय करण्यास मी तयार होतो. त्याप्रमाणे मी रोजच्या जेवणातील आवडता पदार्थ पोळी खाण्याचे सोडले व कटाक्षाने पाळले. या व्यतिरिक्त बाबांची कोणतीहि अधिक सेवा अगर भक्ती केली नाही. . फक्त एकच निश्चय केला की लग्न यशस्वी होवू दे म्हणजे शिर्डीला येवून पूजा करून मगच तो पदार्थ खाईन असे होता होता. १९६८ साल उजाडले लग्न अतिशय प्रतिकूल परिस्थितीत होणार होते तेही आंतर-जातीय त्यामुळे समोर पूर्ण अंधार होता. सर्वजण नाऊमेद करत होते. वयही फार पोक्त नव्हते पण काही प्रामाणिक हेतूसाठी हे धाडस केले. सतत तोच ध्यास होता. असाच एके दिवशी पुण्याला एका मित्राकडे ह्याच कामासाठी गेलो असताना मित्राच्या छोटया बहिणी पळत माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या की, "प्रकाश दादा लवकर चल खाली बघ कोण बुवा आला आहे !" नाईलाजाने गॅलरीत जाऊन पाहिले तर खाली रस्त्यावर, अक्षरशः बाबांसारखे कपडे घातलेला एक माणूस उभा

होता. तो म्हणाला की, "बाबाको चाय पिलाव" म्हणून मी वरून पैसे टाकले. तेव्हा लगेच म्हणाला की, "जो तेरे मन में है वो हो जायेगा!" मी ते ऐकल्याबरोबर एकदम जाग आल्यासारखे वाटले. पुन्हा पाहिले तर कुठेही दिसला नाही. खाली रस्त्यावर जावून आजूबाजूला पाहिले तर कुठेही दिसला नाही. मनाला रुखरुख लागली नंतर थोड्याच दिवसात माझे लग्न यशस्वीपणे पार पडले. तेव्हा लगेच आठवण झाली की बाबा आपल्याला आधीच आशीर्वाद देऊन गेले. मन कृतज्ञतेने भरून आले. आज माझा संसार पूर्ण समाधानी आहे. प्रत्येकवेळी वाटते की, श्री श्रीबाबांनी मनाच्या अत्यंत अस्वस्थ क्षणी येऊन धीर दिला. त्यामुळेच हे सुखासमाधानाचे दिवस दिसले.

त्यानंतरचा लग्नाबद्दलचा नवस पूर्ण करण्यासाठी एका मित्रास घेऊन शिर्डीला गेलो. श्रीबाबांच्या समाधीचे दर्शन झाल्यावर इतका आनंद झाला की अश्रू येऊ लागले. तेथून निघावेसे वाटेनाच. पण त्याच दिवशी परत येणे अत्यंत आवश्यक होते. स्टॅण्डवर गेल्यावर कळले की ३ वाजताची गाडी आधीच निघून गेली. मन एकदम निराश झाले. शिर्डी सोडवेना आणि राहणे अशक्य होते. त्यामुळे मन द्विधा झाले. बाबांना म्हटले, "बाबा आज जावूदे पुन्हा खूप वेळ काढून येईन." स्टॅण्डवर गर्दी वाढू लागली. दुपारी ३ ची गाडी कशी कोणजाणे आधीच गेलेली. त्यामुळे एखादी व्हाया जाणारी गाडी मिळविण्यासाठी प्रत्येकजण तयारीत होता, आणि थोड्याच वेळात धुळे—पुणे गाडी आली. अगदी पूर्ण भरलेली. कंडक्टर म्हणाला, अजिबात उभे राहण्यासही जागा नाही. तेवढ्यात चमत्कार असा झाला की, त्या गाडीतले दोघेजण शिर्डीचा बोर्ड पाहून उतरले आणि आम्हाला म्हणाले की, आम्ही आता अचानक साईबाबांच्या दर्शनास रहाण्याचे ठरविले आहे. आमची तिकीटे घेता का? आम्ही तर तयारच होतो. त्यांनी कंडक्टरला विनंती केली व त्यानेही मानली. त्यांची तिकिटे आम्ही घेऊन त्यांना शिर्डी-पुणे अंतराचे पैसे दिले व आरामात गाडीत जावून बसलो. आणि आम्हाला दोघांनाच घेऊन गाडी निघाली व आम्ही यथावकाश सातार्‍याला सुखरुप आलो. आता या चमत्काराला काय उत्तर? नेहमीची गाडी चुकते काय? खात्री नसताना दुसरी गाडी येते काय? एकाची तिकिटे दुसर्‍याला चालत नसताना दोघेच उतरून कंडक्टरच्या परवानगीने तिकिटे देतात काय? आणि आम्हा दोघांनाच घेऊन गाडी निघते ह्याला उत्तर काय? श्रीबाबांनाच काळजी असल्याने त्यांनी सुखरुप पोहोचविले.

सध्या बाबांच्या चिंतनाशिवाय एकही दिवस जात नाही. सद्गुरुबाबांवर सर्व भार टाकून दिला आहे. रोजच्या संसारातील अडचणी असोत. संकटे असोत किंवा कोणतेही काम असो. सुखदुखःच्या प्रत्येकक्षणी आम्ही श्रीबाबांच्या चरणी शरण असतो. प्रत्येक प्रसंगी ते आधार आणि आत्मविश्वास देतात.

# – साईनाथ के हजारो हाथ –

● श्री. मनुभाई शाह
राममंदिरासमोर, नवापूर, जि. धुळे

● तारीख ८–८–७७ चा दिवस. संध्याकाळच्या वेळी म्हसावदच्या घरी खुर्चीवर बसल्या बसल्या वाचन करीत होतो. (सौ. नोकरीनिमित्ताने म्हसावदला असते.) समोरच्या भिंतीवर असलेल्या बाबांच्या 'आशिर्वाद' फोटोकडे माझे लक्ष गेले आणि त्याचवेळी माझ्या तोंडून पाच–सहा महिन्यापूर्वी पाहिलेल्या 'शिरडीके साईबाबा' चित्रपटातील 'साईनाथ के हजारो हाथ' ही ओळ नकळत निघाली. मग ह्या ओळीने मनाचा कबजा घेतला आणि पुन्हा पुन्हा ती ओळ म्हणू लागलो. माझ्या बरोबरच सौभाग्यवती व मुलांच्याही तोंडूनसुद्धा ती ओळ म्हटली जाऊ लागली.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ता. ९–८–७७ मंगळवारी सकाळी अंथरुणातून उठतेवेळी माझी पावणेतीन वर्षाची सर्वात लहान मुलगी वैशालीने मला प्रश्न विचारला, "पप्पा! 'साईनाथ के हजारो हाथ' एम कहेवानुने ? (असं म्हणायचं ना?)" वैशाली मराठी–गुजराथी या दोन्ही भाषा उत्तम प्रकारे बोलू शकते.

"बरोबर! शाब्बास" म्हणून तिला उत्तेजन दिलं, आणि मग तर त्या ओळीची धूनच सुरू केली. त्या दिवशी दुपारच्या एस. टी. ने आम्हाला बाहेरगावी जायचे होते. एका लहानशा फाट्याच्या रस्त्यावर एस. टी. ची वाट पहात आम्ही उभे होतो. त्यावेळी त्याठिकाणी पन्नास–साठ प्रवासी होते.

माझी पत्नी सौ. मंदा रस्त्याच्या एका बाजूला इतर स्त्रियांबरोबर बसली होती. मी पाच–सात माणसांसोबत रस्त्याच्या विरुद्ध दिशेला चाळीस–पन्नास फूट दूर उभा होतो. माझ्याबरोबरीने उभी असलेली माणसे साईभक्त असल्याने साहजिकच आमचा गप्पागोष्टीचा विषय 'साईलीला'च होता.

रस्त्याच्या एका बाजूला मी आणि दुसऱ्या बाजूला सौ. गप्पागोष्टीत इतके दंग होतो की, चि. वैशालीकडे आमचे लक्षच नव्हते. आमचे जरी लक्ष नव्हते परंतु बाबांचे तर होतेच.

घटना अशी झाली की, खेळता खेळता वैशालीचे लक्ष माझ्याकडे वळले आणि तिने माझ्याकडे येण्याचा विचार केला. म्हणून रस्ता ओलांडून मी उभा होतो त्या ठिकाणी यायला निघाली.

रस्त्याच्या मध्यभागी ती आली इतक्यात मोठा आवाज करीत एक मोटार-सायकल (फटफटी) येताना तिने पाहिली ती भीतीने घाबरली. मोटारसायकल चालविणाऱ्याचेही तिच्याकडे लक्ष नव्हते.

वैशाली घाबरल्यामुळे मी ज्याठिकाणी उभा होतो त्या दिशेनेच ती निघाली होती परंतु ऐनवेळी तिचा विचार बदलल्यामुळे सौ. उभी होती त्या बाजूला पळायला लागली आणि मोटारसायकलवर आदळली. आमचे लक्ष जाताच मी मनातून घाबरलो. डोळ्यासमोर अंधारी आली. त्याठिकाणी उभी असलेली माणसे ओरडली. 'खलास'

माझ्या तोंडून तर शब्दही फुटत नव्हता. थोडा सावरल्यावर मी "वैशु वैशु !! म्हणून धावलो. माझ्या फुलासारख्या कोमल मुलीला काय झाले असेल ! खरोखर वैशु खलास झाली असेल का ? किंवा फार जखमी झाली असेल ? कुठं लागलं असेल ? डोळयाना तर इजा पोहचली नसेल ना ? अशा अनेक कुशंका मनात घर करून होत्या आणि दुसऱ्याच क्षणी—

एवढ्या भरपूर वेगाने येणारी फटफटी त्याच ठिकाणी थांबली होती जणू जमिनीलाच चिकटून गेली होती. मी चटकन् त्याठिकाणी पोहोचलो. कोणीतरी वैशालीला माझ्या हातात दिली. काही क्षणातच माझी नजर तिच्या सर्वांगावर फिरली. आणि मी काय पाहातो– शरीरावर जखमेचे नाममात्र चिन्ह नव्हते. डोळे तपासून पाहिले, हातपाय हलवून पाहिले. सर्व व्यवस्थित होते.

म्हणजेच वैशु सहीसलामत वाचली होती. नाही बाबाच त्यावेळी धावून आले होते. फुलासारख्या मुलीला काहीच इजा न होता वाचवली होती. फटफटी थांबली नव्हती पण बाबांनीच थांबवली होती, हजारो हातांपैकी दोन हातांचा उपयोग करून त्यापैकी एका हाताने फटफटी मजबूत पकडली आणि एक इंचसुद्धा जागेवरून हलू दिली नाही. आणि दुसऱ्या हाताने वैशुला धरून मागे खेचून ओढले. पण यात काही आश्चर्य नाही कारण—

**'कौन छुएगा उसकी परछांई रे**
**जिसको बचानेवाला साई !'**

बाबा, आम्ही मूर्ख, अज्ञान प्राणी ! तुझ्या लीलांना आम्ही काय ओळखू शकणार ? फुकट फुलून जाणारे आम्ही ! तुझ्या दर्शनाला येऊन तुझ्यावर उपकार करतो याप्रमाणे अभिमान बाळगणारे आम्ही अधम प्राणी ! तरीही तू दयाळू होऊन आमच्यावर प्रेमभाव ठेवतोस.

बाबा तुझे उपकार आम्ही कसे मानावेत. कितीही शब्द वापरले तरी ते अपूर्णच पडतील. म्हणूनच हेमाडपंताचे शब्द आठवतात की, 'गुरुमहाराज! साई, तुम्हाला अंजली अर्पण करणे म्हणजे समुद्रातून ओंजळभर पाणी घेऊन ते समुद्रालाच अर्पण करण्यासारखे होय' म्हणूनच तुझे वर्णन करण्यास मी असमर्थ आहे.

'साईनाथके हजारो हाथ' भजनाचा प्रत्यक्ष अनुभव आम्हाला त्या दिवशी आला. बाबा तुझ्या हजारो हातापैकी एक हात तुझ्या या बालकावर सदैव असू दे!

# शिर्डी माझे पंढरपूर

● श्री. सूर्यकांत माधवराव गर्जे
८० शिवाजीनगर, पुणे–५

● ता. २७ जून १९७७ चा दिवस. आषाढी एकादशीचा परम पावन दिन. विशेषतः विठ्ठल-भक्तांचा परमानंद सांधणारा हा एक महान दिवस. आज तर पंढरपूरात लक्षावधि भक्त जमलेले असणार. भक्तीच्या महासागरात, विठ्ठलाच्या नाम-संकीर्तनात पंढरी डुंबत असणार.

योगायोगाची गोष्ट. नेमका याच दिवशी श्रीबाबांच्या दर्शनासाठी मी शिर्डीला आलो होतो. मनाला कमालीची प्रसन्नता वाटत होती. पहाटे श्रीबाबांना अभ्यंग-स्नान घातल्यापासून तर सर्वत्र, चराचरातून मांगल्य भरून उरले आहे असे जाणवत होते. एकादशीचा उपवास असल्याने मन कसे हलके-फुलके झाले होते. द्वारकामाईत श्रीबाबांच्या प्रतिमेसमोर धुनीच्या आसऱ्याने बसल्यावर मन श्रीबाबांवरील गाढ प्रेमाने भारावून जात होते. अधिकच मवाळ होत होते.

दुपारचे १२ वाजले होते. समाधी मंदीरात आबाल-वृद्ध भक्त-मंडळी दाटी-वाटीने उभी होती. श्रीबाबांच्या समाधी समोर आरतीची तयारी चालू झाली. निरांजने पेटविण्यात आली. ज्योती तेवू लागल्या. उदबत्यांचा घमघमाट सर्वत्र पसरला. अग्नीत धूप टाकला की, धूपांची वलये श्रीबाबांच्या अवती-भवती पसरत

होती. भालदार चोपदार हाती मानदंड घेऊन उभे होते. पेटी-तबला यांचे सूर जुळविण्यात येत होते. मी सर्वात पुढे. समाधी जवळील कठड्याला धरून उभा होतो. त्यामुळे सर्व काही मी जवळून पहात होतो. बारकाईने न्याहळत होतो. इतक्यात तेथील एक पुजारी श्री. उद्धवराव समाधी मंदीराच्या पायऱ्या चढून श्रीबाबांच्या मूर्ती पुढे उभे राहिले व श्रीबाबांच्या कपाळावर अष्टगंधाचा त्रिपुंड्र काढला. नंतर गुलाल (कुंकु) बुक्का यांच्या वाटीत दोन बोटे बुडवून त्रिपुंड्राच्या मधोमध दोन टिळे उमटविले परंतु दोन्ही टिळे बुक्क्याचेच उमटले होते. श्री. उद्धवरावांनी हात धुतला व पुन्हा कुंकु व बुक्का यांचा टिळा श्रीबाबांच्या कपाळावर काढण्याचा प्रयत्न केला. पण याहि वेळेस दोन्ही टिळे काळे बुक्क्यांचेच उमटले. डोळयात तेल घालून मी हे सर्व पहात होतो. पुन्हा प्रयत्न न करता थोडे निराश होऊन पुजारी उतरून खाली आले. सर्व लोक श्वास रोखून आरतीसाठी उभे होते. घंटी किण-किणली आणि आरतीला सुरूवात झाली.

माझे मन सुखावत होते. आनंदाने उचंबळून येत होते. आरती चालु असताना मी श्रीबाबांच्या चेहऱ्याकडे एकटक पहात होतो. श्रीबाबांच्या बोलक्या हसतमुख चेहऱ्यावरील ते भाव व कपाळावरील बुक्क्यांचे ते दोन काळे टिळे मला बरेचसे काही सांगत होते.

आरती संपली. तीर्थ-प्रसाद वाटण्यात येत होता. पुजारी श्री. उद्धवराव यांना भेटून त्यांना गर्दीतून मी थोडे बाजूला नेले व म्हटले, 'गुरूजी, बाबांना कुंकु-बुक्का यांचा टिळा लावण्याचा तुम्ही दोनदा प्रयत्न केलात परंतु दोन्ही वेळेस कपाळावार बुक्काच उमटला. असे कां ?"

"बाबांची इच्छा !" श्री. उद्धवराव थोडेसे अवाक होवून उत्तरले.

"तसं नव्हे गुरुजी. आज आषाढी एकादशी आहे. पंढरपूरचे पंढरीनाथ आणि शिर्डीचे साईनाथ एकच असल्याचे श्रीबाबांनी दाखवून दिले. श्रीबाबा म्हणजे श्रीविठ्ठलाचेच अवतार आणि शिर्डी हेच पंढरपूर आहे असाच त्याचा अर्थ निघतो."

माझा खुलासा श्री. उद्धवरावांना पटला. शिर्डी येथेच दासगणू यांना श्रीबाबांनी विठ्ठलाचे दर्शन घडविल्याची घटना श्री. उद्धवरावांना सांगितली. श्रीबाबांचे लाडके भक्त शामा उर्फ माधवराव देशपांडे यांचेच चिरंजीव श्री. उद्धवराव.

श्री. उद्धवराव देशपांडे व मी श्रीबाबांच्या समाधी समोर उभे राहिलो. श्री बाबांचे ते रूप डोळे भरून पहात राहिलो आणि त्या श्रीविठ्ठलाला, श्री पांडुरंगाला साष्टांग प्रणिपात केला.

# 'तरी मी धावेन भक्तांसाठी'

—श्री. शं. ग. सारंगधर
अ/८ साईकुटीर, डहाणूकरवाडी,
कांदिवली (पश्चिम) मुंबई ६७

* गेली २५ वर्षे यथामति मी श्रीसाईबाबांची भक्ति करतो. मला कधी स्वप्नात दृष्टांत वगैरे झाला नाही. पण अदृश्यपणे अनेकदा श्रीबाबांनी संकटात माझें रक्षण केले आहे.

१४ वर्षापूर्वीचा प्रसंग आहे. मुंबईतील एका मोठ्या बँकेत मी नोकरीस होतो व त्यावेळी अकाउंटंटच्या हुद्यावर काम करीत होतो. शहरात आमच्या बँकेच्या अनेक शाखा आहेत. मोठ्या व्यापारी केंद्रातील एक शाखा म्हणजे आमच्या बँकेच्या युनियनचे लढाऊ केंद्रस्थान होते. त्यामुळे तेथील वरचा अधिकारी-वर्ग नेहमी त्रस्त असे. तेथील अकाउंटंट बदलीसाठी सारखा प्रयत्न करीत होता. पण तेथे आपला कोणी राजी नसल्याने त्याला बदली मिळत नव्हती.

बदलीचे हुकूम आमच्या ज्या वरच्या ऑफिसातून निघत तेथील मॅनेजर रजेवर गेल्याची संधी साधून काही हितसंबंधी आपमतलबी अधिकाऱ्यानी माझी त्या शाखेत बदली केल्याचा हुकूम काढला. मला तेथे पाठवू नये म्हणून मी विनंती केली. माझ्या बऱ्याच मित्रांनी–यात युनियनमध्ये काम करणारेसुद्धा होते––मी तेथे विनंती अव्हेरून बदली हुकूम मागे घेण्यास नकार दिला गेला. मी अगदी आगतिक झालो होतो.

मी कामाला घाबरत नव्हतो. पण त्या शाखेतील कामाची परिस्थिती पार बिघडून गेलेली होती. शिलकी काम इतकं तुंबलं होतं की त्याला मर्यादाच नव्हती त्यामुळे सर्वजण वैतागून गेले होते. मुकाट्याने काम करीत रहाण्याच्या माझ्या स्वभामुळे माझा तेथे निभाव लागणे शक्यच नव्हता. पण सुटकेचा काहीच मार्ग सापडत नव्हता. बदलीसाठी स्मरणपत्रे येत होती. या ना त्या कारणासाठी मी आजचं मरण उद्यावर टाकण्याचा प्रयत्न करीत होतो व श्रीबाबांनी मला या संकटातून वाचवावं म्हणून सतत त्यांचा धावा करीत होतो.

श्रीबाबांनी माझा धावा ऐकला. श्रीबाबांना माझी करुणा आली. रजेवर गेलेले मॅनेजरसाहेब रजा संपवून परत आले. माझ्या बदलीचे प्रकरण त्यांच्या नजरेस येताच

ते म्हणाले, 'इस बेचारेको क्यों उधर भेजते हो ? और कोई नहीं मिला ? No, I will not transfer him there. I am filing this case मला व आमच्या शाखेला आणि त्या शाखेला त्याप्रमाणे कळवून त्यांनी ते प्रकरण निकालात काढले. माझा जीव भांड्यात पडला. ही साईबाबांची कृपा नव्हे काय ?

दुसरा प्रसंग त्याच वेळचा आहे. माझ्या बदलीची पूर्व तयारी म्हणून मी ज्या जागेवर काम करीत होतो तेथून उचलून मला Current Account Section मध्ये पाठविले. तेथे काम करीत असताना एक दिवस सकाळी ११–११॥ च्या सुमारास एक माणूस एका लेजर क्लार्ककडे काऊंटरवर वटवण्यासाठी २४५० रुपयांचा एक चेक घेऊन आला. चेक बॉल पेनने लिहिलेला असल्याने टोकन देण्यापूर्वी तो क्लार्क चेक घेऊन माझ्याकडे आला व मी तो चेक पास करणार का म्हणून विचारू लागला. कारण बॉलपेनने चेक लिहायला उत्तेजन देऊ नये असे रिझर्व्ह बँकेकडून त्यावेळेस एक परिपत्रक आले होते. डिपार्टमेंटची असा चेक पास करण्याबाबत काय पद्धत आहे हे विचारण्यासाठी तो चेक घेऊन मी पूर्वी त्या डिपार्टमेंटमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्याकडे गेलो. क्लार्कही माझ्याबरोबरच होता. असे चेक पास करावे व पार्टीला बॉल–पेनने चेक न लिहिण्याविषयी विनंती करावी अशी पद्धत असल्याचे सांगण्यात आले.

काऊंटरवरचा तो माणूस आमच्या या हालचाली पहात होता. लेजर क्लार्क टोकन देण्यासाठी आपल्या जागेवर जाण्यापूर्वीच तो माणूस बँकेतून निघून गेला होता.

२॥ वाजता बँक बंद झाली. ४ वाजेपर्यंतही तो माणूस परत आला नाही म्हणून आम्ही ज्या पार्टीने तो चेक काढला होता त्यांना टेलीफोन केला. त्यांच्याकडून आलेले उत्तर ऐकून आम्ही सारे हादरूनच गेलो. कारण त्या पार्टीने तो चेक क्रॉस व ऑर्डर असा फक्त २० रुपयांचाच काढला होता.

असे चेक तपासण्यासाठी बँकेत असलेले मशीन दुर्दैवाने नेमके त्यावेळेस नादुरुस्त होते. ताबडतोब आमच्या शेजारच्या शाखेत जाऊन तेथील मशीनमध्ये तो चेक तपासता चेक वरील सही सोडून बाकी सर्व मजकूर केमिकलने बदलून टाकण्यात आल्याचे आढळले. यावेळीही अदृश्यपणे श्रीबाबांनीच मला वाचविले नाही का ?

# —: प्रचिति :—

श्री. ज. प्र. देशमुख
मुळे वाडा. घ. नं. ३३१८
माणकेश्वर गल्ली, अहमदनगर

● मला एकच मुलगा आहे. आज मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत उच्चस्थानावर बाबांच्या कृपेने आहे. माझी पत्नी ही स्वामी समर्थांच्या कृपेतील सबनीस घराण्यातील अक्कलकोटची. मुलाचा विवाह झाला. सौभाग्यवतीने स्वामींचे चरणांजवळ विनंती केली की मला नात द्या. माझ्या घरात कन्या नाही. आणि खरोखरीच श्रावण शु. ८ दुर्गाष्टमी शके १८८७ ( ४ ऑगष्ट १९६५ मंगळवार ) या दिवशी घरात ज्योत लागली. लाडकी नात आजीच्या मांडीवर दिवसभर खेळत असे. परंतु अचानक एके दिवशी आपल्या पत्नी आणि कन्येसह माझा मुलगा मोटारने पणजीहून फोंड्यास जात असता गाडी बंद पडली. काही केल्या सुरु होईना. इतक्यात एक वृद्ध गृहस्थ तेथे येऊन म्हणाला की, "पोरा गाडी मागें घे." आणि काय आश्चर्य. मुलाने स्टार्टर दाबताच गाडी सुरु झाली. रिव्हर्स घेऊन गाडीवळवावी आणि त्या वृद्धास कोठे जावयाचे म्हणून विचारण्यास उतरतो. तर तेथे कोणीही नाही. त्याच दिवशी करकरीत तिन्हीसांजा नातीने डोळे फिरविले. आम्ही सर्व घाबरून गेलो. पळत जाऊन तेथील सुप्रसिद्ध धन्वंतरी कै. गोविंदराव वैद्य यांचेकडे गेलो. त्यांना हृदय विकार असूनही तत्काळ ते निघाले. मुलीला तपासले. क्षणा क्षणाला उत्सुकता वाढत होती. जास्त काहीही ते बोलले नाहीत परंतु औषध दिले. आम्ही काय ते उमगलो. माझेही मन निराश झाले, आणि मी अचानक पत्नीचे मांडीवरून मुलीला उचलून माझ्या घरात असलेल्या स्वामी समर्थांचे छबीसमोर जमिनीवर ठेवली. त्या छबी शेजारीच श्रीसाईनाथांची छबी लावली होती. सहज माझ्या तोंडून शब्द गेले. "स्वामी, तुम्ही यजुर्वेदी काश्यप गोत्री" अक्कलकोटचे सबनीसही यजुर्वेदी काश्यप गोत्री एका परीने आपण माहेरवासिणीस माझ्या पत्नीस-दिलेले दान कसे परत घेता ? माझी नात मला परत दिलीत तर-तर मी (कां म्हणालो कोणास ठाऊक) शिरडीस बाबांचे चरणावर मुलीला घालीन. आणि अर्धा-एक मिनिट झाले असेल माझ्या नातीने डोळे उघडले. मी जमिनीवरून पोटाशी धरली. ती हळूहळू ओठ हालवू लागली. आणि काय आश्चर्य, तिने पहिला शब्द उच्चारला तो ब्ब...ब्ब...बब्ब...बाबा...

आज ती नात ठाण्यास एका मोठ्या शाळेत शिकत आहे. आणि प्रत्येक विषयात शेकडा ९२ च्या पुढे मार्क घेत आहे.

हे येथेच संपलेले नाही. योग्यवेळी पुढे आम्ही शिरडीस दर्शनास गेलो. मी अगदी पुढे उजवे बाजूस कठड्याजवळ उभा होतो. सौ. स्त्रियांचे घोळक्यात डावे-बाजूस होती. चिरंजीव, सून व नात हे गर्दी नको म्हणून सभामंडपाचे बाहेर उघड्या चौकात ओट्यावर होते. आरतीची वेळ भरत आली. इतक्यात आरती होईपर्यंत मौन पाळणारे (बहुधा श्री. देशपांडे नावाचे) एक गृहस्थ सोवळयाने समाधीपासून पळत बाहेर गेले. मुलाचे कडेवरून नातीस ओढून घेतले, आणि पळत येऊन बाबांचे चरणांवर व समाधीवर नातीस लोळवून एक पेढा तिच्या तोंडात कोंबला. माझ्याकडे इतक्या गर्दीत पाहून मला जवळ ओढले, आणि नात हवाली केली. आम्ही सर्व अचंब्याने पाहू लागलो. पन्नास-साठ फुटावरून मुलगी ओढून बाबांचे पायावर घातली जाते आणि तिच्या आजोबास (मला) इतक्या गर्दीतून हुडकून त्यांच्या (माझ्या) हवाली केली जाते. कुणी सांगितले हे नाते ?

याला कुणी काहीही नाव द्या. पण त्या दिवसापासून आमच्या सर्व कुटुंबावर बाबांचे अतोनात प्रेम आहे.

आजही माझ्या मुलाच्या टेबलावर एकच छबी आहे. ती बा...बां...चीच.

कचेरीत खुर्चीवर बसण्यापूर्वी तो एकच क्षण त्या छबीकडे पहातो आणि कामास सुरुवात होते.

*


## वर्षातून पाच खास अंक प्रकाशित करणारे

# मराठीतील एकमेव मासिक श्रीसाईलीला

१) रामनवमी विशेषांक
२) श्री दत्तगुरू विशेषांक
३) श्री पुण्यतिथी विशेषांक
४) दिवाळी भक्त स्वानुभव विशेषांक
५) श्रीसाई काव्यबहार विशेषांक

वार्षिक वर्गणी अवघी सहा रुपये (ट. ह. सह)

# पूर्वार्ध—उत्तरार्ध

श्री. गजानन शंकर देशपांडे.
४१३।३० आश्रय बंगला,
मुकुंदनगर, पुणे ९

● शिर्डीला श्रीबाबांचे दर्शनाला व तेही सौ. आई वडील व माझे कुटुंबासहीत जाण्याचा बेत ठरत असतानाच माझी धाकटी मुलगी वय ५ वर्षे थोडीफार आजारी पडली. आमचा जाण्याचा बेत पुरा होतो किंवा नाही असे सर्वांना वाटू लागले होते. रजा वगैरे सर्व मंजूर होऊन कुठलीच दुसरी अडचण राहिली नव्हती, पण मुलीचा आजार वाढतच चालला होता. शेवटी मी एकट्यानेच या खेपेस शिरडीस जावे व नंतर सवडीने परत सगळयांनी जावे असे ठरत होते. तेव्हा मन भरून आले व सहजच आतील प्रेरणेने शब्द बाहेर पडले की "हे श्री साईनाथा ह्या खेपेस खरो-खरच सर्वांचे मनातून आपले दर्शनास यावयाची प्रचंड ओढ लागली असताना असे का व्हावे ? मला सर्वांना घेवून आपले दर्शन लाभ घेण्याची ओढ लागली आहे." आपली कृपा असेल तर आम्हाला दर्शन लाभ व्हावा कारण मला एकटयाला प्रथम दर्शन करून यावे हे मनाला पटेना.

प्रवासाला निघण्यास १-२ दिवस अजून अवकाश होता. वाट पहाण्याचे ठरले मुलीची तब्येत हळूहळू नॉर्मलवर आली व ज्या दिवशी प्रवासास निघावयाचे त्याचे आदले दिवसापासूनच तिला पूर्ण बरे वाटून ती खेळावयास लागली आमचे सर्वांचे डोळे पाणावले व प्रभूची माया काय असते ह्याची कल्पना आली. हे सर्व बाबांचे कृपा दृष्टीमुळे मात्र घडले. मुलीची तब्येत प्रवासास ठीक झाल्याचे पाहून परत घरात सर्वांचा उत्साह द्विगुणीत झाला. सर्वजण नवचैतन्याने तयारीला लागले. तयारी पूर्ण झाली एस. टी. बसची रिझर्वेशन तिकीटेही विनासायास मिळाली. पुणे ते शिर्डी हा आमचा प्रवास सुरु झाला. बसमध्ये माझ्या मुलीने त्रास तर दिला नाहीच परंतु शक्य तितकी तिने सर्वांची करमणूक केली तिचे वय ५ वर्षांचे असल्याने तिच्या मानाने प्रश्न व उत्तरे, हसणे खेळणे आजोबा आजीची टपला मारून चेष्टा करणे वगैरे क्रिडा करीत प्रवास पार पडला. तो वार बुधवार होता.

बुधवार दि. १५-८-१९७७ मुक्काम शिरडी, आनंदी व प्रसन्न वातावरण एक प्रचंड हूरहूर श्री बाबांचे दर्शनाची, सात्वीक ओढ त्या माऊलीची आणि तो क्षण आला... ते तेजोमय निर्मळ आणि सात्वीक दर्शन झाले. प्रथम दर्शन काय

आनंद वर्णावा मन अनेक भक्तांनी दुथडी भरून वाहत होते " समाधी मंदीर " एक अतूट नाते जडल्यासारखे वाटत होते. एक निराळाच अवर्णनीय सुगंध सर्वत्र मंदीरात दरवळत होता. श्रीबाबांचा समाधीस्पर्श एक अतुलनीय अनुभव वाटत होता. श्रीबाबांपुढे नतमस्तक होऊन घरुन (पुण्याहून) मुद्दाम करून नेलेली खिचडी व दही ह्याचा नैवेद्य दाखवला व जेवण करून घेतले. तो दिवस असाच पार पडला.

दुसरे दिवशी गुरुवार पहाटे लवकर उठून स्नान वगैरे आटोपून समाधी मंदीरात जाऊन बसलो. अभिषेकासाठी सार्वजनिक पास मिळाल्यामुळे ( सामूहीक अभिषेक ) अभिषेक आटोपून समाधीवर जाऊन श्रीबाबांचे पायावर डोके ठेवले तेव्हाच एक विलक्षण जिवंतपणा जाणवला. धन्य तू प्रभु ! आम्हा सर्वांचे उत्तम प्रकारे दर्शन झाले. मनोकामना पूर्ण झाली. माझी धाकटी मुलगी खूपच रमली, खूप खेळली. श्रीबाबांचे पायाशी डोके ठेवून तिनेही ह्या आजोबांचे दर्शन घेतले.

शुक्रवार परतीचा प्रवास सुरू झाला. मन मात्र मागे रेंगाळतच होते. जड पावलाने निघालो परत पुण्याला आणि येण्यासाठी परत शिरडीला. पुण्याला आल्यावर दोन दिवस खूपचे चांगले गेले आणि तिसऱ्या दिवशी धाकट्या मुलीला परत ताप भरला नंतर ती आठ–दहा दिवस आजारी होती. नंतर मात्र खडखडीत बरी झाली. शिरडीचे आजोबांची माहिती तिचे शब्दात ती इतर सवंगड्याना सांगते तेव्हा खात्री पटते की, श्रीबाबांनीच ८/१५ दिवसाचे तिचे होऊ घातलेले दुखणे मध्येच थांबवून आमची इच्छा परिपूर्ण केली व नंतर उत्तरार्ध–( दुखण्याचा ) पार पडून आमच्या मनातील दर्शनाची हूरहूर दूर केली श्रीबाबांचे कृपेने लाभलेले ते दिव्य दर्शन तो दरवळणारा सुगंध, मन भारावून टाकणारे ते समाधी मंदीर, ती प्रसन्न दयाळू बाबांची मूर्ती व नितांत रम्य, स्वच्छ शिरडीचा परीसर अजूनही आठवला की त्या खऱ्या घरी जायची ओढ विलक्षणपणे वाटू लागते आणि तेव्हाच श्रीबाबांचे एका वचनाची आठवण होते.

" शिरडीस ज्याचे लागतील पाय ।। टळती अपाय सर्व त्याचे ।। १ ।।

" धन्य ती माउली श्रीसाईनाथ माउली "

# ही तर खरंच बाबांची प्रचिती

श्री. विजय द. हजारे, एम. ए.
६, गुंफादर्शन फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली-(पूर्व) मुंबई नं. ६६

● आमची सौ. एल. एस. जी. डी. सरकारी डिप्लोमा परीक्षा पास झाली. आम्ही शिरडीला जाऊन आलो. नव्हे बाबांनीच आम्हाला त्यांच्या दर्शनाला नेलं...कारण...३१ मार्च १९७७ ! गुरवार होता तो ! सौ. वर्षाची परीक्षा सोमवार-पासून म्हणजे फक्त तीन दिवसावर येऊन ठेपली होती. जर ती परीक्षा पास झाली तर तिला एक " खास बढती " मिळणार होती. शिवाय एक प्रकारची डिग्री ! म्हणजे बढतीसाठी चान्स लागण्याचा संभव... कारण हा 'सरकारमान्य डिप्लोमा' म्हणजे तिच्यासारख्या सरकारी निमसरकारी नोकरांच्या दृष्टीनं 'बॉम्बे युनिव्हरसिटीच्या' एखाद्या डिग्रीप्रमाणेच होता. शिवाय आपल्या बाळंतपणाच्या सुटीतच तिनं परिक्षेला बसण्याची संधी घेतली होती. म्हणजे एका दगडात दोन पक्षी मारण्याचा तिचा विचार होता...पण...मनुष्याच्या जीवनात हा पण नेहमीच आडवा येत असतो. आणि त्यावेळीच दशदिशांना भरलेल्या परमेश्वराच्या अस्तित्वाची त्याला प्रचिती येते...वर्षाचे अगदी तसंच झालं. ठरलेल्या (डॉक्टरांनी दिलेल्या) तारखेच्या काही दिवस अगोदर बाळंत झाल्यामुळे काही महिने ती त्या 'डिप्लोमा' साठी असलेल्या 'सरकारमान्य क्लास' मध्ये हजर राहू शकली नाही. अर्थात तत्पूर्वी आणि नंतर जेवढे दिवस शक्य होतं तेवढे दिवस (तेवढी प्रेझेंटी–हजेरी) तिनं भरली होती. तरी-देखील सहा महिन्याच्या त्या डिप्लोमा कोर्ससाठी निदान 'साठ टक्के हजेरी' आव-श्यक होती. पण वर्षाची हजेरी भरली अवघी पन्नास टक्के ! त्यामुळे परीक्षेला बसण्यासाठी तिला परवानगी नाकारण्यात आली. आणि तिला ते कळलं ते परिक्षेला फक्त आठ दिवस असताना ! झालं आतापर्यंत आपल्या लहान बाळाला सोडून तिनं क्लासला जाण्याचे केलेले उपद्व्याप, मनलावून केलेला अभ्यास, त्यासाठी घरात केलेलं दुर्लक्ष सर्वांवर पाणी फिरायची वेळ आलेली. बिचारी अगदी रडकुं-डीला आली. परीक्षेला बसायला मिळालं तर पास होण्याचा आत्मविश्वास होता तिला पण 'नंबरच बोर्डावर' लागला नव्हता तर!

शेवटी तिनं त्या 'कोर्स'च्या प्रिन्सिपॉलची भेट घेतली. पण उपयोग झाला नाही. शेवटी ह्याला त्याला भेटून ती अगदी त्यांच्या डायरेक्टर, डेमोन्स्ट्रेटर पर्यंत जाऊन गयावया करून आली. पण काहीच उपयोग झाला नाही. सर्वांनी साफ नकार

दिला. " तुमच्याप्रमाणे बऱ्याचजणांचे विनंती अर्ज आले आहेत. तुम्हाला परवानगी दिली तर सर्वांनाच द्यावी लागेल आणि मग आमच्या 'रूलरेग्युलेशन्स्'चा काय फायदा ? असं म्हणून सर्वांनी तिला उडवून लावलं. शेवटचा प्रयत्न मी स्वतः तिच्या प्रिन्सिपॉलना भेटून आलो पण मला निराशच व्हावं लागलं. आणि निराश मनानं मी घरात प्रवेश केला. तो गुरुवार होता. जाताना 'बाबांच्या' तसविरीसमोर हात जोडून म्हटलं होतं की, " बाबा, वर्षाचं काम होऊ द्या, परीक्षेनंतर आम्ही शिरडीला तुमच्या दर्शनाला येऊ म्हणून ! "

माझा उतरलेला चेहरा पाहताच वर्षानं ओळखलं की, काम झालं नाही ते.

" बाबांनी आपली प्रार्थना ऐकली नाही." मी पुटपुटलो.

" कसले आले आहेत बाबा माझ्याच नशीबात नाही तर 'बाबा' काय करणार त्याला. त्याच्याच मनात नाही आपल्यावर कृपा करावयचं." वर्षाचा राग वैताग बाहेर पडला. वास्तविक बाबांवर तिची पूर्वीपासून खूप श्रद्धा होती. तरीदेखील तिनं असं बोलावं ह्याचं आश्चर्य वाटलं. " आपलं काही तरी चुकलं असेल. बाबांचा नवस वगैरे फेडला नसेल आपण नाहीतर असं होणार नाही कधी. बाबा कधीच रागावणार नाहीत " माझा अनुभव तोंडावाटे बाहेर पडला आजपर्यंतचा, आणि माझं मलाच आठवलं.

" बाबांची चांदीची मूर्ती आणायचं तू म्हटलं होतंस ना. पण दोन वर्षात जमलंच नाही आपल्याला. मी एवढं बोलतो न बोलतो तोच दारावरली बेल वाजली. आणि महदाश्चर्य ! कधी नव्हे तो दारात तारवाला उभा होता. आम्ही उभयता चरकलोच. कारण आयुष्यात पहिल्यांदाच तार येत होती आम्हाला ! धडधडत्या अंतःकरणात मी ती तार घेतली जरा साशंक मनानं [कारण तार आणि रात्री नऊ वाजता अवेळी म्हणजे वाईट बातमी अशी आमची समजूत ! पण तार वाचल्यानंतर माझ्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. साईकृपेच्या प्रचितीचे ! वर्षानं बाबांच्या फोटोसमोर उभं राहून आपल्या तोंडात मारून घेतलं आणि साईमाऊलीपुढे लोटांगण घातलं. 'साई तेरे हजारो हाथ' हे पटलं आम्हाला अक्षरशः ! कारण तारेत शब्द होते " यू आर परमिटेड टु ॲपीयर फॉर एक्झाम ! "

# साक्षात बाबांचीच साथ म्हणाना !

सौ. लुसी गंगाधर गुप्ते,
खारीबाव, रावपुरा, बडोदा

* ही गोष्ट सन १९६९ सालची, आम्ही त्यावेळी ठाण्याला माझ्या पुतणीच्या लग्नाकरिता गेलो होतो, त्यावेळी माझी धाकटी जाऊ सौ. पुष्पा आणि नणंद या दोघीनी शिरडीस जाण्याचे ठरवले. बायजी प्रथमच शिरडीला जात होती आणि सौ. पुष्पा अनेकवेळा शिरडीला जाऊन आलेली होती. तेव्हा त्या दोघीच श्रीबाबांच्या दर्शनाला गेल्या. संध्याकाळच्या बसने परत येताना नाशिकला त्यांची बस चांगलीच नादुरुस्त झाली आणि त्यांचा तिथे चार तास खोळंबा झाला. ठाण्याला जायला रात्र होणार म्हणून बायकोला काळजी वाटू लागली परंतु पुष्पाबाईचे माहेर ठाण्याचेच असल्यामुळे आपण रात्री केव्हाही पोहोचलो तरी मी तुम्हाला सुखरूप घरी नेईन असा तिने तिला धीर दिला. रात्रीचा बारा, साडेबाराचा सुमार झाल्यामुळे बसमधील थंड वाऱ्यामुळे पुष्पाबाईना डुलकी आली इतक्यात ठाण्याचे पॅसेंजर्स कोण खाहेत ? ठाणे आले असा पुकारा कंडक्टरने केला तशा त्या दोघीजणी खाली उतरल्या आणि बस निघून गेली. आता पुष्पाताईच्या डोळ्यावरील झोप पार उडाली आपण कुठे उतरलो तेच त्यांना कळेना. रात्र अंधारी, रस्त्याला दिवेही नाहीत० जिकडे तिकडे भयाण काळोख, निर्मनुष्य रस्ता, निस्तब्ध वातावरण—बायजीच्या तोंडून शब्द फुटेना. दोघींच्या अंगावर दागिने चांदण्याच्या अंधुक प्रकाशातही बायजीची हिऱ्याची कुडी चमकताना पाहून पुष्पा अधिकच घाबरली इतक्यात जरा दूर तिला दिव्याचा लुकलुकता प्रकाश दिसला त्या अनुरोधाने दोघी तिकडे गेल्या. ओटीवर एक वीस, बावीस वर्षाचा तरुण उभा होता. पुष्पाने विचारले आम्हाला एखादी टॅक्सी किंवा घोडागाडी इथे जवळपास मिळेल का. तर तो म्हणाला 'नाही अकरा वाजता पेट्रोल भरुन बहुतेक मोटारी गेल्या, तुम्ही एवढ्या रात्री कुठून आलात !" तो असे विचारतो आहे, तर आतून आवाज आला, 'गफूर कोण आहे रे !' 'गफूर' म्हणताच दोघी दचकल्या. म्हणजे हे मुसलमान आहेत तर इतक्यात आतून एक म्हातारा बाहेर आला आणि विचारू लागला अशा अपरात्री तुम्ही बाईमाणसं कुठून आलात तेव्हा पुष्पाने सांगितले की आम्ही श्रीसाईबाबांच्या दर्शनाला शिरडीला गेलो होतो पण वाटेत आमची बस बिघडली म्हणून हा उशीर झाला— आमचं काही चुकलं असेल म्हणून आम्ही अशा अडचणीत सापडलो. पण तुम्हीच आता बाबांच्या रूपाने भेटला आहात तर आम्हाला स्टेशनचा रस्ता दाखवा—अंधारामुळे कुठला

रस्ता ते कळत नाही. तो म्हणाला 'रस्ता कोपरीला जातो, हा रस्ता घंटाळीचा, हा रस्ता बॉम्बे आग्रारोड", तुम्हाला कुठला रस्ता पाहिजे. कोपरीला ग्रायजीची आत्या राहते तेव्हा आपण तिथे जाऊ असे ती म्हणाली. पण पुष्पाच्या मते तो रस्ता धोक्याचा होता म्हणून तिने स्टेशनकडे जाण्याचा मार्ग विचारला. "तुम्हाला कुठे गावाला जायचे आहे का असे त्याने विचारले, तर तिने सांगितले की, आम्ही ठाण्याचेच रहिवाशी आहोत. आणि त्रिलोकेकरांच्या वखारी जवळ आम्हाला जायचे आहे." मग पुष्पाच्या लक्षात आले की गावा बाहेरील चार रस्त्यावरील पेट्रोल पंपाजवळ आपल्याला बसमधून उतरवले आहे. मग तो म्हातारा म्हणाला, "चला. मी तुम्हाला पोहोचवायला येतो." त्याने गफूरला पेट्रोल पंप बंद करायला सांगितला आणि कंदील घेऊन ते दोघेजण घरापर्यंत पोहोचवायला आले. रस्ताभर सौ. पुष्पा 'तुम्ही आम्हाला साईबाबाच भेटलात असे सारखे म्हणत होती. घरी आल्यावर मात्र आपण केवढ्या मोठ्या संकटात सापडलो होतो ह्याची तिला जाणीव झाली आणि भीतिने अंगावर शहारे आले. अणि खरोखर बाबाच आपल्या मदतीला आले ह्याची तिला खात्री पटली.

# इच्छेप्रमाणे घडले

**श्री. स. मा. मुऱ्हार,**
**चंदननगर, मेडीकल रोड, नागपूर**

पुष्कळ दिवसापासून मनात होते की, एकवेळ तरी आपणास शिरडीच्या श्री साईबाबांचे दर्शनाचा योग यावा. परंतु सहज ते घडणे शक्य नव्हते. बरेच दिवस मनातले विचार मनातच राहून गेले. मनास श्रीसाईबाबांच्या दर्शनाची तळमळ लागलेली. संतही भक्तांच्या मनातील भाव जाणत असतातच. कदाचित् आम्हालाही दर्शनाचा योग यायचा असेल! ही गोष्ट १९७४, सालची एक मित्र अचानक एक दिवस माझेकडे आला आणि म्हणाला, अरे! उद्याला तू माझे बरोबरच चल, मला किल्ला दर्शनाला जायचे आहे. रायगडावर राज्याभिषेक आहे. तेव्हा शिवाजी महाराजांचे सर्व किल्ले पहावयास मिळतील व याच प्रवासात शिरडीही पहावयास मिळेल. तुझेही तिकीट राखून ठेवले आहे. मला आश्चर्यच वाटले आगाऊ सूचना न

देता असे कसे केले. मी म्हटले मला सुट्टी घ्यावी लागेल, पैशाची सोय करावी लागेल सर्व एकदम जमून येणे कठीण. त्यावर माझा मित्र म्हणाला, त्याची काही काळजी करू नको, फक्त सुट्टीचा अर्ज देऊन टाक. सुट्टी अठरा दिवसांची लागणार होती. मनात साईबाबांचे स्मरण करून कचेरीमधे गेलो. साहेबांना सर्व सविस्तर सांगितले. प्रथम त्यांनी थोडे आढेवेढे घेतले व थोड्याच वेळात सांगितले की, तुम्ही आपल्या कामाची जबाबदारी कोणावर सोपवीत असाल तर जाऊ शकता. तेव्हा मी माझे बरोबर काम करणाऱ्या लोकांना विचारले. सर्वांनी सांगितले आम्ही आपले काम सांभाळू. लागलीच मी एका माझे बरोबर काम करणाऱ्या माणसास साहेबाजवळ नेले व हा काम सांभाळण्याची जबाबदारी घेतो असे सांगितले. माझी सुट्टी मंजुर झाली व मला श्री साईबाबांच्या दर्शनाचा योग आला.

एक वेळ पुन्हा साईबाबांच्या दर्शनास जाण्याची इच्छा झाली. त्यावेळी साई-बाबांची काही पदे माझे हातून लिहिली गेली. ही पदे श्री साई चरणी अर्पण करावी असे मनात आले. तोही योग श्री साईकृपेने घडून आला. शिरडीस जायला मिळाले साईबाबांची पूजा केली, प्रसाद वाटला व दरबारात साईमूर्तीकडे तोंड करून थोडा वेळ मूर्ति अवलोकन केली. मूर्तिकडे पाहून मनात स्फूर्ती आली आणि कागद पेन घेऊन बाबांचे वर्णन काव्यमय लिहिले. सायंकाळी समाधी मंदिराच्या मागील निंबाच्या ओट्यावर बसलो. समोरच तीन वयस्कर माणसे बेंचवर बसलेली होती त्यांना हे काव्य दाखविण्याची इच्छा झाली. त्यांना ते काव्य चांगले वाटले. त्यांनी तसे बोलूनही दाखविले. दुसरे दिवशी त्याच निबां जवळील पाच खोल्यातील एका पस्तीस नंबरच्या खोलीत श्री साईनाथाच्या सहवासात राहिलेले एक भगवी वस्त्रे धारण केलेल्या महाराजाच्या दर्शनाचा लाभ झाला. त्यांनीही थोडा वेळ बसवून घेतले व साईबाबांची तुमच्यावर कृपा आहे तुम्ही त्यांची सेवा करता. त्याचा तुम्हाला आशिर्वाद आहे. मला नवल वाटले. आपण काही न बोलताना त्यांनी असे म्हट-ल्यावर त्यांनाही ते काव्य दाखविले. स्वामींनी समाधान व्यक्त केले. हीच सेवा नेहमी चालू ठेवा असे ते म्हणाले. त्याप्रमाणे सेवा चालू आहे. ते काव्य संस्थान मधे माझेकडून मागून घेतले व साईलीला मासिकात प्रकाशीत झाले व साईबाबांचा प्रसादरुपी अंक घरपोच आला.

पुनः एकदा श्रीसाईबाबांच्या दरबारात राहून तेथील अन्न भांडारातील प्रसाद न घेता खोलीवर स्वयंपाक करून आम्ही जेवण केले. मनात आले की, शिरडीस येऊन आपण भांडारातील प्रसाद घेतला नाही. तितक्यात एक गृहस्थ मला म्हणाले ' त्यांनी खिशात हात घातला व एक कागदाची पुडी काढली व हा घ्या भांडारातील प्रसाद असे म्हणून त्यांनी तो प्रसाद मला दिला व स्वतः थोडा खाल्ला. जे जे मनात आले ते ते श्रीसाईनाथ कृपेने घडून आले. हीच ती साईनाथांची कृपा.

★

# बाबांचे दिव्य दर्शन

● सौ. सरला गर्जे
८०, शिवाजीनगर पुणे ५

● गेल्या लेखक–कवि संमेलनाची गोष्ट! मलाही या संमेलनास जाण्याची सुवर्ण–संधी लाभली होती. एस. टी. ने शिरडीस जातांना एक सारखे माझे मन म्हणत होते की, संमेलनास बाबाही हजर रहातीलच, आणि त्यांच्या दर्शनास उत्कंठा मनास लागून राहिली होती.

मोठमोठी विद्वान मंडळी संमेलनास हजर होती. संमेलन मोठ्या दिव्य भक्ति–भावनेने हसत–खेळत पार पडले. दुसऱ्या दिवशी आम्ही दुपारी दोनच्या एस. टी. ने पुण्यास जाण्यास निघालो. गाडीत आमच्या गप्पा रंगात आल्या होत्या. गप्पांचा विषय दुसरा तिसरा कुठला नसून आपले परमपूज्य श्रीबाबा यांच्या अगाध लीला याबाबतच होता. गाडीने पुण्याच्या दिशेने वेग घेतला होता. आमच्या गप्पांनाही तितकीच गती आली होती.

आणि काय आश्चर्य! घारगावला अचानक एस. टी. थांबली. गाडी थांबली म्हणून एक इसम घारगावचे प्रसिद्ध मोठाले पेढे गाडीत येऊन विकू लागला. मी मुलांना घरी खाऊ न्यावा म्हणून पावशेर पेढे खरेदी केले. पेढेवाला निघून गेला. इतक्यात समोरच्या हिरव्याशार झाडीतून एक दिव्य महाराजांची स्वारी येऊ लागली. पांढरी शुभ्र लांब दाढी, डोक्यास भगवे वस्त्र गुंडाळलेले, हातात नागमोडी वळणाची छोटी काठी व दुसऱ्या हातात कमंडलू अशा थाटात स्वारी भराभर येत होती. चेहऱ्यावर दिव्य भाव अन् तेजस्वी डोळे. नजरेला नजर न देता गाडी पुढून भर्रकन् निघून गेली, व अदृश्य झाली. आणि दोन मिनिटातच गाडी सुरू झाली. आम्ही उठून वाकून पुन्हा महाराजांस पहाण्याची धडपड केली पण ते दृष्टीस पडले नाहीत. माझी खात्री झाली की ते दुसरे तिसरे कोणी नसून बाबाच होते. भारावलेल्या मनःस्थितीत मी लगेच पेढे काढले व आजूबाजूच्या थोड्याफार लोकांना बाबांचे दर्शन झाले म्हणून वाटले.

घारगावला न थांबणारी एस. टी. तिथे थांबावी, दिव्य साधू महाराजांचे तिथे दर्शन व्हावे, वेळेवर पेढेही मिळावेत अन् मी ते प्रसाद म्हणून वाटावेत ही सर्व लीला बाबांची! यात शंका नाही.

बाबा भक्तांची इच्छा पुरी करतात म्हणूनच त्यांनी माझी 'दर्शनाची आस पुरी केली. आणि माझे मन हर्षभराने फुलून गेले. ✱

# जेव्हा उदी पाजण्याचा संदेश बाबा स्वतःच देतात

श्री. सुरेश शां. सातपुते
द्वारा : सातपुते स्टोअर्स, मुंबई नं. १२

* अनुभव ! स्वानुभव किती ?...अनेक !...पावलोपावली अनुभव... कोणता सांगू ? किती सांगू ?

गेल्या वर्षीच्या श्रावणातील गोष्ट ! आमच्या नंदूस ताप आला ! काही मुले मोठी हट्टी असतात...त्यातलाच हा ! औषध पिणार नाही ! नाही...म्हणजे नाही !...गोड बोला...रागे भरा...आमिष दाखवा...काय वाटेल ते करा ! अगदी बळजबरीने नाक दाबून पाजलेच तर हा बळेबळेच उलटी करून ओकून टाकणारा ! त्यातून एक गोष्ट अशी की, आमच्या या मुलास–लहानपणी ताप आला की, आकडी येई ! त्यामुळे याला ताप आला की, आमच्या जीवाची अगदी घालमेल होई ! –आता आकडी वगैरे तसे काही होत नाही–पण म्हणतात ना...मन चिंती ते वैरीहि न चिंती ! तर नंदूचा ताप म्हणजे आम्हालाही एकप्रकारे तापच बरे...हा... औषधही घेत नाही मग काय करायचे ? मग मात्र...आम्ही एकच करतो...सरळ हेडऑफिस गाठतो ! आमचे हेडऑफीस म्हणजे बाबा ! तिकडे एकदा का तक्रार नोंदवली की, सूत्रं कशी पटापट हालतात.

असो–तर वर म्हटल्याप्रमाणे श्रावणात ताप आला–आणि श्रावण महिना धार्मिक ग्रंथ वाचनाचा महिना. त्यावेळी मी 'साईसच्चरित्' हा हेमाडपंतांचा ग्रंथ वाचत होतो...

ताप आला...मी नित्याप्रमाणे पोथी वाचण्यास बसण्यापूर्वी बाबांना सांगितले की बघा...आज दोन अध्याय वाचणार आहे. अन् हे अध्याय वाचून व्हायच्या आत नंदूला घाम आला पाहिजे. अन् बसलो वाचायला ! पहिलाच अध्याय वाचून होण्याच्या सुमारास 'ही' म्हणाली 'अहो, नंदूला जरा घाम येतोय बरं का !'

पण हे सुद्धा काहीच नाही ! खरा चमत्कार तर पुढेच आहे. पहिला अध्याय वाचून संपला दुसरा वाचावयास घेतला तर त्यात असे निघाले की, अमक्याला अमका आजार आला उदी पाजली...बरा झाला...तमक्यास तमका आजार आला...उदी पाजली ...बरा झाला ! इत्यादी, थोडक्यात मनुष्य आजारी पडला तर ... त्यास पाण्यातून उदी पाजावी...हा स्पष्ट संदेश !

आता मी मुलाच्या आजारासाठी मी बाबांना साकडे घालतो काय... आजारा संबंधीच त्या दिवशीच्या पोथीत निघते काय! उदी पाजावी असे सुचविले जाते काय! ही गोष्ट योगायोगाने पोथीत निघाली...असे देव न मानणारे म्हणून मोकळे होतील! पण—

तेव्हा पोथी वाचून संपल्या बरोबर पहिले काय केले असेल तर पाण्यातून उदी पाजली.. व जेवावयास बसलो... जेऊन खाली जाऊन पान खाऊन वर आलो... अन् खुर्ची टाकून गॅलरीत बसलो. अगदी दोन तीन मिनिटे गेली असतील नसतील, इतक्यात 'ही' बाहेर आली, म्हणाली, 'बघा, नंदूला दरदरून घाम आला आहे. कपडेसुद्धा भिजून गेलेत।' म्हणजे एकूण फार तर वीस मिनिटांचा अवधी... फार तर अर्धा तास! आता याला योगायोग म्हणायची कोणाची हिम्मत होईल काय? कसलेही औषध न देता, केवळ चिमूटभर अंगाऱ्याने ताप उतरतो काय?

तेव्हा पासून आणि पूर्वी पासूननच आम्ही बहात्तर रोगावर एकच औषध घेतो. उदी... केवळ उदी! आणि विशेष सांगायचे म्हणजे, उदी घेण्याचाही प्रसंगही फार क्वचित येतो. कारण गेल्या वर्षांत आम्ही एक कपर्दिकही डॉक्टरला दिलेली नाही. अगदी नाही तरी, किमान चार पाचशे तरी वाचले! आमच्या येथे बसून बाबा आत्मविश्वासपूर्वक सांगतात.

"शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी." असा वाया गेलेला भक्त तुम्ही तरी पाहिलात काय? अर्थातच नसणार—!

साईचिया भजका वक्र पाहे
असे सर्व भूमंडळी काय आहे?


# श्री संतचूडामणि भगवान श्री साईबाबा

**(जीवन आणि कार्य सचित्र ग्रंथ)**

लेखक – श्री. का. सी. पाठक
रिसिव्हर श्री साईबाबा संस्थान शिर्डी

व

श्री. सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्री साईलीला

लौकरच प्रसिद्ध होणार.

# श्रीसाई प्रसाद

सौ. विजयालक्ष्मी महादेवराव तावडे
विजय भुवन, परेराहिल रोड,
अंधेरी (पूर्व) मुं. नं. ४०००९३

● 'मी जगात कुणालाच शरण जात नाही, घाबरत नाही.' असे म्हणणाऱ्यालाही शेवटी म्हणावेच लागते की, 'मी परमेश्वराला नेहमीच शरण जातो.'

मी नेहमीच साई चरणांची सेवा करीत असते. अर्थात त्यांच्या अस्तित्वावर माझा प्रथमपासूनच अगाध विश्वास! परंतु प्रत्यक्ष अनुभव आला नव्हता. कथा मात्र फारच ऐकल्या व वाचल्याही आहेत.

परंतु जेथे श्रद्धा आहे तेथे देव आहेच. परमेश्वर नेहमी भक्ताच्या पाठीमागे सावलीसारखा उभा असतो. त्याची प्रचिती मलाही आली. फार महिन्यांपासून माझ्या हाताच्या मनगटावर वरच्या बाजूला एक गाठ आली होती. त्यामुळे हाताची शीर फार दुखे. मी प्रथम डॉक्टरकडे गेले. डॉक्टरने पहाताच 'ऑपरेशन'चा सल्ला दिला. मी घाबरले. हॉस्पिटलमध्ये जाण्याचे धैर्य होईना. मी निश्चय केला व त्याच दिवसापासून बाबांची विभूती लावण्यास प्रारंभ केला. असेच काही दिवस मी नियमाने विभूती लावीत होते. त्यानंतर सात–आठ दिवसांचीच गोष्ट सकाळी उठल्यावर मी नेहमीप्रमाणे हात पाहिला. मनगटावर हात फिरविते तर गाठच नाही. तावडतोब उठून बाबांच्या चरणावर हात ठेवले. माझ्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. घरात सर्वांनाच मी हे सांगितले व सर्वांचाच बाबांवरील विश्वास दृढ झाला.

यानंतर थोड्याच दिवसांनी मी व माझे यजमान दोघेही शिरडीला जाऊन आलो.

"साईनाथ तेरे हजारो हाथ
जिसजिसने तेरा नाम लिया
तू हो लिया उनका साथ"

सात–आठ महिन्यापूर्वी म्हणजे या कलियुगातच आलेला हा दुसरा अनुभव मी आणि माझे यजमान गावी जाण्यास निघालो. आम्ही दोघेच, व पिशव्यांचे ओझे. यांची प्रकृती ठीक नव्हती. अशा परिस्थितीत आम्ही एलफिस्टन स्टेशनवर उतरलो. तेथून एस्. टी. स्टँड (परळ) फारच दूर पण चालत जाण्याशिवाय गत्यंतरच नाही व

स्टेशनही सामसूम. आम्ही दोघेच स्टेशनवर. हमालाची वाट पहावी तर गाडी सुटेल. जड पिशव्या उचलणे तर दोघांनाही अशक्यच. मी बाबांचा धावा करू लागले. तेवढ्यात तेथे अचानक एक तरुण उपस्थित झाला. हा तरुण अचानक कोठून उपस्थित झाला असा विचार आम्ही करेपर्यंत "तुम्हाला कोठे जायचंय ?" असे विचारून त्याने आमच्या पिशव्या उचलल्याही. तो तरुण व हे एकत्रच चालत होते. परळ एस्. टी. स्टँड येईपर्यंत त्या तरुणाचे नाव विचारण्याचेही ह्यांना सुचले नाही. स्टँडवर पिशव्या येऊन पोहोचल्या. तो तर एक सुशिक्षित तरुण व आपल्या मुलासारखा. त्याला पैसे कसे देणार ? म्हणून आम्ही त्याला चहा पिण्याचा आग्रह केला. पण छे ! तो काही ऐकेना. शेवटी त्याला अति आग्रह करीत असतानाच फक्त हसत हसत व नकार देत तो दोन पावले मागे सरकला व काय आश्चर्य ! तो तरुण तेथेच अदृश्य झाला. आम्ही आजुबाजूला खुपच पाहिले पण छे ! तो कुठेच दिसेना.

क्षणातच माझे भाविक मन उद्गारले.

"बाबाच धावून आले ते !"

एक ना दोन. असे अनेक अनुभव मला आले आहेत व येतही आहेत.

माझी अशीच इच्छा आहे की बाबांचे हजारो हात जगभर पसरु देत व असाच साई प्रसाद सर्वांना मिळो.

# साईची ही दृष्टी प्रेमळ । करी भक्ताचा सांभाळ

—श्री. एल. बी. गोलतकर
ई ५/६, बर्वे नगर, घाटकोपर,
मुंबई ८४

● मी १९५३ मध्ये एस. एस. सी. ची परीक्षा पास झाल्यानंतर केवळ गंमत म्हणून दुसऱ्या व्यक्तीबरोबर शिर्डीला गेलो. सुरुवातीला साईबाबांबद्दल मनात भक्ति नव्हती. परंतु शिर्डीला गेल्यानंतर एकएक वेगळेच अनुभव यायला लागले.

पुढे पुढे बाबांची भक्ती वाढू लागली व वारंवार शिर्डीच्या फेऱ्या होऊ लागल्या. लग्न झाले. पहिली मुलगी झाली. अशा एकामागोमाग चारही मुलीच झाल्या. पत्नीसुद्धा साईभक्त आहे, बाबांची प्रार्थना केली व बाबांच्या कृपेने दि. ५-१०-१९७१ रोजी पुत्ररत्नाचा लाभ झाला. मुलगा ४२ दिवसाचा असतानाच शिर्डीला नेऊन बाबांच्या समाधीवर 'साईप्रसाद असे नाव ठेवले.

बाबांच्या कृपेने नोकरीधंदा ठीक चालले परंतु एके दिवशी वेगळीच घटना घडली. तो दिवस होता शनिवारचा. ऑफिसमध्ये काम करताना झोप येऊ लागली, थोड्यावेळाने छातीत कळा येऊ लागल्या. तेथेच खुर्चीवर आराम केला परंतु काही उपयोग नाही. घरी येईपर्यंत संध्याकाळ झाली. नंतर मोठ्या मुलीला बरोबर घेऊन फॅमिली डॉक्टरकडे गेलो. डॉक्टरने तपासले व सांगितले "हार्ट ट्रबल" आहे. केस सिरियस आहे तेव्हा हार्ट स्पेशालिस्टला दाखविले पाहिजे तात्पुरता औषधाचा डोस दवाखान्यात घेतला व फॅमिली डॉक्टरची चिठ्ठी घेऊन स्पेशालिस्टच्या क्लिनिकमध्ये गेलो परंतु क्लिनिक बंद झाले होते.

यावेळी रात्रीचे ९॥ वाजून गेले होते. बरोबर आलेल्या मुलीची घाबरगुंडी उडाली होती. फॅमिली डॉक्टरने सांगितले होते की जर स्पेशालिस्ट क्लिनिकमध्ये भेटले नाहीत तर त्यांच्या घरी जा त्यांच्या घरीसुद्धा तपासण्याची सोय आहे. शेवटी टॅक्सी करून स्पेशालिस्टसाहेबांच्या घरी गेलो. सोबत मोठी मुलगी होतीच. दारावरची विद्युत घंटा वाजवली. दरवाजा उघडला. घरगडी बाहेर आला व म्हणाला साहेब आज बाहेर गेले आहेत पार्टीला रात्री दोनच्यानंतर येतील फारतर उद्या सकाळी या.

हिरमुसल्या तोंडाने परतावे लागले. फॅमिली डॉक्टरला घडलेली हकीगत कळविण्यात आली. त्यांनी पुन्हा रात्रीपुरते औषध दिले. रात्री बाबांचे शिर्डीहून आणलेले तीर्थ घेतले छातीला उदी चोळली त्रास थोडा कमी झाला.

रविवारची पहाट झाली, पुन्हा मुलीला बरोबर घेऊन स्पेशालिस्टसाहेबांच्या घरी गेलो. ते भेटले. फॅमिली डॉक्टरने दिलेली चिठ्ठी दाखविली. लगेच त्यानी आपल्या स्पेशल रूममध्ये नेले इलेक्ट्रीक कार्डिओग्राम काढण्यात आला. स्पेशालिस्ट साहेब उद्गारले "कार्डिओग्राम खराब आहे बेड रेस्ट इज इसेंशियल" कॉटवर झोपूनच राहायच". औषधे लिहून दिली व बजावून सांगितले "केस खराब आहे." घरी परतलो तो फार नाराजीने. औषधे चालू होती. रात्रंदिवस कॉटवर झोपून रहात असे. ते तीन दिवस सुद्धा तीन युगासारखे वाटले.

बुधवार उजाडला. सकाळी ९च्या दरम्यान चहा घेण्याकरिता वर उठलो. चहा घेतला इतक्यात दरवाज्यावर एक 'फकीर' आला. म्हणाला, 'मी कधी येथे येत नाही. आजच आलो. पाच पैसे द्या.' बायकोने पाच पैसे दिले. त्या फकिराने

दरवाजातूनच एका निराळयाच नजरेने माझ्याकडे पाहिले, आणि काय आश्चर्य लगेच मी उठून फिरू लागलो. मी आजारी आहे याचे भानच राहिले नाही. बायको मुले विचारू लागली तुम्ही उठून फिरता काय ? येवढयात तो 'फकीर' मात्र कुठे दिसेनासा झाला. मुलानी बाहेर जाऊन पाहिले परंतु त्या फकिराचा पत्ता लागला नाही.

मला मात्र साफ बरे वाटले. मी अगदी रोज बाहेर जातो त्याप्रमाणे स्पेशालिस्ट कडे गेलो आणि सांगितले मला काहीच त्रास नाही. उद्यापासून ऑफिसला जाणार. त्यांनी "कार्डिओग्राम" पुन्हा पाहिला आणि आश्चर्य व्यक्त केले. पुढे मी म्हणालो मला शिर्डीला जायचे आहे तर तुमची संमती आहे ना ? ते उद्गारले 'परमेश्वरापुढे डॉक्टरला काय विचारता ? तुम्ही खुशाल जा. तुम्ही बिलकूल ठीक आहात.

श्रीभगवान साईबाबा फकीराच्या वेषात आमच्या घरी आले आणि आपल्या कृपादृष्टीने मला मरणातून वाचविले. बाबांची ती हृदयकमल उत्फुल्ल करणारी दृष्टी हृदय विकाराचे निर्मूलन करून गेली. परंतु त्यावेळी आम्ही बाबांना ओळखू शकलो नाही. नंतर शिर्डीला जाऊन बाबांची माफी मागितली.

खरोखरच बाबा आपल्या भक्तांची किती काळजी घेतात. हा प्रसंग आठवला की मन बाबांविषयीच्या कृतज्ञतेने भरून येते व श्रीसाईचरणी हात जोडले जातात.

"तुझा मीच अन् माझा तू हा भर हृदयी संदेश"

"कासविची ही दृष्टी प्रेमळ ।<br>
दुरून पिलांचा करी सांभाळ ।<br>
प्रेमवेध अद्‌भुत स्नेहाळ ॥

◆◆◆◆◆◆◆◆

# नामस्मरणाची आठवण

सौ. विनिता एन. डाहाके
"साई निवास"
सुधीर कॉलनी, अकोला

● १९७६ च्या गुरुपौर्णिमेला साईबाबांच्या मंदिरात मनाशी ठरवले की,

गुरुपौर्णिमेपासून कार्तिक एकादशीपर्यंत १ लाख साईबाबांचे नामस्मरण करावे. घरी आल्यानंतर भूल पडली. मधून मधून तब्येत पण बिघडत असे.

मी साईबाबांना म्हणाले, बाबा, मी तुमची भक्ती करते, माझी श्रद्धा व सबुरी तुमच्या वचनाप्रमाणे पाळते तेव्हा मला त्रास का व्हायला लागला ? मन कसे शांत नसे, हुरहूर, मनाची तळमळ सारखी असे. तरी पण मला उपदेश करा.

" उपासनेला दृढ चालवावे, भूदेव संतासी सदा नमावे. "
सत्कर्म योगे वय घालवावे, सर्वोमुखी मंगल बोलवावे."

बाबा, मन जाणणारा, दयाळू आहे. एके दिवशी बाबांनी मनाला शांत केले.

चिमणीच्या पायाला दोरा बांधून ती ओढली जाते तशी मला एकाएकी शिर्डीला जाण्याची स्फूर्ति झाली. कार्तिकी एकादशीच्या ८ दिवस आधी मला त्यांनी ओढून नेले. बाबांना पाहून डोळ्यात आनंदाचे अश्रू उभे राहिले. मग एकदम मण्याकडे बघून माळ जपण्याची आठवण झाली. चार महिन्याचे नामस्मरण बाबांनी ९ दिवसात माझ्याकडून करून घेतले. तेथेच १० दिवस मुक्काम केला. घरची पूर्ण आठवण विसरले. इथेच स्वर्गाचा आनंद घेत राहिले.

अशा तऱ्हेने बाबांचा आशिर्वाद घेऊन निघाले. आशिर्वाद-प्रेमाची भावना असते. प्रेम म्हणजे ईश्वराने मानवाला दिलेली महान देणगीच होय, जेव्हा हे प्रेम ईश्वराकडे वळविले जाते त्याला 'भक्ती' म्हणतात.

जरी बाबा प्रत्यक्ष नसले तरी ते कशाही तऱ्हेने भक्ताकडून करून घेतात.

# भक्तांचे कैवारी श्रीसाईबाबा

श्री. नंदकुमार रामचंद्र खेले
'सौभाग्य' १७४६, शुक्रवार पेठ,
जेधे प्रासाद रस्ता, पुणे-४११००२

● माझे वय २१-२२ वर्षांचे असताना नात्यातील एका मला आवडलेल्या मुलीबरोबर माझे लग्न व्हावे अशी इच्छा होती; माझी इच्छा मी बाबांना शिरडीला

जाऊन सांगितली, अर्थात् बाबांचे मनात वेगळेच होते, त्यामुळे माझी ती इच्छा त्यांनी पूर्ण केली नाही. उलट त्या मुलीचे लग्न जमविण्यात भाग घ्यावा लागला व तिचे लग्न दुसऱ्या तरुणाबरोबर झाले. त्यावेळी खूप वाईट वाटले, बाबांचा रागही आला, परंतु काय आश्चर्य मी जे मागत होतो त्याच्या कितीतरी पटीने उत्तम व योग्य मुलगी श्रीबाबांनी मला पत्नी म्हणून ( ३।६।६७ ला ) दिली. मग मात्र बाबांवरचा राग गेला व त्यांचेवरची श्रद्धा अधिक दृढ झाली. (शिक्षण, नोकरी, पत्नी, मुले सर्वकाही इच्छा बाबांनी योग्य वेळी पूर्ण केल्यात.) आज असे वाटते जे होते ते चांगल्याकरीताच होते.

श्रीबाबांनी आम्हाला दोन मुलगे व एक कन्या दिली आहे, ही बच्चेकंपनी-सुद्धा बाबांची आठवण नेहमी करतात. शिरडीला नेहमी जावे असे त्यांना वाटते व तेथे गेल्यानंतर एकदम खूष होतात. असो.––

ऑगस्ट १९७५ मध्ये मी व माझी पत्नी एकाच वेळी आजारी पडलो. माझी प्रकृती एकदम खालावली. भयंकर अशक्तपणा आला, उठता बसताना दम ( धापा ) लागत होता, छातीत दुखत होते, अंगात बारीक ताप होता. एकाच वेळी दोघेही आजारी व आर्थिक अडचणीचा डोंगर समोर उभा, त्यामुळे अत्यंत दुःखी, कष्टी झालो, काही सुचेना. श्रीबाबांचे पुढे चिठ्ठया टाकून त्यांचा सल्ला घेतला व त्यांचे इच्छेनुसार एका मोठ्या दवाखान्यात दोघांची प्रकृती दाखविली. डॉक्टरांनी मला २ ते ३ महिने विश्रांती व उपचाराकरीता दवाखान्यात राहण्याचा सल्ला दिला. काय झाले ह्याबद्दल ते स्पष्ट असे काहीच सांगत नव्हते, त्यांना निश्चित अनुमान काढता येईना त्यामुळे माझा धीर खचला होता.

छातीचा एक्स-रे फोटो काढण्यापूर्वी बाबांची उदी तोंडात टाकली व एक पुडी खिशातही ठेवली (नंतरही ५ ते ६ वेळा निरनिराळया वेळी फोटो काढले परंतु उदीमुळे प्रत्येकवेळी फोटोत काहीच दोष निघाले नाही. डॉक्टरांना मला टी. बी. वाटत असावा.) मी मात्र बाबांना एकसारखा सांगत होतो, "बाबा माझी तब्येत लवकर बरी होऊ द्या, कुठलाही आजार होता कामा नये, मी भावनाप्रधान आहे छातीत किंवा शरीरात काही काळजी करण्यासारखी व्याधी असती तरीही ती फोटोत दिसता कामा नये, जे असेल ते तुम्ही आपोआप बरे करा, नाहीतर मी काळजीनेच संपेन !" औषधोपचार चालू होता, मी श्रीबाबांची प्रार्थना करीत होतो व माझ्या पत्नीने श्रीसाईसच्चरित ग्रंथ वाचण्यास घेतला, त्यामुळे आलेले दुखणे श्रद्धेमुळे आपोआप गेले दवाखान्यात दाखल झालोच नाही. मोठे संकट श्रीबाबांनीच दूर केले.

एकदा नाशिकरोडला कामानिमित्त गेलो होतो, तेथून सिन्नर तालुक्यात मु. वडांगळीला जायचे होते. सिन्नरहून वडांगळीस सुटणारी शेवटची एस. टी. बस सायंकाळी ६ ला होती व आम्हाला नाशिकरोड एस. टी. स्टँडवर ५·१५ वाजले, तेथून सिन्नरला जाणारी बस मिळणे जरूरीचे, ती मिळूनही ३० ते ४० मिनिटात पोहोचली तरच वडांगळी गाडी मिळणार. श्रीबाबांची प्रार्थना करीत उभा होतो, तोच नाशिक-पुणे, जलद गाडी स्टँडवर आली. जागा मिळाली, गाडी ५-२५ ला सुटली मी बाबांची प्रार्थना करीतच होतो. गाडी ठीक ६ ला सिन्नरला आली, तेथे वडांगळी गाडी नव्हती. चौकशी केल्यानंतर समजले की, गाडी दुरुस्तीमुळे तासभर लेट सुट-णार आहे. त्यामुळे ती गाडी आम्हाला मिळाली. ही गाडी लेट का ? कारण आम्ही रात्रभर सिन्नर स्टॅण्डवर अडकून पडू नये म्हणूनच श्रीबाबांनी ही व्यवस्था केली होती.

रात्रभर वडांगळीस मुक्काम करून सकाळी १०॥ वाजता सिन्नरला परत तेथून दुपारी १२ ते १२॥ चे दरम्यान शिर्डीला जाण्याकरिता नाशिक सोलापूर एस. टी. बसमध्ये बसलो जेवण केलेले नव्हते, शिवाय माझेबरोबर एक नातलग शहाबाद जि. गुलबर्गा येथून आलेला होता, तो प्रथमच शिर्डीला जात होता, आम्ही शिर्डीला, २ ते ३ तास थांबून पुण्याला जाणार होतो. त्यावेळेत श्रीबाबांचे दर्शन, पूजा व तेथील संस्थानचे भोजन (म्हणजेच बाबांचा प्रसाद ) मिळावा अशी माझी इच्छा होती. कंडक्टर व इतर प्रवाशांना विचारले की ही गाडी शिर्डीला किती वेळात पोहोचते बहुतेकजण म्हणाले दोन तास लागतीलच. कारण पावसामुळे रस्ता खराब आहे. दुपारी दोन वाजता शिर्डी संस्थानचे भोजनगृह बंद होते, आता काय करणार ? एकतर न जेवता निघालो त्यात शिर्डीलाही जेवण मिळेलच ह्याची खात्री नाही. संस्थानचे भोजनगृह सोडले तर इतरत्र चांगले व स्वस्त जेवण शिर्डीत मिळत नाही. शिवाय संस्थानचे जेवण म्हणजे श्रीबाबांचा प्रसाद ! मी पुन्हा बाबांची प्रार्थना केली व बाबांना विचारले, " बाबा आम्हाला तुम्ही उपाशी ठेवणार आहात काय ? तुमच्या संस्थानमधील प्रसाद, भोजन मिळावे अशी इच्छा आहे कसेही करून गाडी दुपारी २ पूर्वी शिर्डीत पोचवा !, उपाशी पोटी परमेश्वर भेटत नाही तद्वत श्रीबाबांनी ही बस बरोबर १–४५ वाजता शिर्डीत आणली. आम्ही दोनचे आत भोजनपास घेतले, यथेच्छ जेवलो व पोटात अन्न गेल्यानंतरच आम्हाला परमेश्वर भेटला - म्हणजेच श्रीसाईबाबांनी दर्शन दिले. श्रीसाईबाबांची करणी अघटीतच आहे. बाबांची प्रार्थना केल्यामुळे अनेक वेळा ऐन गर्दीच्या सिझनमध्येही प्रवास सुखदायक झालेला आहे.

माझे नोकरीत मला दोन जादा वेतनवाढी मिळण्याबाबत वरिष्ठ कार्यालयात माझे प्रकरण पाठविले होते, अर्ज विनंत्या करूनही दाद मिळेना; खूप प्रयत्नानंतर वरिष्ट कार्यालयाकडून नकारार्थी उत्तर आले. माझी मागणी न्याय्य असतानाही असे

पडले, शेवटी श्रीसाईबाबांना नवस करून पुन्हा नव्या जोमाने प्रयत्न सुरु केले, तो काय आश्चर्य पहा, नेहमीचे साहेब बदलीवर गेले व तात्पुरता चार्ज घेतलेल्या साहेबांनी प्रकरणाचा अभ्यास करून, वरिष्ठ कार्यालयास पत्र पाठविले, वरिष्ठ कार्यालयाने उच्च कार्यालयास त्वरीत लिहिले व उच्च कार्यालयाने आदेश दिल्यामुळे मला न्याय मिळाला. त्यामुळे माझे पगारात कायमच्या दोन वेतनवाढी मंजूर झाल्या, शिवाय सुमारे १५००|- रुपये मागील फरक मिळाला. एकदा नकारार्थी दिलेला निर्णय श्रीबाबांच्या कृपेने बदलला व होकारार्थी झाला ! आपल्या भक्तांची न्याय्य मागणी बाबा कधीही धुडकावून लावणार नाहीत. श्रद्धेबरोबर धीर व सबूरीमुळे कृपाफळ मिळतेच.

त्यांचे फोटोचे दर्शन घेतल्याखेरीज व कपाळी उदी लावल्याखेरीज आम्ही कोणीही घराबाहेर पडत नाही. वर्षातून एक दोन वेळेस आम्ही शिर्डीला जातोच नव्हे श्रीबाबाच आमचे पायाला दोर बांधून चिमणीच्या पोराप्रमाणे खेचून शिर्डीत नेतात. त्यांचेवर भक्ती करणारे माझे ६५ वर्षांचे वडील जून ७७ मध्ये १२ फुट उंचावरून पडले, खाली मोठा दगड होता त्यावर डोके आपटले असते तर... परंतु त्यांचे रक्षणकर्ते श्रीसाईबाबा आहेत ना ! दोन्ही पायाना, कंबरेला मार लागला परंतु वाचले व आज पुन्हा हिंडू फिरू लागले. श्रीसाईनाथ बाबांवर पूर्ण श्रद्धा ठेवून वाटचाल करणाऱ्या भक्तांना बाबा नक्कीच पावतात. त्यांच्या मनोकामना पूर्ण करतात, संकटकाळी सदैव पाठीशी उभे असतात.

# परम विचित्रं लीला विभूती

**कु. शैला अंबाजीराव सरोदे**
उल्हैंाल बिल्डिंग, न. चिं. केळकर पथ, दादर २८

● १) आठच दिवसापूर्वी उपवासाच्या दिवशी संध्याकाळपासून माझे डोके थोडे थोडे दुखत होते. रात्री जेवावयास बसल्यावर तर ते इतके दुखू लागले की माझे डोक्याच्या शिरा उडत असलेल्या मला जाणवत होत्या, डोळ्यासमोर अंधारी येत होती. थोडासुद्धा आवाज मला सहन होत नव्हता. दोन-तीन घास घेतल्यावर मला एकदम

मळमळायला लागले म्हणून भरले ताट सोडून नाईलाजाने मला उठावं लागलं. मी बाबांची मनातून प्रार्थना केली. बाबा उपवासाच्या दिवशी असं कधी झालं नाही आणि आजच ताट सोडून उठावं लागलं. आईने कपाळाला बाबांची उदी चांगली सर्व बाजूनीं लावली आणि पाच मिनिटात मला गाढ झोप लागली.

आणि नंतर २०/२५ मिनिटाने मला जाग आली. तेव्हा माझे सबंध अंग व चेहरा घामाने डबडबला होता व डोके एकदम हलके झाले होते. अर्ध्या तासापूर्वी आपल्याला काहीच झाले नव्हते असे मला वाटायला लागले. जेव्हा मी आईकडे जेवावयास मागितले. तेव्हा सर्वजण माझे तोंडच पाहू लागले...

२) एकदा माझ्या हाताच्या अंगठ्यात काय गेले होते कुणास ठावूक पण आंगठा सुजून त्यात पू भरला, व सबंध हात दुखून ताप येत होता. आई वडील नुकतीच गावी गेल्यामुळे घरात आम्ही भावंडेच होतो. अशावेळी काय करावे सुचत नव्हते. डॉक्टरांकडे जाऊन इंजेक्शन घ्यायचे म्हणजे भिती वाटत होती. मी मनात विचार केला. बाबा असताना कशाला कुठे जायचे. लगेच बाबांची उदी पाण्यात कालवून बोटाला लावली. वरून पट्टी बांधली. तिसऱ्या दिवशी पू आपोआप बाहेर आला व सूज उतरली, तापही गेला. परत उदी लावल्याने आंगठा पूर्ण बरा झाला.

३) माझी लहान बहिण एकदा रस्त्यावरून जात असताना एका मोठ्या दगडाची ठोकर लागून पडली. पडताना सर्व जोर उजव्या हातावर व पायाच्या गुडघ्यावर पडला. बेलबॉटम पॅंट फाटून गुढघ्याला जबरदस्त मार बसला, व हाताlाही खरचटले गेले. घरी येईपर्यंत हातही सुजला, व वेदनाही होऊ लागल्या. घरी आल्यावर आईने पाहिले. रात्रीची वेळ असल्यामुळे आईने डॉक्टरकडे न जाता घरीच बाबांची उदी पाण्यातून भरपूर कालवली, व हाताला सगळीकडून उदीचा लेप लावला व एका मोठ्या प्लॅस्टिकच्या पिशवीत हात आत घालून वरून बांधले. तसेच पुढे गुडघ्यालाही उदीचा लेप दिला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून पाहिले तो काय हाताची सूज साफ निघाली व हात कसाही फिरवता येत होता. गुडघ्याचे खरचटलेले कमी झाले होते.

# असे ते स्वप्न

* श्री. मोहन शंकरराव कुलकर्णी
न्यू डीलक्स लॉज, १३२० सी वॉर्ड,
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

* तसे आम्ही कॉलेजातीलच तरुण ! प्रत्येक दिवशी मौज करावयाची, कॉलेज जीवनातील आनंद लुटावयाचा अशाप्रकारचा समज कॉलेज शिकणाऱ्या बहुतेक तरुणांमध्ये असतो. या वयात हा तरुण सर्व गोष्टीकडे पाहू शकतो, पाहात असतो फक्त देवधर्म सोडून !

मी ही अशा कॉलेज तरुणामधीलच विद्यार्थी परंतु त्यांच्याहून थोडासा निराळा ! मार्च महिन्याची गोष्ट ! कॉलेजच्या वार्षिक परीक्षा जवळ आल्यामुळे प्रत्येक विद्यार्थी अभ्यासात मग्न होते मी ही अभ्यासात अति तीव्रतेने लक्ष केंद्रीत केले होते कारण कॉलेज जीवनातील हे माझे व अति महत्त्वाचे वर्ष होते. कोणत्याही प्रकारे चांगल्या गुणानी आणि पास व्हायचे माझे ध्येय होते.

आमच्या घरी माडीवर माझी अभ्यासाची स्वतंत्र खोली आहे त्या खोलीमध्ये माझ्या कॉटसमोर देवांचे तीन फोटो आहेत. एक गोंदवलेकर महाराजांचा दुसरा गणपतीचा व तिसरा दत्तमहाराजांचा ! माझा नेहमीचा नित्यक्रम असा की रात्री अकरा वाजता अभ्यास करून झोपतेवेळी व पहाटे उठतेवेळी त्यासमोरच्या फोटोना नित्य-नियमाने नमस्कार करणे.

पंचवीस मार्चची ती गोष्ट ! नेहमीप्रमाणे अभ्यास करून रात्री अकरा वाजता कॉटवर मी झोपी गेलो मला ताबडतोब झोप लागली परंतु रात्री एक सुंदर पण अतिशय विलक्षण असे स्वप्न पडले. स्वप्नातील प्रसंग–

मी एकटाच एका देवळात देवाच्या दर्शनासाठी गेलो आहे. मी जेव्हा त्या देवळात प्रवेश केला तेव्हा माझ्याशिवाय अन्य कोणीही त्या देवळात नव्हते. मी देवळातील त्या मूर्तीच्या अगदी समोर गेलो. त्या मूर्तीकडे अतिशय आतुरतेने पहात उभे राहून डोळे उघडे ठेऊन मी हात जोडले नंतर माझ्या मनी आले की खाली वाकून नमस्कार करावा. म्हणून मी खाली गुडघे टेकले, मान खाली घातली आणि दोन मिनिटे डोळे बंद करून त्याच स्थितीत त्या मूर्तीचे नामस्मरण केले नंतर थोड्या वेळानी मी मान वरती केली, डोळे उघडले आणि काय आश्चर्य... !

समोर ती मूर्तीच नव्हती ! मी एकदम भयंकर घाबरलो थोड्या वेळापूर्वी पाहिलेली ती मूर्ती कोठे अदृश्य झाली ते माझे मलाच कळेना. भितीने माझ्या शरीराला घाम सुटला. माझ्या तोंडातून शब्द फुटेना. पुढे काय करावे हे देखील कळेना.

पण इतक्यात पाठीमागून आवाज आला,–

" बाळ ! मी इथं आहे. इकडे ये ! "

लगलीच मी आवाजाच्या दिशेने पाहिले. पाठीमागील बाजूस एक म्हातारा माणूस जमिनीवर आडवा बसला होता. त्याचा एक पाय जमिनीला समांतर होता व दुसरा पाय अर्धवट उभा होता. जमिनीला एका हाताचे कोपर टेकून त्या म्हाताऱ्या माणसाने सर्व शरीराचा भार त्या अंगावर टाकला होता. त्याने धोतर नेसले होते. त्याच्या डोकीला एक पांढरे फडके व उभ्या असलेल्या त्या अर्धवट पायाच्या पोटरीला एक पांढरे फडके बांधलेले होते.

घाबरलेल्या स्थितीतच मी त्या म्हाताऱ्या इसमाकडे पाहात होतो. त्याच्याकडे मी पाहात असलेला पाहून त्याने किंचितसे हास्य केले व पुन्हा त्याच्या तोंडातून आवाज आला.

"बाळ, इकडे ये !"

मी अतिशय भितच त्याच्या पायापाशी पोहोचलो. मी एकटक त्याच्याकडे पाहात होतो. मला प्रत्येकवेळी त्या म्हाताऱ्याच्या ठिकाणी दुसरेच कोणी आहे असे वाटू लागले होते म्हणून मी एकसारखा पाहात होतो. मी आता अगदी त्याच्या पायाशी येऊन उभा होतो. तो इसम किंचित् हास्य करून माझ्याकडे पाहात होता व मी त्याच्याकडे !

इतक्यात त्या देवळात कसला तरी आवाज झाला ! मी वरती पाहिले. देवळाच्या प्रवेश द्वारातून एक स्त्री देवळात प्रवेश करीत होती. त्या स्त्रीने हिरवी साडी नेसली होती, तिचे हात हिरव्या बांगड्यानी भरले होते, तिने डोकीवरून पदर घेतला होता. तिच्या हातात एक ताट असून त्यात पुजेचे सर्व साहित्य दिसत होते. मी त्या स्त्रीकडे थोडावेळ पूर्णपणे पाहिले आणि पुन्हा मान खाली करून त्या मघाशी झोपलेल्या म्हाताऱ्या इसमाकडे पाहिले तर काय आश्चर्य !

ती व्यक्ती तेथे नव्हती. मी खुप शोधले पण ती व्यक्ती मला कोठेही दिसेना. मी पुन्हा भितीने व्याकुळ झालो.

पहाटे मला जाग आली आणि अंथरुणावर पडलेल्या स्थितीतच मला आठवले की, रात्री आपणाला एक स्वप्न पडले होते. मी त्या स्वप्नाचा पूर्णपणे अर्थ लावू

लागलो पण मला तो पूर्णपणे समजेना. मात्र इतके नक्की समजले की तो म्हातारा इसम म्हणजे ते " साईबाबा " होते.

रात्री स्वप्नात आलेल्या त्या स्त्रीचा चेहरा पहाटेपर्यंत मी जाणू शकत होतो पण नंतर तो चेहेरा माझ्या लक्षातून गेला व ध्यानी राहिली फक्त त्या म्हाताऱ्याची मूर्ती !

नंतर ही घटना मी माझ्या मित्रांना सांगितली. त्यांनी उपदेश केला की, शिरडीला जाऊन ये. पण अद्याप ते जमले नाही. निर्माता, दिग्दर्शक–मनोजकुमार याच्यावर घडलेला प्रसंग, त्यातून निर्माण झालेला 'शिरडीके साईबाबा' आणि याच्याहून अधिक मला कॉलेज जीवनात आलेला प्रत्यक्ष अनुभव यामुळे बाबांच्याविषयी माझी भक्ति वाढली आहे आणि ती नेहमीच वाढत जावो हीच त्यांच्यापाशी प्रार्थना !

..................

# साईमाऊलींची कृपा

● सौ. अस्मिता कमलाकर दांडेकर
६९ बी. खाडिलकर रोड,
गिरगाव मुंबई ४०० ००४

● बालपणातील संस्कार हे सबंध आयुष्याला व्यापून रहातात हे अगदी खरंच आहे. वयाच्या पाच-सहा वर्षापासून आईच्या संस्काराचा पगडा मनावर जो ठसला तो तसाच.

अगदी लहानपणापासून साईबाबांकडेच लहानसहान गोष्टींची पण दाद मागायची, त्यांनाच भजायचं, पुजायचं, मनातलं सांगायचं व ते पण प्रत्येक हाकेला आजपर्यंत धावून आलेत व तारलंय.

लग्नानंतर पण पतीसुद्धा धर्मपरायण भेटल्याने माझ्या गुरुमाऊलीची संगत सतत आहेच. संसारातील विविध ताप, तापानी डोके, मन अशांत झालं की साईबाबांना विनवून साद घातली की धावलेच ते माझ्यासाठी. त्यांनी माझे सारे मनोरथ पूर्ण केलेत.

दोनचार महिन्यापूर्वीची गोष्ट मी मालेगावी मुलासह माहेरी गेलेली होते. घरात एकटे माझे यजमानच होते ते व्यवसायाने आर्किटेक्ट असल्याने उन्हा तान्हात हिंडावेच लागते. अतिश्रमाने साईटवरच त्यांना ताप भरला तसेच अपरात्रीच घरी (मुंबईस) आले. ते झोपून राहिले. घरी कुणीच नसल्याने औषधपाणी नाहीच. सकाळी शेजारीच नातेवाईक राहतात त्यांनी विचारपूस करून औषध इ. आणले. पण ताप कमी न होता वाढतच होता तशात त्यांनी मालेगावी येवून आम्हाला मुंबईला घेऊन येणार असं पत्र पाठवलेलं होतं व दुसऱ्या दिवशी तर त्यांनी न्यायला यायचं ठरवलेलं, तापात काहीच उतार नाही. जीवाची अगदी उलघाल चाललेली. तोंडाने बाबांचा धावा, बाबा काय करू ? मला उद्या जायलाच पाहिजे, पत्र पाठ-लंय ते लोक काळजी करतील.

मुंबईहून मालेगाव कॅम्पला येणं म्हणजे आडवळणांचेच. दुसऱ्या कोणाला पाठवावे तर नवख्या माणसाला समजणे पण कठीण. कोणाला पाठवावं? काय करावे ? तार केली तर लहान मुलाला घेऊन मी एकटीच बावरून जाणार व कशी येणार ही काळजी. तोंडाने सारखं बाबांचं नामस्मरण सुरुच. बाबा माझा ताप निघू दे. मला बरं वाटून रात्रीच्या गाडीने मालेगावला जाता आलं पाहिजे. असं चालू असताना त्यांना डोळा लागल्या सारखं वाटलं. पलंगासमोरच श्रीसाईबाबांचा 'आशिर्वाद' पोज मधला फोटो लावलेला आहे. त्यावर नजर लावून पडलेले असताना वाटलं की साईबाबा फोटोतून खाली उतरून जवळ उभे राहिलेत व कपाळावर हात ठेवून सांगतात, घाबरु नकोस वाटेल तुला बरं, मात्र काही खाता, पिताना सर्वात उदी घालून मग घेत जा. सर्वांगाला उदी लाव. उशाला उदी ठेव व खुशाल मुलाला भेटायला जा. काही होणार नाही व आवाज थांबल्यावर खडबडून उठले व पाहातात तो जवळ कुणीच नाही. सर्व अंग घामाने डबडबलेलं व रात्री पर्यंत पूर्णपणे ताप उतरला. सोबत भाच्याला घेऊन रात्री मालेगावला येण्यासाठी घरातून निघाले. सुखरुप आले व आम्हाला घेऊन सुद्धा परत मुंबईला आले. ताप नाही भरला की थकवा नाही आला.

आहे की नाही माझी गुरुमाऊली ! माझ्यावर तिच्या प्रेमाची सावली सतत असते. कधी काही कमी पडू देत नाही की मला कसली काळजी वाटत नाही. सारा भार माझ्या साईमाऊलीवर टाकून मी निर्धास्त असते. ●

# झाले मुक्तद्वार लाभ झाला रोकडा ।।

श्री. गुलाबराव देशमुख, गोडांबे यांचे घर
भुसार मोहल्ला, कापड गल्ली, पनवेल

● मी आपल्यासारखाच एक तरुण, माझं लग्न झाले आहे. थोडक्यात आम्ही आमच्या संसारात सुखी आहोत. लग्नानंतर दोन वर्षांनी आमच्या घरात तिसऱ्या माणसाची चाहूल लागू लागली. तो महिना ऑगस्ट होता. दि. १४-८-७५ रोजी रात्रौ ९-००वाजता मी पत्नीला घेऊन हॉस्पिटलमध्ये गेलो. कारण ती वेळ तिच्या डिलिव्हरीची होती. डॉक्टरांनी मिसेसला तपासले आणि निर्विकार चेहरा करून म्हणाले, "केस गंभीर आहे सिझरीन करावे लागेल, शिवाय पुढचे काहीही सांगता येत नाही" हे सगळे ऐकल्यानंतर मी पुरता गोंधळून गेलो होतो. मला ते सर्व अनपेक्षित होते आणि डॉक्टर खात्रीही देऊ शकत नव्हते. धीर करून डॉक्टरांना मी विचारले, डॉक्टरसाहेब, ते टाळता येण्यासारखे नाही का ? तसे ते ताडकन उत्तरले. "आय कान्ट हेल्प यू इन धीस पर्टीक्युलर केस" तुम्ही तिला दुसरीकडे नेवू शकता पण ती वेळ विचार करण्याची नव्हती. मी डोळे मिटले आणि साईबाबांचे स्मरण केले "बाबा आतापर्यंत वेळोवेळी तुम्हीच उभे राहिलात तेव्हा हे सर्व सुखरूप पार पडू दे. मी शिरडीला येऊन तुम्हाला अभिषेक करीन" आणि झटकन डॉक्टरांच्या स्टेटमेंटवर सही केली आणि गुरुवार दि. १४-८-७५, श्रावण शु. ८ ला टीक १०-३२ मि. नी आम्हाला कन्यारत्न झाले. "थँक यू डॉक्टर," मी म्हणालो, "यू आर रिअली लकी ॲण्ड यूवर बेबी इज आल्सो स्मार्ट" इति डॉक्टर. खरोखर अशा तऱ्हेने बाबांच्या कृपाप्रसादाने फळ आम्हाला मिळाले.

नंतर दिवसामागून दिवस जाऊ लागले. बघता बघता एक वर्षही उलटून गेले पण मला शिरडीला जाण्याचा योग काही आला नाही. सगळी जमवाजमव झाली की अडचण ठरलेली ! अखेर असं का होतं ? माझे वेडे मन सारखे बाबांना विचारत होते. मी त्यावेळी उरणला नोकरी करत होतो आमचा ऑफिस स्टाफ सहली करण्यात आघाडीवर होता. दोन तीन सुट्टया लागोपाठ आल्या की आम्ही ट्रीपची ॲरेंजमेंट करीत असू. नुकतीच रायगडची ट्रीप करून आलो होतो. त्यादिवशी का कोण जाणे दुपारच्या लंचमध्ये बोलता बोलता, शिरडीला जाण्याचे निश्चित झाले. तारखा ठरवल्या गेल्या, पैसे पण जमा

करण्यास सुरुवात झाली. सर्वबाबतीत मी पुढाकार घेतला होता कारण मला शिरडीला जाऊन प्रथम साईबाबांना अभिषेक करावयाचा होता पण गोष्टी योगा-योगाच्या ! नेमकी तीच सहल आमची बारगाळली ! मी मात्रा आता खूपच नाराज झालो होतो. आपल्याला शिरडीला जाता येत नाही ह्याबद्दल सारखी खंत वाटत होती.

माझा एक मित्र साईभक्त होता. तो वर्षातून कमीत कमी दोन वेळा तरी शिर-डीला जाऊन यायचाच ! मी न राहून त्याला विचारले,:" काय रे तुझ्या मनात आलं की, तू शिरडीला जातोस पण मी मात्र आज दीड वर्ष झालं, शिरडीला जाण्याचं कर-तोय पण जमत नाही बघ ! आता बघ ना, आपली ट्रीप चालली होती ती पण बारगळली ! असं का होते रे ?" देशमुख तू खरोखर वेडा आहेस ! अरे शिरडीला जाणे म्हणजे येऱ्या गबाळयाचे काम नाही बाबा ! साईबाबांचा हुकूम झाल्याशिवाय कुणीही शिरडीत पाऊल टाकू शकत नाही ! मला वाटले, त्याच्या भक्तिला अहंका-राची झालर आहे पण नाही ते सत्य होते ! कारण थोड्याच दिवसानी मला त्याचा योग्य अनुभव आला.

— त्या दिवशी मी थोडासा अस्वस्थ होतो, भूतकाळातील विचारांनी डोकं सुन्न झालं होतं, बेचैनी वाढत होती आणि मला हवी होती मनःशांती ! त्याकरीता थोडे दिवस सांगलीला एका मित्राकडे जाण्याचा विचार करत होतो ! पण छे ! का कोण जाणे, मला सारखी शिरडीला जाण्याची ओढ लागली होती. माझं मन मला सांगत होते, " तू शिरडीला जा वेड्या हीच संधी चालून आली आहे." पण मागचा अनुभव जमेस धरुन विश्वास वाटत नव्हता ! तरीही बाबांच्या छबीला नमस्कार केला. बाबा, आता परीक्षा बघू नका मला शिरडीला घेऊन चला ! आणि खरोखरच दुसऱ्या दिवशी निघालोच ! सोमवार होता, आषाढी एकादशी होती, वाटलं, लोक आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपुरला जातात आणि आपण शिरडीच्या साईबाबांना भेटणार ! खरोखर धन्य मी ! पण छे, सोमवारी मी कल्याणला राहिलो. राहिलो कसला बाबांनीच ठेवला ! आणि पुन्हा शंका ? ? ?...

पण नाही मंगळवारी सकाळी ब्रीफकेस भरली आणि तडक निघालो कल्याणच्या एस. टी. स्टॅंडवर ! स्टॅंडवर आलो खरा पण शिरडीला जाणारी बस किती वाजता होती कोण जाणे ? पण गोष्टी योगायोगाच्या ! मी चौकशी काऊंटरवर विचारले, काहो, शिरडीला कल्याणवरुन एक बस सुटते ती किती वाजता आहे ! आता १०–३० ला लागेल बघा ! तेव्हा वाजले होते सकाळचे ९–४५ ! मग काय आनंदी आनंद ! झाले शिरडी स्टॅंडवर उतरलो ! पण पुढे करावयाचे काय ? तो

प्रश्न गौण होता. तरीही बाबांनी तो सोडवीला ! माझ्या बसमध्ये कल्याणचे महाजन नावाचे सद्‌गृहस्थ होते. बसमध्ये त्यांनी एक चकार शब्दपण काढला नाही ! पण उतरल्यानंतर मला म्हणाले, चला लवकर, लवकर रुम मिळाली पाहिजे ! माफ करा मी प्रथमच शिरडीला येतोय तेव्हा आपण जरा मार्गदर्शन केलेत तर बरे होईल ! अर्थात त्यांनी मला खूपच मदत केली. तसेच शिरडी मुक्कामात प्रभादेवीचे श्री. वरेकर ह्यांनी मला सहकार्य दिले.

"तुम्ही किती दिवस रहाणार ? महाजन ?"

मला फक्त अभिषेक करावयाचा आहे तेव्हा उद्या, परवा मी जाईन. आम्ही तर गेली तीस वर्षे प्रत्येक गुरुपौर्णिमेला येतोय ! शुक्रवारी गुरुपौर्णिमा आहे ! त्या दिवशी खूप मोठी पालखी निघते. मोठा उत्सव भरतो तो सोहळा बघण्यासारखा असतो... आणि ते सर्व सांगू लागले. साईदर्शनाचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडत होता !

माझ्या डोळयात आनंदाश्रु उभे राहीले. कारण साईबाबांनी मला खेचून आणले होते, तेही गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर ! खास गुरुपौर्णिमेला बाबांचे असंख्य भक्तगण साईचरणांशी येतात पण मला जो अनुभव आला आहे त्याला मी बाबांचा चमत्कार समजतो ! कारण, माझं अज्ञान प्रदर्शित झाले तरी चालेल, पण साईबाबांस साक्षी ठेवून सांगतो, की, शुक्रवारी गुरुपौर्णिमा होती हे महाजन यांनी सांगेपर्यंत मला माहितसुद्धा नव्हतं ! शिरडीला जायचे, अभिषेक करावयाचा व लगेच परत यायचं हा माझा प्लॅन ! अर्थात मी शनिवारपर्यंत साईचरणांचा लाभ घेतला हे सांगणे न लगे, खरोखर साईबाबाबा, तुमचा महिमा अगाध आहे ! अनाकलनिय आहे ! आणि म्हणूनच हे रहस्य तुम्ही फक्त तुमच्या जवळ ठेवले आहे !

◆◆◆◆◆◆◆◆

# श्रीसाईबाबांच्या कृपेने नवजीवन मिळाले

सौ. विमलादेवी, ( संचालिका ) श्रीजगदीश मंदिर
नागपूर

* मे १९७७ शनिवार दि. २८-५-७७ या दिवशी रात्रौ एक वाजता मला अर्धांगवायुचा अकस्मात झटका आला व त्यात माझा डावा हात व मानेपासून कंबरेपर्यंतचा भाग पूर्ण अपंग झाला. निजलेल्या जागेपासून किंचितही हलू शकत नव्हते. असह्य वेदनांनी प्राणज्योत विझते की काय अशी दयनीय अवस्था झाली परंतु माझी बोलण्याची शक्ती नेहमीच सारखीच असल्यामुळे मला बोलता येत होते ही बाबांची महान कृपाच होती मजवर त्यामुळेच मी त्या संकटसमयी बाबांचा आर्ततेने धावा करू शकले माझी बाबांवर पूर्ण निष्ठा आहे व अनेकदा बाबांनी माझे रक्षण केलेले आहे. मी अनंत जन्माची बाबांची ऋणी आहे

ज्यावेळी मला झटका आला त्यावेळेस मध्यरात्र होती तशात मला वारंवार मूर्च्छा येत होती. शुद्धीवर आल्यावर पुन्हा बाबांना मदतीकरिता बोलविले होते. घशाला कोरड पडली तरी ऊठून पाणी पिण्याचीही अवस्था नव्हती. चमच्यानी पाणी प्यावे लागत होते कारण मी मान उचलू शकत नव्हते. पण पडल्या पडल्या अखंडपणे बाबांची आर्ततेने प्रार्थना करीत होते कारण मला आत्मविश्वास होता माझा निर्वाणीचा सखा साईनाथ धावून आल्याशिवाय राहावयाचा नाही. छोट्या छोट्या बाबतीत बाबांनी मला किती तरी वेळा मदत केली रक्षण केले आणि आजतर मी मृत्युशय्येवर आहे अशा संकटसमयी दीनाचा दयाळू मनाचा मवाळू असा करुणानिधान माझा साईबाबा आल्याशिवाय कसा बरे राहील.

आणि झालेही तेच मला पुन्हा अर्धवट मूर्च्छा आली व त्या मूर्च्छावस्थेत जे अनुभवले ते अलौकीक आहे. बाबा आपल्या भक्त रक्षणाकरीता धावून आले. त्यांनी पांढरा शुभ्र वेष परिधान केला होता. दोन्ही हातांच्या कफनीच्या बाह्या वर करीत करीत ते माझ्या उशाशी येऊन बसले, व आपला पावन करकमल माझ्या मस्तकावरुन फिरविला, जणू काय मला धैर्य देत होते. ते बराच वेळ माझ्या उशाशी बसून काही तरी बोलत होते, पण काय बोलत होते हे मात्र सांगणे शक्य नाही त्यानंतर मी शुद्धीवर आले. व माझे स्वप्न भंगले व काय आश्चर्य ! मी एकदम ताडकन् शक्तिसंचार झाल्यासारखी कोणाच्याही मदतीशिवाय उठून बसले. जिथे मी हलू शकत नव्हते तिथे उठून बसलेच कशी ? हे महान आश्चर्य आहे.

श्री उठून बसलेच नाही मला तर साईनाथांनी आपल्या पावन करस्पर्शाच्या आधाराने उठवून बसविले जिथे मी गलीतगात्र झाले होते मग माझ्यात एवढा शक्तीसंचार झाला कसा हा प्रश्न जे साईभक्त नाहीत त्यांना पडेल, पण जे साईभक्त आहेत त्यांना हे रहस्य आपोआप उलगडेल. साईबाबांची किमया, लीला अगाध. ते सर्वसमर्थ आहेत. भक्तांच्या हृदयस्थ आहेत. फक्त त्यांना आर्ततेने हाक मारावयास हवी. त्यांची फी आहे निष्ठा आणि सबूरी हे दोन पैसे. ही फी ज्यांच्या जवळ आहे त्यांच्याकरीता बाबा दूर नाहीत.

विशेष म्हणजे ही घटना घडली त्यावेळेस एकही डॉक्टर जवळ नव्हते. कारण त्या लौकिक डॉक्टरांना येण्यास वेळ झाला होता. पण त्या आधीच माझ्या साईनाथ धन्वन्तरीने महावैद्यराजाने मला उठवून बसविले. आज मी बाबांच्या कृपेने पूर्ण स्वस्थ आहे माझा डावा हात व शरीराचा अर्धा भाग पूर्ण बरा झाला आहे व नित्याप्रमाणे मी साईसेवेमध्ये दंग आहे माझ्या जीवनातील ही महान अद्‌भूत घटना आहे बाबांच्या कृपेने मला नवजीवन मिळाले व ते मी बाबांच्या चरणी अर्पण केले बाबा त्याचा स्वीकार करो, ही प्रार्थना आहे.

# मुलीचे बाळंतपण व साईबाबा

**श्री. अनिल केशवराव रसाळ**
तिसरा मजला, खो. नं. ३८२,
बिल्डिंग नं. २१, बी. पी. टी.
स्टाफ क्वार्टस, रेनॉल्डस रोड
वडाळा (पूर्व) मुंबई–४००० ३७

● आपल्याकडे मुलीचे पहिले बाळंतपण तिच्या माहेरीच करण्याची प्रथा आहे. त्याप्रमाणे आम्ही दोघानीहि पुण्यास हिच्या माहेरी करण्याचा निर्णय घेतला होता.

एका गुरुवारी सकाळी आमच्या शेजारीणबाई विरजणासाठी दही मागायला आल्या व त्यांनी आम्हा दोघांनाहि बाळंतपण कोठे करण्याविषयी निर्णय घेतला का

असं विचारलं. पुण्याकडील पत्र नसल्याने सौ.ने मला बाबांचा कौल घेण्यास सांगितले. तेव्हा दोन चिठ्या पुणे व मुंबई अशा बनवून बाबांच्या फोटोसमोर टाकल्या व धाकट्या बहिणीला त्यातली एक उचलून घे उत्तर येईल ते मला मी बाहेर उभा आहे तेथे येऊन सांग असं सांगून मी बाल्कनीत उभा राहिलो. त्यावेळी पूजा आम्ही स्वयंपाकखोलीत एका सोयीस्कर ठिकाणी करत असू व केवळ श्रीसाईबाबांचा फोटो मधल्या खोलीत ठेवलेला होता. त्याची मी उभ्याने पूजा करीत असे.

थोड्या वेळाने धाकट्या बहिणीने मला उत्तर पुणे असं सांगितले. मी त्याचा आनंदाने स्वीकार केला.

संध्याकाळी नेहमीप्रमाणे मधल्या खोलीत ठेवलेल्या फोटोची पूजा करताना अनाहूत ध्वनि आला. बाळंतपण मुंबईला करण्याची आज्ञा आहे. पुण्याला नाही. मी तर चाटच पडलो. सौ.ला श्रीसाईसच्चरित्रामधील चिठ्या टाकून निर्णय घेण्याच्या माझ्या विश्वासाविषयी नेहमी शंका वाटत असे. तसं तिने कित्येकवेळा सांगितलेहि होते. त्यामुळे तिने चिठ्या टाकून निर्णय घेण्याचा विचार जेव्हा व्यक्त केला तेव्हा मी स्वतः आश्चर्यचकित झालो होतो.

अनाहूत ध्वनि आल्यानंतर मी धाकट्या बहिणीला बाजुला घेऊन तिला विचारले खरे उत्तर काय होते ते सांग तेव्हा तिने सांगितले की पहिल्यांदा मुंबई हेच उत्तर आले होते परंतु बहिणीने मला पुन्हा चिठ्या टाकायला सांगितल्या व पुणे उत्तर काढायला लावले असे सांगितले. त्यानंतर मात्र सौ. ला विचारले तेव्हा तिनेहि सांगितले, की तिची इच्छा पुण्यालाच व्हावे अशी असल्याने त्याप्रमाणे तिने तिच्या नणंदेला पुन्हा चिठ्या टाकायला सांगितले. बाबांनी वेळीच मला सावध केले नसते तर आम्ही फार संकटात पडलो असतो कारण माझी मुलगी ज्या दिवशी जन्माला आली त्याच्या ११। दिवस आधी माझी आजे-सासू पुण्याला जिथे आमचे सासरे व सर्वजण एकत्र रहातात त्याच घरात दोन दिवस बेशुद्ध पडून वारली. ती बेशुद्ध होऊन गंभीर आजारी असल्याच्या दोन तारा येऊनहि बाबांच्या आज्ञेप्रमाणे मी हिला पुण्याला घेऊन गेलो नाही. त्यामुळे घरात जरी तात्पुरता तणाव निर्माण झाला तरी श्रीसाईकृपेने मुलगी झाली व माझ्या डोक्यावरचे फार मोठे ओझे उतरले.

चिठ्या टाकून बाबांचा कौल मी स्वतः नेहमी घेतो व त्यामुळे ते माझी काळजी घेतात हा अनुभव आहे.

०००

# श्रीसाईबाबांची कृपादृष्टि

* कु. प्रतिभा शांताराम पाटील
मु., कुरुळ, ता. पो. अलिबाग जि. कुलाबा

● माझे आई-वडिल पहिल्यापासून श्रीबाबांचे भक्त आहेत. परंतु श्रीसाई-भक्तिची गोडी मला त्यांचेकडून न लागता पेणला दोन वर्षे सहवास लाभलेले आमचे शेजारी 'कदम आजोबा' यांच्यामुळे लाभली.

हे कदम आजोबा (श्री. दत्तात्रेय जानोजी कदम उर्फ श्रीअद्‌भुतानंद स्वामी) दादरचे श्रीअवधूत स्वामी लिमये यांचे शिष्य. पेणला अगदी शेजारीच रहात असल्याने त्यांच्याकडे सायंप्रार्थनेसाठी आम्ही जात असू. प्रार्थना संपल्यानंतर ते काही-दोन चार उपदेशात्मक शब्द सांगत. ते स्वतः दत्तभक्त आहेत तरीसुद्धा साईबाबांची भेटही त्यांना अनेकदा मिळाली आहे. ते स्वानुभव आम्हास सांगत तेव्हा आपल्याला ही श्रीबाबा भेटावे असे मनात खूप खूप वाटे.

आजोबा म्हणत 'निष्ठा' व 'सबुरी' धरली की बाबा काही लांब नाहीत. 'फुलासंगे मातीस वास लागे' म्हणतात ते अगदी खरं. हळुहळू मला साईभक्तिची गोडी लागली. खरोखर काय चमत्कार तर अलिकडे बाबांचे मधून मधून मला स्वप्नात दर्शन घडतेच.

या कदम आजोबांच्या रूपाने मला साईचरणी पोचविणारा एक दुवाच मिळाला.

श्रीसाईबाबांची आपल्या भक्तावर कशी कृपा दृष्टि असते याचेच लहान लहान अनुभव मधून मधून येतच असतात.

गेल्यावर्षी अशाच पावसाळयाच्या दिवसात माझा १० महिन्याचा भाचा (आता तो २ वर्षांचा आहे) अजित परसाकडच्या आजाराने अगदी व्याकूळ झाला होता. डॉक्टरी उपचार चालू होतेच. एकीकडे श्रीबाबांची ऊदी ही आम्ही सारखी त्याला लावत होतो. पण काहीच फरक जाणवत नव्हता. कदाचित जास्त कमी झाल्यास तावडतोब अलिबाग येथील हॉस्पिटलमध्ये घेऊन जावे अशी डॉक्टरांची सूचना होतीच.

वार गुरुवार होता. थोड्या फार काळजीतच मी झोपी गेले. थोड्या वेळाने मला स्वप्न पडले की माझ्या मुठीत पैसे आहेत व बाबा ते मागत आहेत. मी स्वप्नातच माझ्या मुठीतील सर्वच्या सर्व पैसे बाबांच्या स्वाधीन केले.

पहाटे मला जाग आली. स्वप्नाचा अर्थ मी लावत होते. बाबा स्वप्नात आले म्हणजे काहीतरी शुभशकूनच होता. शिवाय बाबांनी माझ्याकडून पैसे मागितले होते. मला खात्री पटली की अजितची तब्येत आता नक्की सुधारणार; नि खरोखर आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याच्या प्रकृतीत खुपच फरक झाला व पुढे त्याला, त्या चिमुकल्या जीवाला हॉस्पिटलमध्ये नेऊन तेथे त्याचे होणारे हाल व पुढचे सर्वच बाबांनी टाळले.

भक्तांवर सदैव सत्कृपेचा दृष्टिक्षेप टाकणाऱ्या या साईमाऊलीला माझे शतशः प्रमाण !

श्रीसाईबाबांना माझी सदैव प्रार्थना।
भावपुष्प मी तुला अर्पूनि प्रणाम तुज करिते।
'प्रतिभा' ही त्वचरणी सदैव नतमस्तक होते॥

◆◆◆◆◆◆◆◆

२२

# –बाबा धावून आले... वाचलो–

● श्री. स. द. महाजन
पाध्ये भुवन, जामदार मंदिरासमोर,
महाल, नागपूर

● १९७५ सालच्या डिसेंबरची १० किंवा ११ तारखेची गोष्ट आहे. मी ऑफीसच्या कामाकरीता पुणे येथे गेलो होतो. ॲडव्हान्स घेतला होता तो गेला संपून. मित्रमंडळींनी आग्रहाने असे सांगितले की नागपूरवरुन इतक्या दुरुन आलासच आहे तर शिरडीला जा साईनाथांचे दर्शन घे. मलाही फारच उत्सुकता होती दर्शनाची पण... मी नागपूरचे तिकीट काढून ठेवले होते. सर्व पैसे संपले होते आणि नेमके पैसे उरले. हॉटेलात फराळ करीत असतानाच एक लॉटरीवाला आला सर्वांनी तिकीटे घेतली. मलाही आग्रह केला मनात एकच विचार बाबांचे दर्शन.

रात्री ९ वा. लॉटरीचा निकाल पाहिला तर मला २५ रुपयाचे बक्षीस लागले होते. दुसऱ्या दिवशी नागपूरला येण्याकरिता स्टेशनवर गेलो पण काय कुणास ठाऊक मला कोणी तरी हाक मारीत आहे असाच भास होत होता. शेवटी मी तिकीट परत करून फिरलो. लॉजवर परत आलो.

दुसऱ्या दिवशी ५–३० वा. एस. टी. ने शिरडीला आलो. बाबांचे दर्शन घेतले. तिथे मुक्काम केला नंतर मला असे कळले की मी ज्या गाडीचे तिकीट काढले होते त्या गाडीला अपघात झाला होता. असा मी बचावलो. जर बाबा धावून आले नसते तर पुढील कल्पना करवतच नाही.

शिरडी सोडताना फारच वाईट वाटले पण श्री. चैतन्य ह्यांनी कोणतीही ओळख नसताना सुद्धा मला बाबांचं एक सुंदर छायाचित्र दिले. त्यांचा मुक्काम श्रीशिवानेसन स्वामी चावडी ह्यांच्याकडे होता. बाबांच्या रुपाने श्रीचैतन्य स्वामींनी माझी बरीच चौकशी केली.

❖❖❖❖❖❖❖❖

# श्रीसाईबाबांची पवित्र ज्योत

सौ. सुलभा दि. ऋषि
रेनुकूट, जि. मिर्झापूर ( उ. प्र. )

● श्रीसच्चिदानंद सद्‌गुरु बाबांचे सान्निध्य मिळाल्यावर ह्या संसारात सदा आनंदच आहे. नाही तर कोवळया वयात मातेच्या दुधानेच पोळल्यावर दूध काय आणि पाणी काय फुंकून प्यायले तरी जीवनात भयंकर भयाचा अंधकार सामावलेला आहे. मग बाबांच्या एका पवित्र ज्योतीच्या आधारावर क्षणाक्षणाला पाऊल टाकणाऱ्या पामराने आपला स्वानुभव काय सांगावा !

तसेच माझे आहे, सर्व जीवनच बाबांच्या स्वानुभवाने ओथंबलेले आहे. माझी दोन्ही मुले, माझे यजमान व मी नेहमीच बाबांच्या विभूतीने कुठल्याही दुखण्यातून

मुक्त होतो. माझं कुठलंही कार्य ज्याचा निर्णय माझे मन घेऊ शकत नाही, ते मी माझ्या बाबांना विचारूनच करते.

नुकतेच एक उच्च पद, मी नाही नाही म्हणता माझ्यावर सोपविले गेले. एका अल्प बुद्धी, घरगुती बाईने ही जिम्मेदारी कशी सांभाळावी ? परंतु बाबांनी जबाबदारी घेण्यास आदेश दिला. आमचा पदग्रहणाचा प्रथमचा सोहळा फार मोठ्या प्रमाणात होणार होता. झाले, मी बाबांच्यावर ओझे टाकले व निमूटपणे जे कार्य येईल ते करीत गेले. त्या दिवशी जवळ जवळ चारशे प्रतिष्ठीत लोकांनी सभागृह गच्च भरलेले होते. पूज्य बाबांचे मला सानिध्य होतेच आणि त्या जोरावर, एखाद्या तरबेज स्वाराप्रमाणे मी त्या सोहळ्याची गाडी निर्धास्थपणे हाकून नेली. आता पूर्ण वर्षाची ही गाडी हाकण्यास बाबाच मार्ग दाखवतील असा मला भरवसा आहे.

बाबांची मर्जी असल्यावर कोणतेही कठीणात कठीण कार्य बाबा करवून घेतात, ह्याची मला ह्या प्रसंगानंतर खात्री झाली. परंतु त्याचे यश ते आपल्या पदरी घालतात व खोट्या प्रतिष्ठेने आपण भारावून जातो. हे जरी खरे आहे; तरी देवा तू क्षमेचा मेरु आहेस, मला क्षमा कर व तुझ्या सच्चिदानंद रूपाचे दर्शन देऊन आनंदी कर.

अत्यंत विनम्रपणे नत मस्तक होऊन मी हे दुसरे तुळशी पत्र श्रीसाईनाथांच्या साईलीलेस अर्पण करते.

----------

# सौ. बाळंत झाली

ए. पी. लवंदे
करंगुट, गोव

● ता. १० फेब्रुवारी १९७५ रोजी माझी सौ. बाळंतपणासाठी प्रसुतीवेदना होताच इस्पीतळमध्ये गेली. जाताना ती बाबांची उदी आपणाबरोबर नेण्यास विसरली नाही. थोड्या थोड्या वेळाने पाण्यात उदी घालून घेण्याचे काम तिचे चालू होते. कारण साईबाबांवर तिचा पूर्ण विश्वास ! बाबा आपणाला सुलभपणे मोकळी कर-

तील याची तिला पूर्ण खात्री होती. पण दोन दिवस झाले अजून सुटका होईना म्हणून डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचे ठरवले व बाहेर येऊन मला सांगू लागले. मी थोडे थांबण्याकरिता डॉक्टरांना विनंती केली. पण डॉक्टर मला संतापून म्हणाले की, माझ्यापेक्षा तुला जास्त माहित आहे काय ? मुलाचे तर ठोके बंद पडले आहेत आणि तिची वेदनासुद्धा बंद पडत चालली आहे. सिस्टरना सर्व तयारी करण्याचा आदेश दिला व आपण गुंगी आणण्याच्या डॉक्टरांना बोलविण्याकरिता निघून गेले मी तर सकाळपासून इस्पितळात बसून बाबांचा धावा करीत होतो. डॉक्टरांचे हे शब्द ऐकून मला घाम सुटला. मला काही सुचेनासे झाले शेवटी मी माझ्या खिशात असणाऱ्या डायरीतील फोटोकडे पाहून संतापून बाबांना विचारले, बाबा, तुला तुझ्या भक्तांची जरा तरी कीव येत नाही काय ! माझा असा अंत पहातोस तेव्हा तुझे जर सत्य स्वरूप दाखवायचे असेल तर हिच वेळ योग्य आहे. डॉक्टर येण्यापूर्वी सौ. ची सुटका कर मी तुझा अनुभव प्रसिद्ध करीन. बाबांना माझी कीव आली की काय कोण जाणे. इतक्यात डॉक्टर दुसऱ्या डॉक्टराला घेऊन खोलीच्या दारात उभे होते तोच मुल रडण्याचा आवाज माझ्याकानी आला. कुणाचं मूल असेल बरं ! आमच्या सौ. ची तर ऑपरेशनची तयारी चालली आहे. असा विचार माझ्या मनात येत असताच एका नर्सने तुमच्या सौ. ला मुलगा झाल्याचे सांगितले. हे ऐकल्याबरोबर अतिशय आनंद झाला. आता आमच्या मुलाला अडीच वर्षे झाली आहेत. गेल्यावर्षी तो अकस्मात आजारी झाला, त्यावेळीसुद्धा बाबांवरच आम्ही भार टाकला व माझ्या मुलाला गुण आला.

# श्रीसाईबाबांचे छत्र

* सौ. मालतीबाई ल. रणदिवे
तावडे बिल्डिंग कुंभारवाडा, दादर–२८

* ८ ऑगस्ट १९४२ दिनी राष्ट्रपिता महात्मा गांधींनी :" चले जाव " या चळवळीची घोषणा केली. त्यानंतर १–२ वर्षांतलाच प्रसंग आहे. यावेळी भारतातील

अंतर्गत परिस्थिती अत्यंत बिकट होती. नेत्यांना बंदीखान्यात डांबण्यात आले होते. मुंबापुरीतील जनतेला दैनंदीन व्यवहार करणे दुष्कर झाले होते. गोरे सैनिक ठिक-ठिकाणी ठाण मांडून बसले होते. ऑस्ट्रेलियन गोऱ्या सैनिकांच्या गाड्या गल्लोगल्ली संगीनी रोखून हिंडत होत्या. काही ठिकाणी या गाड्या थांबत असत व बेछुट गोळीबारांचे आवाज कानठळया बसवीत असत. निरपराधी माणसे गोळीबाराला बळी पडत अगर जखमी होत. मदांध सत्ताधारी सत्ता टिकवण्यासाठी वाटेल त्या क्रूर पाशवी व सैतानी वृत्तींचे दर्शन घडवित होते. अशा वेळी एके दिवशी दुपारी मी आपल्या चार मुलांसह आमच्या राहण्याच्या ठिकाणाहून म्हणजे दादर कुंभारवाडा तावडे बिल्डिंग येथून माझ्या आगरबझारमध्ये रहाणाऱ्या भगिनीकडे गेले होते. माझी सर्वात मोठी कन्या सौ. वैदेही र. शृन्गारपुरे ही त्यावेळी दहा वर्षाची होती व त्यावेळी सर्वात लहान कन्या सौ. मिलन विजय गडकरी ही १॥ वर्षाची असून माझे कडेवर होती. दुसरी दोन मुले म्हणजे माझा पुत्र चि. नरेश ५ वर्षाचा व माझी कन्या सौ. सुलभा अरविंद कुलकर्णी ही ३ वर्षाची होती. आम्ही तेथे सायंकाळपर्यंत थांबलो व सायंकाळी ६ वाजता घरी यावयास निघालो. बाहेरची परिस्थिती थोडी भयप्रद वाटत असल्यामुळे माझे पिताजी कै. काकासाहेब देशपांडे यांनी मीं तुम्हास पोहचवायास येऊ का म्हणून विचारले. परंतु येथे जवळच जावयाचे आहे तुम्ही कशाला त्रास घेता असे म्हणून मी मुलांना घेऊन चालावयास लागले. आम्ही दादर पोर्तुगीज चर्च पर्यंत येतो न येतो तोच संगीनीं रोखलेल्या गोऱ्या सैनिकांची गाडी तेथे आली. लोकांची भयाने पळापळ झाली व एकच गडबड उडाली. चर्च जवळ एक मिशनरी शाळा होती त्या पटांगणात आम्ही घाबरून शिरलो. मी व माझी जेष्ठ कन्या यांनी बाबांचा धावा केला. त्यांचे नामस्मरण चालू केले व बाबा आम्हाला या संकटातून वाचवा अशी बाबांना आर्त हाक मारली आमच्या हाकेने बाबांचे दयाळू अंतःकरण द्रवले व चमत्कार असा की लांब हातापायाची डोक्याला मुंडासे बांधलेली अशी एक व्यक्ति समोर आली व तिने विचारले 'बाई तुम्हाला कोठे जावयाचे ?' मी सांगितले की या चर्चच्या गल्लीत जावयाचे आहे. तेव्हा ती व्यक्ती बोलली की 'बाई, तुम्ही येथे उभे राहू नका. चला मी तुम्हाला पोहचवितो'' नंतर आम्हाला पुढे करून पाठीमागे ते वृद्ध गृहस्थ होते व गल्लीत थोडे आत आल्यावर त्यांनी सांगितले की 'आता तुम्ही जाल ना ?' माझ्या मोठ्या मुलीने म्हटले की आता आम्ही जाऊ पण आजोबा तुम्ही आता कोठे जाता ? ते म्हणाले, 'बाळ, माझी काळजी करू नकोस, तुम्ही आता जा.' असे म्हणून आम्ही थोडे पुढे आलो व पाठीमागे पाहतो तो कोणीच नाही. आजोबा कोठे गेले ? आणि मग चक्क प्रकाश पडला की या संकटकाली श्रीसाईमाऊलीनेच आमचे रक्षण केले. घरी

येऊन मी ही सर्व हकीकत माझ्या पतीना सांगितली त्यावेळी त्यांची मनःस्थिती काय झाली असेल त्याचे वर्णन करता येणार नाही. इतकेच म्हणाले, " माझे आतेभाऊ कै. दादासाहेब कर्णिक यांनी बाबांच्या नामस्मरणाचा मार्ग मला दाखवला नसता तर आज काय परिस्थिती झाली असती! त्यांचे ऋण व बाबांची कृपा ही माझी मौल्यवान दौलत आहे. 'पुढे आम्ही गल्लीत वळता-क्षणीच गोळीबाराचे धडाधड आवाज होऊन जवळच्याच इमध्ये टेरेसमध्ये वरच्या मजल्यावर रहाणाऱ्या एका मुलीस गोळी लागून तिचे कान फाटले व तिचे पिताजी श्री. देशपांडे हेही जखमी झाले होते. असो–बाबांचे हे कृपा छत्र त्यांच्या भक्तांच्या शिरावर नेहमी राहो हीच त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना!

••••••••

# श्रीसाईकृपेचे दिव्य अनुभव....

श्री. चकोर आजगावकर एम्. ए.
बाय–११/१६ सरकारी वसाहत,
वांद्रे ( पूर्व ), मुंबई ४०००५१

● श्रीसाईबाबा म्हणजे दयेची देवता, कारुण्याची मूर्ति! श्रीदत्तप्रभुंची प्रेम-करुणा शक्तिच जणू श्रीसाईरुपाने आकारली आहे. माझ्या सारख्या अगदी सामान्य माणसाच्या जीवनाला देखील ते कृपेचा सहजस्पर्श करून जातात, तेव्हा मन भारा-वते, कृतज्ञतेने ओथंबते व प्रेमाने भिजलेले डोळे त्या स्वरुपाच्या मनोमय स्मरणात डुंबतात.

● ते १९६४ साल होते. आम्ही फार त्रस्त मनःस्थितीत होतो. अशा वेळी एक दिवस माझ्या वडिलांना भर दुपारी श्रीसाईबाबांचे दर्शन घडले. त्यांनी थोड्या करड्या स्वरात वडिलांना म्हटले ' अरे, तू मला विसरलास.' माझ्या वडिलांची व साईबाबांची प्रत्यक्ष भेट १९१६ च्या सुमारास घडली होती. पण हे दृष्टांत दर्शन होते. वडील म्हणाले, " बाबा, संकटामुळे आपला विसर पडला असेल, तर क्षमा

करा.'' बाबा म्हणाले, "मी भक्तांना कधीहि विसरत नसतो.'' त्यांनी एक पुस्तक मागितले. ते कोणते ते त्यांना कळले नाही. मी १९५५ पासून श्रीबाबांच्या चरित्राच्या नोटस् घेत होतो. बहुधा हाच उल्लेख असावा. पुढे १९७१-७२ मध्ये म्हणजे १६ वर्षांनी श्रीबाबांच्या प्रेरणेने माझ्या हातून "श्रीसाईगीतायन'' ही संगीतमय गीतमाला योगायोगाने लिहिली गेली, याचे हा दृष्टांत म्हणजे एक प्रसादचिन्हच असावे !

* माझी पत्नी सौ. कौमुदी हिला लग्नापूर्वी ३ वर्षे म्हणजे १९५३ मध्ये मिलिंद माधवांच्या श्रीसाईस्तोत्राच्या वचनाची गोडी लागली. १९५५ मध्ये मला अस्पृश्यतानिवारणावरील नाट्यस्पर्धेत रु. १००० चे राज्य पारितोषिक मिळून मीहि बाबांच्या प्रेमात गुंतलो. पुढे दोघांच्याहि साईप्रेमाने संसाराला श्रीसाईभक्तिरुप सोनेरी किनार जोडली गेली व शिरडी दर्शन, साईसचरित पाठ इत्यादि आमच्या घरी वारंवार होऊ लागला. एकदा माझ्या साईबाबांबद्दलच्या तीव्र प्रेमाला उद्देशून सौ. कौमुदीने "बाबांचे दर्शन घडले, तर तुमचा सर्व खटाटोप खरा म्हणेन'' असे रात्रौ सहज उद्‌गार काढले. परंतु मला माझ्या भक्तीचा अभिमान मुळीच नव्हता. मी म्हटले, "नसेल माझी भक्ती. पण बाबांनी तुला का दर्शन द्यावे? दुसरे दिवशी सकाळी आम्ही उठलो. सौ. कौमुदी देव्हाऱ्यात नमस्कार करावयास गेली. तो आश्चर्य घडले. तिला द्वारकामाईत बसलेले बाबा उठून उभे राहिले आहेत व आपल्या हातून निरांजन हंसत हंसत स्वीकारीत आहेत असे प्रत्यक्ष दर्शन घडले ! आदल्या रात्रीचा सुखसंवाद त्या दत्तशक्तीने जणु ऐकला व आपल्या भक्ताची लाज सावरली ! केवढे प्रेम व करुणा.

* "श्रीसाईगीतायन''च्या निर्मिती काळात मला बाबांचे स्वरुप एका गीतात रंगवायचे होते. अशा वेळी बाबांचे राम, कृष्ण, शिव, हनुमान, देवी यापैकी खरे स्वरुप कोणते ही शंका मनात डाचत होती. कारण ते प्रत्येक रुपात भक्तांना दर्शन देत. परंतु अशा चिंतन काळात एके दिवशी भर दुपारी शेषाच्या फणेवर टेकून झोपलेल्या भगवान् नारायणाचे दिव्यदर्शन मला घडले. याच रुपात बाबांनी डेंगळे यांना दर्शन दिले होते. त्यांचे गुरु गोपाळस्वामीहि व्यंकटेश श्रीविष्णुस्वरुपाचे भक्त होते. माझ्या हातून गीतरचना घडली:-

मनमोहन श्रीसाईद्वारकाविहारी
शेषशायी नारायण शंखचक्रधारी ॥
हा मुकुंद, हा माधव
हा अनंत, हा केशव
हा सुरेश, श्रीनिवास, हा हरी, मुरारी ॥

हे बाबांचे श्रीविष्णुरुप माझ्या मनात जे ठसले, ते कायमचे. तो द्वारका निवासी श्रीकृष्णबाबांच्या प्रेमस्वरुपात अखंड क्रीडा करीत आहे. लीलाविग्रहाने खेळतो आहे, याचा प्रत्यय अनेक भक्तांनाहि आहे.

◇◇◇◇◇◇◇◇

# = समर्थ गुरु साईनाथ पुरवी मनोकामना =

**श्री. पुरुषोत्तम विठ्ठल बावकर**
ए/३ चेतना अपार्टमेंट
जंगल मंगल रोड, भांडुप ७८.

● शाळेत असताना २५ वर्षांपूर्वी सहल म्हणून शिरडीस मित्रमंडळीसमवेत आलो होतो. त्यानंतर नोकरी लागून १५/१६ वर्षे झाली. गेल्या ८-१० वर्षांपासून वर्षातून एकवेळ शिरडीस श्रीसाई दर्शनाचा लाभ घेत आहे लग्न झाल्यानंतर स्थाईक अशी कुठेही जागा नव्हती तेव्हा ज्या ज्या वेळी साई दर्शनाचा लाभ होत होता. त्यावेळी एकच इच्छा होती कुठेही मुंबईत स्वतःचे वास्तुस्थान असावे. गेली १५ वर्षे भांडूप येथे रहात आहे, व त्याचवेळी परिचित असे एक सद्‌गृहस्थ श्री. भारतसिंग बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर यांचा सहवास लाभला व त्यांच्या व श्रीसाई प्रेरणेने घर घेण्याचे निश्चित केले. आलेल्या सर्व आर्थिक अडचणीत श्री. भारतसिंग यांनी सह-कार्य दिले व स्वतःचे वास्तुस्थान उभारू शकलो. त्याचप्रमाणे १९७५ च्या दिवाळीत श्रीसाईनामस्मरण घेत वास्तुत प्रवे श केला त्यानंतर स्वतःच्या घरी श्रींच्या पूजेसाठी एक देव्हारा बनवून घ्यावा अशी इच्छा झाली. जवळच रहाणारे एक परिचितश्री. खानोलकर (मिस्त्री) यांचा विचार घेतला त्यांनी तावडतोब देव्हारा बनवून देण्याचा निश्चय केला. परंतु एका अटीवर फक्त लागणारे सामान मी घ्यावे. परंतु देव्हारा बाबांचा आहे, तेव्हा मला मोबदला घेता येणार नाही. मात्र देव्हारा त्यांच्या सवडीनुसार बनविला. (ते स्वतः नोकरी करतात.) ह्या अटीवरच त्यांनी जवळ जवळ २ महिने घेतले शेवटी देव्हाऱ्यासाठी लागणाऱ्या सळ्यासाठी काम अडले. फार शोधाशोध केली परंतु काही केल्या सापडेनात. शेवटी आमच्या कंपनी-

तील माझे सहकारी श्री. तात्या बानसोडे यांनी तशा प्रकारच्या सळया गुलालवाडी पायधुणी येथे मिळतील असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांच्या समवेत तिथे गेलो. तर मला हव्या असलेल्या मापाच्या मिळेनात. तेव्हा कंटाळून गेलो. तेवढ्यात रस्त्यावर जवळ जवळ सहा फूट उंचीची डोकीवर कपडा व सफेद कफनी असलेल्या व्यक्तीने बेटा म्हणून हाक दिली व 'कभी शिरडी गया था' असे विचारले. मी हो असे म्हणताच 'हमको कभी शिरडी में देखा क्या?' ह्याउद्‌गारावर मी नाही असे सांगितले तर त्यांनी गुरुस्थान येथील लिंबाच्या झाडाजवळ मला भेट म्हणून सांगितले व माझ्याजवळ चहासाठी पैसे मागितले. मी खिशात हात घालून चार आणे त्या फकिरास दिले. पुढे मी व श्री. बनसोडे सळया शोधण्यासाठी पुढे गेलो तर त्याच ओळीतील एका दुकानदाराने बोलवून काय पाहिजे म्हणून चौकशी केली त्याला सळयाबद्दल सांगताच त्याने संपूर्ण बार (२५ फुटाचा) घ्या असे म्हणाला.त्याला बाबांच्या देव्हाऱ्यासाठी सळया पाहिजेत असे सांगितले तेव्हा त्याने मला हव्या असलेल्या मापाच्या सळया कापून दिल्या. त्याचवेळी मी व श्री. बनसोडे दुकानात बसलेले असताना पुन्हा तीच मूर्ती समोर रस्त्यावर उभी. उठून पहाण्यासाठी जाणार तोच पुढे कुणीहि नाही अशा परिस्थितीत हात जोडले गेले नाहीत तरच नवल ! नमस्कार केला सळया घेऊन घरी आलो साक्षात दर्शन झाले या भावनेने उर भरून आला श्री. खानोलकर मेस्त्री यांनी सळया पसंतच केल्या व देव्हारा मन लाऊन करून दिला.

********

# साईची मजवर कृपा

सौ. हिराबाई राधाकृष्ण केरकर
पी. एम. टी. कॉलनी,
घोरपडे पेठ, पुणे २

● माझी मुलगी चि. साधना ही खेळत असता एका सायकल स्वाराची सायकल तिच्या पायावरून गेली (१९६० साली) व तीचा पाय फ्रॅक्चर झाला.

ससून हॉस्पीटल मध्ये प्लॅस्टर केले व पुढे प्लॅस्टर काढले व पायाचा एक्सरे काढला तर हाड बरोबर जुळले नसल्याचे दिसून आले. डॉक्टरनी सांगितले की हाड मोडून परत ऑपरेशन करून बसवावे लागेल व आठ दिवसानी बोलाविले. मी घरी आल्यावर श्रीसाईबाबांची मनोभावे प्रार्थना केली व नवस केला. माझे पती हे १९५२ पासून दरवर्षी शिर्डीची वारी करतात त्यामुळे आम्ही १९५२ पासून श्रीसाईबाबांचे कृपेने आमचा मार्ग चालत आहेत नंतर आठ दिवसांनी ससून मध्ये गेलो परत एक्सरे काढला व आश्चर्याची गोष्ट ! डॉक्टरनी सांगितले हाड व्यवस्थित आहे. तुम्ही जा.

१९७२ साली मी खूप आजारी पडले, आमचे फॅमेली डॉक्टर महाबळ यांनी सुद्धा आशा सोडली व मला हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले त्याच दिवशी बाबा माझे स्वप्नात आले व 'घाबरू नको मी आहे' असे सांगितले व गेले. नंतर मला उतार पडून मी पंधरा दिवसात घरी आले.

१९७३ साली माझे पती मेनिनजायटीसने आजारी पडले त्यांना मी मुंबईला नेले तेथे त्यांचे लहान बंधू डॉक्टर आहेत त्यांनी सुद्धा आशा सोडली पण प्रयत्न चालू होते. मी बाबांना नवस केला व सांगितले बाबा आतापर्यंत वेळोवेळी सांभाळलेत तरी माझे हे सर्वस्व सांभाळा व सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला कारण माझे पती त्यातून सुखरुप बरे झाले. त्यांचे डॉक्टर भावाने तर अजबच केले. श्रीसाईबद्दल जेवढे सांगावे तेवढे थोडेच आहे.

## मी, लग्न व साईबाबा

**श्री. गणेश प्रभाकर बर्वे**
मेंगदेवाडा, खारीबाव रोड, रावपुरा
पोलीस ग्राऊंड समोर, बडोदा

● मला आलेल्या श्रीसाईबाबांच्या अनुभवापैकी एक श्रीसाईबाबांचा अनुभव लिहिण्यास आनंद वाटतो. माझे लग्न १९४१ साली झाले. त्यावेळेस श्रीसाई

हे कोण ?, कुठले ? वगैरे माहीत नव्हते. १९४३ साली मला मुलगा झाला आणि तो १० महीन्याचा असतानाच त्याला देवाज्ञा झाली; त्यावेळेस डॉक्टरांनी मला १९४९ साली सांगितले, मिसेसचे ऑपरेशन केल्याशिवाय मुल होणार नाही, म्हणून आम्ही मुंबईस ऑपरेशनसाठी गेलो. ऑपरेशन काही कारणाने झाले नाही. त्याच वेळेस बडोद्यास माझ्या बहिणीस श्रीसाईची माहिती मिळाली व ती पुजा करू लागली. तिने नवस केला की, "माझ्या भावास मुल होऊ दे," माझ्या भावाकडून तुझी सेवा करवीन." मी मुंबईहून त्यानंतर एक महिन्याने परत आलो आणि ताबड-तोब माझ्या बहिणीने सांगितल्याप्रमाणे सेवा करावयास लागलो. श्रीसाईंच्या कृपेने मला १। वर्षात मुलगी झाली. तिचे नाव "साईप्रभा" ठेवले. त्यानंतर सेवा चालूच ठेवली, व आता माझ्याकडे छोट्याशा श्रीसाईंच्या पादुकांची प्राणप्रतिष्ठा करून बसविल्या आहेत व एका भक्ताकडून मला एक मोठा लाकडी सिसवी देव्हारा व त्यात २॥ फुटाची श्रीसाईबाबांची मूर्ती मिळाली आहे. त्यामुळे माझ्या घराला श्रीसाई मंदीराचे स्वरुप येऊन गुरुवारी बरेच लोक दर्शनाला येतात, ही एक श्रीसाईची कृपा आहे.

साईंनी १९५१ ते १९६१ पर्यंत २ मुलगे व ३ मुली दिल्या त्यांची नावे साईप्रभा–साईप्रकाश–साईनंदा–साईकल्पना–साईसंतोष अशी आहेत. श्रीसाईंच्या कृपेने मुले पण देखणी आहेत.

●●●●●●●●

# साई किमया

श्री. शंकर पोटे, स्टेशन रोड, आर्वी

● मी वर्ग ११ वीत शिकणारा नास्तीय मुलगा पण साईकृपेमुळे आस्तिक झालो.

मी दिनकरराव देशपांडेच्या घरी राहतो व शिक्षण घेतो. माझे आईवडील दहेगाव ( मुस्ताफा) या खेड्यावर राहतात. मी राहातों तिथे श्रीसाईलीला नावाचे मासिक येते. ते मी वाचत असतो, मी जरी नास्तिक असलो तरी धार्मिक पुस्तके व

मासिके वाचण्याचा मला शौक आहे. १९७७ च्या उन्हाळयात आईवडीलांच्या भेटी-साठी गेलो होतो. आर्वी ते दहेगाव अंतर नऊ कि. मी. आहे. मी खेडयावर गेल्या-वर माझ्या चुलत भावाने सायकल फिरायला नेली आणि मागच्या चाकाचा टायर फाडून आणला. आता चालत जायचे फार जिवावर येते म्हणून आर्वीला परत जायचे कसे हा विचार भेडसावू लागला. सायकलवर एक-दोन कि. मी. बसून गेलो तर टयुब फाटायची आणि १ रुपया ऐवजी ७–८ रुपये खर्च होण्याची भीती त्यावेळेस मला श्रीसाईलीलामध्ये वाचलेले भक्तांचे अनुभव आठवले. म्हणून म्हटले पाहू या. खरोखरच साईबाबांना शरण गेल्यावर धावून येतात का ? आणि साईचे नाव घेऊनच सायकलवर बसून निघालो. गंमत अशी, आर्वीत आलो तेव्हा असे आढळून आले की जेवढा टायर खेडयावर फाटला होता तेवढाच आहे. हे पाहून मला नामाची किमया पटली तेव्हापासून मी माझ्या खोलीत साईचा फोटो लावला व प्रत्येक दिवशी साईचरणी माथा टेकवितो.

********

# बाबांनी मला चार रुपये दिले

● लीलाताई शं. गोलतकर
नवानागपाडा, हिरजी गोविंदजी बिल्डिंग,
तिसरा मजला, खो. नं. ३,
मुंबई नं. ८, भायखळा

● काही वर्षापूर्वीची घटना आहे ही. त्यावेळी माझ्याकडे साईबाबांचे स्थान नव्हते. नेहमी प्रमाणे माझी पूजा-अर्चा, स्तुती-स्तोत्र चालू असायची ह्यात खंड पडत नव्हता. बहीण-भावांच मायेच नातं जोडल गेलं होतं. ते सुद्धा मिलींद माधव यांच्या "साई महात्म्य ह्या स्तोत्रा वरून". ते माझ्या ह्या वेळी वाचनात आलेलं होतं ह्यातली प्रार्थना मला खूप आवडायची व अजुनही आवडते.

ह्या वेळी माझ्यावर असा प्रसंग ओढवला होता की, आमच्या दूधवाल्याचे अवघे ४ रुपये मला द्यावयाचे होते. ते द्यायला माझ्या जवळ नव्हते. माझ्या

काकांचा पगार (वडीलांचे भाऊ) वेळेवर व्हायचा नाही. त्यामुळे दिवस मागे पुढे व्हायचे...

उद्या जर दुधवाला आला तर मी त्याला काय सांगू ह्या विचाराने माझं मन उदास झालं. एका शेजारच्या बाईजवळ मी पैशाची मागणी केली. कारण मला माहित होतं की, तिच्याजवळ पैसे असतात. पण तिने मला पैसे नाहीत म्हणून सांगितले. मला ह्याचं खूप वाईट वाटलं. कारण मी पैसे तिच्याजवळ कधीच मागितले नव्हते पण बाबांना काळजी. याच दिवशी संध्याकाळी ७।। वाजता मी पाणी भरायला नळावर– जात असतेवेळी वाटेतच जिन्याजवळ पडलेले एक एक रुप-याच्या चार नोटा सापडल्या. मी थोडा वेळ तिथेच उभी राहिले. न जाणो. कुणाचे पडले असतील कुणी शोधत येईल तर त्याचे त्याला द्यावेत. पण कुणी आलं नाही. मी नळाला कळशी लावली नि घरात येऊन काकांना सांगितले. मला पैसे मिळाले. माझ्या मनाची अगदी खात्री झाली बाबांनीच ते दुधवाल्याला देण्यासाठी दिले असतील आणि अगदी तेवढ्यांत नकळत माझे हात जोडले गेले बाबा...

पण सकाळी उठल्याबरोबर माझ्या मनात आलं, बाबांनी दिलेले पैसे दुधवा-ल्याला का देऊ आज ना उद्या देणारच आहे ना मी- आणि सकाळी दहाच्या सुमारास मी खाली उतरले. कारण आमच्या बिल्डिंगच्या खालीच फोटोचे दुकान होते. तिथे जाऊन बाबांचा ॐ मधला सुंदर फोटो घेऊन आले. माझ्याजवळ फोटो नव्हता असं नाही पण मला पैसे दिले ना त्यांनी ! मग माझं तर मन ह्यावेळी साईमय झालेलं होतं. आणि उरलेल्या पैशाचे हार, उद्बत्ती, पेढे आणले. आणि बाबांची मनोभावे सुंदर पुजा केली. उद्बत्तीच्या प्रसन्न वातावरणात मन समाधान पावलं. डोळे भरून बाबांकडे पाहिलं किती ते छान दिसत होते ह्यावेळी. इतक्यात एक फकीर येऊन दारात उभा राहिला. त्यांनी माझ्याकडे व बाबांकडे पाहून "अल्ला तेरा भला करेगा बेटा" म्हणून आशिर्वाद दिला. मी भानावर आले, बाहेर येऊन पहाते. त्याला काहीतरी द्यावं म्हणून पण तो कुठे गेला समजलेच नाही. बाबाच आले होते ते. आशिर्वाद द्यायला. बाबांची लीला अगाध आहे, त्यांचे चमत्कार अगणित आहेत. साईभक्तांना त्यांचा अनुभव आहेच. आणि विशेष त्याच दिवशी संध्याकाळी काकांचा पगार झाला. व मी दुधवाल्याच्या देण्यातून मुक्त झाले.

आणि बाबांनी दिलेले पैसे मी दुधवाल्याला दिले असते तर आज माझे ॐ वाले बाबा माझ्याकडे आले नसते. ह्यांचा आशिर्वाद मला मिळाला नसता. माझ्याकडे येणाऱ्या असंख्य भक्तांना त्यांचे दर्शन झाले नसते. आणि म्हणूनच बाबांनी दिलेले चार रुपये माझ्याजवळ कायमचे राहिले ॐ कार साईला माझे अनंत कोटी प्रणाम...

★

# बाबांची करणीच अगाध

श्री. बापूसाहेब निरखे
नंदलालपुरा, इंदूर

● त्याचं काय झालं की, ता. ३०–३१ जाने. ७७ च्या लेखक–कवि सम्मेलनाला शिरडीला मी जाणार, हे नक्की ठरलेच होते.

घरातून विचारणा झाली, अहो, दरवेळी शिरडीला जाता, साईबाबाला डोळे भरून पहाता, हात जोडता, तोंडाने पुटपुटता, पण काही म्हणता मागता की नाही? आता ही वीणा एम्. ए. झाली; किती शिकवणार आहात? तिच्या लग्नाच्या स्थळांची, त्यासाठी धडपड नाही का करायची...?

उठ पळ शिरडीला जाता! ते काही नाही, आता जाताच आहात तर वीणाच्या लग्नाची भिक्षाच स्थळाची मंजूरीच घेऊन घरी या! तुम्हीच म्हणता बाबांना सारं सारं काही कळत, दिसतं, समजतं! मग? मी म्हटले, झालं का तुझे बोलणे? अग असं पहा, एव्हाना मी शिरडीला सम्मेलनास जात आहे तर तूही चल! पहा तिथला सोहळा, गम्मत, आनंद, आणि तू माग साईबाबांना आपल्या मनातील इच्छा वीणासाठी स्थळ. अन् आपण उभयतांनी बाबांना प्रार्थना केली गळ घातली तर माझे दयाळू बाबा काही ना काही करतीलच, पहा तर खरं!

अहो, पण पैशा अडक्याची सोय? इच्छा असल्यावर सारं सारं काही जमवितो माझा बाबा!! शिवाय, शिरडी पावेतो जातोच आहे तर पुढे मनमाडहून मुंबई जवळच आहे, भेटून येशील तुझ्या लेकीला, भावाला, झालं, मग काय खुलली कळी! पण लगेच म्हणाली पगारावर घरखर्चात कपात नाही हो करायची?

आणि तुम्हाला सांगतो, निघालो उभयता इंदूरहून आलो शिरडीला. हजर झालो सम्मेलनाला अनेकांच्या भेटी झाल्या. पण घरवालीचा एकच सवाल, अभिषेकाला लौकर बसायचे. अग हो! मी म्हटले, अभिषेकाला बसायचे आणि...आणि वीणासाठी हात जोडून आवर्जून प्रार्थना सुद्धा करायची बाबाला होय ना? दुसरे दिवशी अभिषेकाला उभयता बसलो, पुजा झाली हात जोडले. डोक टेकलं, वारंवार प्रश्न टाकत गेलो. तिनं पदर पसरला. अन् एक टक नजर लावून बसलो भिंतीला टेकून. पण काय बाबांची नजर एकीकडेच. वेडं मन म्हणाले अरे सम्मेलनाला आला ते काम पुरं कर. सौभाग्यवती म्हणे, 'काही बोलला का, मागितले का...?' पण कोण जाणे बाबांची किमया वेगळीच!!!

शिरडीहून जाण्याची वेळ आली. परत परत समाधिमंदीरात जाऊन समाधीला साकडे घातले. माझ्या बाबा ! साईबाबा ! आम्ही उभयता तुझ्याकडे आलो आहोत ! माझं तर ठीक आहे, पण हिचं तर पुण्य आडवं येऊ दे ! करावी हिचेवर दया !! होऊ दे घरात लग्न समारंभ, जावई लेकीला जोड्याने दर्शन पूजनास धाडेन आणखी काय नाही ते करीन...पण देवा बाबा ? पण, पण कसचा ? निघालो आम्ही उभयता कळसाला, देवांना, लोकाना नमस्कार करीत. सम्मेलन संपताच मुंबईला येऊन पोहोचलो. वाटेत रेल्वेच्या डब्यात हिचे एकच विचार मंथन अन् बोलणे, एवढे लोक येतात– बाबा दयाळू आहे म्हणतात, तर मला वाटतं, होईल बाई काही नवल विशेष !! " बाबांची करणीच अगाध " शिरडीचे चुपचाप बसलेले एक टक पहाणारे साईबाबांचा चमत्कार म्हणजेच–दुसरे दिवशी दादरचे साईनिकेतनात आम्ही उभयता, श्रीसाईबाबांना फुलमाळा, दर्शन, दक्षिणा करून परत निघालो तर सभागृहाचे दाराशी आतल्या बाकावर एक नवीनच ओळख झालेल्या सौभाग्यवती माता माऊली आई बसल्या होत्या. त्या सौभाग्यवतीला म्हणाल्या, जाऊन आल्या शिरडीला ? केला नवस बाबाला ? तो सारं काही करतो ! मुलीचं लग्न करताय ना ? तर ऐका ताई, हिला म्हणाल्या मी कधी शब्द कुणाला देत नाही पण म्हणते की, तुम्ही इंदूरला परत जाता आहात ना ? जावे ! होईल सर्व मनासारखे. मुलीसाठी स्थळ तयार आहे तिथं ! तो समोरचा बाबा करणारा साक्षी आहे !

माझ्या सौभाग्यवतीने भाविकतने आशेने पाया पडली मी नमस्कार केला. डोंबिवलीला जावयाकडे आलो ही तिथं राहिली व मी नोकरीमुळे इंदूरला परतलो.

तर सांगायचं असं की, इंदूरला घरात पाय ठेवताच मुलांचा पहिला प्रश्न, किती दिवस लावलेत तुम्ही बापूसाहेब अन् आई कुठाय ? मी म्हटले अरे पण हो ! काय झालं काय असं ? वीणा काय म्हणते ? मोठे चिरंजीव म्हणाले, मागे एका स्थळाला तुम्ही वीणाची कुंडली टिप्पण देऊन गेलात ना शिरडीला, ते स्वतः येऊन बोलावून गेले आहेत घरी या म्हणून !! पाय धुतले, देवघरात शिरलो देवाकडे– बाबांच्या छबीकडे पाहिले उदी लावली, डोळयात अश्रु उभे राहिले. कोणते ? रोकणे कठीण झाले. बाबा तुझी किमयाच अगाध !! कपडे बदलले त्या स्थळाकडे गेलो— सज्जन गृहस्थ, चांगले कुटुंब, पदवीधर मुलगा. गोष्टी होऊन होकार मिळाला व लौकर लग्न कर्तव्य उत्तर मिळाले. घरी आलो, बाबांकडे पाहिले, मुलांकडे पाहिले वीणाने नमस्कार केला बाबाला, मला. " तार " केली मुंबईला. जावयाने घाईने सौभाग्यवतीस इंदूरला आणले. लेकीने आनंदाने आईच्या कुशीत डोळे ओले केले. इंदूरच्या साईमंदीरात जाऊन तिने लेकीला साईबाबांच्या पाया पाडले त्या आनंदाश्रूचे मी काय वर्णन करू.

खरोखर एका सात्विक सौभाग्यवती मातेच्या माध्यमाने माझ्या साईबाबाने माझ्या सौभाग्यवतीची इच्छा पूर्ती केली. पर्यायाने माझ्या हाकेला आकार व होकार

देऊन दोन महिन्याचे अवधीतच ता. ७ मे ला मुलीची लग्नाची हौस फेडली. इतकेच नव्हे तर माझ्या मुलाचेही लग्न १० मे ला उरकवून देऊन दुधात साखर घातली. वारंवार आमचे डोळे साईकडे नत मस्तक होत आहे. आठवण ठेवून जावई लेक १४ मे ला बाबांचे पाया पडून आले.

भाविकहो ! ही कहाणी हकिगत शत प्रतिशत खरी आहे व हे असे जागृत साक्षात्कार माझे बाबा मला व भक्तांना घडवीत आहेत. हेही त्रिवार सत्य !!!

# महापुरातून वाचविणारे....श्रीसाईबाबाच

• सौ. नालिनी नानोटी
हनुमान रोड, सीताबर्डी, नागपूर

● अनेक दिवसापासूनची इच्छा होती की श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी शिरडीला जावे, परंतु प्रत्येकवेळी काहीना काही अडचणी येत होत्या व आमचे रहीत होत होते. अखेर योग जुळून आला व मी, माझे यजमान व माझी ४ वर्षाची मुलगी वंदना असे तिघेजण शिरडीला श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी जावयास निघालो.

माझा हा अनुभव १९६९ सालचा आहे. श्रावण महिन्याचे दिवस होते. आम्ही त्या वेळेस शिरडी-शेगाव-पंढरपूर-तुळजापूर असा प्रवास ठरविला होता. शिरडीला जायची ही आमची पहिलीच वेळ होती. आम्ही मनमाडचे आगगाडीचे तिकिट काढले व मनमाडला आलो. आम्ही मनमाड-शिरडी एस. टी. बसने जाणार होतो. परंतु कळले की, मनमाड-शिरडी रस्ता अतिपावसामुळे बंद आहे. मग फिरून कोपरगावचे तिकीट काढून कोपरगावाला गाडीनेच आलो. शिरडीला जाण्याकरिता कोपरगावच्या एस. टी. बस स्टॅन्डवर जाणे जरूरी होते. परंतु हा रस्तादेखील अतिपावसामुळे व पुरामुळे बंद झाला होता. आता आम्हाला कोपरगावला म्हणजे स्टेशनवरच राहणे भाग होते. आता आम्हाला पुढचा सर्व कार्यक्रम रद्द करून फिरून नागपूरला जावे लागते की काय ? असे वाटू लागले होते, परंतु इतक्यात एक बैलगाडीवाला आपल्या ७-८ वर्षाच्या मुलाला बरोबर घेऊन आमच्यापाशी आला व आम्हाला म्हणाला की तुम्हाला कोपरगाव एस. टी. बसस्टॅण्डवर जायचे आहे काय ? आम्ही त्याला होय म्हणालो. परंतु लगेच त्याला विचारले की इतक्या

पावसात तुझी बैलगाडी चालेल काय ? तो म्हणाला, "तुम्ही काळजी करू नका. तुमच्यासारखेच आणखी १–२ लेकूरवाळे माझ्या बैलगाडीत बसले आहेत त्यांना देखील कोपरगावाहून शिरडीलाच जायचे आहे." आणि खरोखरच त्याने जी बैल-गाडी आणली होती त्यात १–२ बायका आपल्या लहान मुलांना घेवून बसल्या होत्या. आम्ही तिघही त्या बैलगाडीत बसलो व कोपरगावच्या एस. टी. बसस्टँडवर जावयास निघालो.

आता मात्र पाऊस थांबला होता. या मार्गावरच पुढे मोठा पुल व लेंदक नाला आहे त्या वरून मात्र पावसाच्या पाण्याचा लोंढा व पूर काही ओसरला नव्हता. पहिल्याच पुलावर खूप पाण्याचा लोंढा वाहात होता. तो पावसाच्या पाण्याचा मोठा पूरच म्हणावा लागेल कारण पाणी इतके होते की बैलगाडीचे चाक डुबेल. त्या पाण्याला जोरही खूप होता. आम्ही बैलगाडीत बसलेलो घाबरून गेलो. तो गाडीवाला आम्हाला सारखा धीर देत होता व म्हणत होता की, "आता पुल संपेलच, मग काही काळजी नाही."

शेवटी बैल पाण्याच्या जोरामुळे पुढे चालूच शकत नव्हते. आता मात्र तो बैलगाडीवाला खाली उतरला व आपल्या मुलास म्हणाला की, "तू बैलाचे कासरे धर, मी हाताने चाक पुढे ढकलतो." आम्ही सर्वच घाबरून गेलो व आमच्या जिवाचं आता काही बरे–वाईट होणार हे अगदी निश्चित होते. बैलांना पावले पुढे टाकताच येत नव्हते, इकडे बैलगाडीवाला बैलगाडीचे चाक हाताने पुढे ढकलीत होता.

कशीबशी आमची बैलगाडी त्या महापुरातून सुखरूप बाहेर आली. थोडा विचार केला ... त्या महापुरातून बैलगाडी जात असताना जर त्या बैलांचे पाय मुर-गळले असते तर... आम्ही सर्वजणच त्या पुरामधूनवाहात गेलो असतो व आमचा ठावठिकाणासुद्धा लागला नसता.

परंतु अगदी खरे का त्या बैलगाडीवानाच्या वेषात श्रीसाईबाबाच आले होते, व म्हणूनच आमचे त्या महापुरातून प्राण वाचले होते.

आम्ही सकाळी कोपरगाव शिरडी बसने शिरडीला आलो. रात्रभर मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकळीच उठलो व पूजाअर्चा–अभिषेक सर्वकाही यथासांग पार पाडले व प्रसाद घेवून आम्ही पुण्याला जाण्यास निघालो. रात्री ११ वाजता पुण्याला आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्र वाचले. त्यातील मजकूर "...कोपरगाव बसस्टॅण्ड पाण्यात, तेथील बेंचेस वाहून गेलेत–पुरामुळे झालेली हानि..." हे सगळे वाचत असताना डोळयात अश्रू दाटून येत होते व तो पुराचा प्रसंग डोळ्यासमोर येत होता.

खरोखरच श्रीसाईबाबांनीच शिरडीला येणाऱ्या आपल्या भक्तांस बैलगाडी-वानाचे रूप घेऊन महापुरातून वाचविले व जिवदान दिले.

पुढे श्रीसाईबाबांच्या आशिर्वादानेच आम्ही पंढरपूर तुळजापूर–शेगाव करीत नागपूरला सुखरूप आलो.

# ॥ माझे डॉक्टर श्रीसाई ॥

सौ. शालिनी जोशी
५५९/५ रेल्वे ऑफिसर कॉलनी,
बोईगुडा, सिकंदराबाद, आंध्र प्रदेश

● १९७६ सालची गोष्ट. माझ्या यजमानांची प्रकृति बरी नव्हती. डोक्याच्या भारीपणामुळे त्रास होता. डोक्याच्या जास्त ताणामुळे असे व्हायचे. डॉक्टरी औषध चालू होते. पण कधी कमी कधी जास्त राहायचे. या करता एकदा दुसऱ्या डॉक्टरला दाखविले. ते म्हणाले, नाकाचे हाड वाढले आहे. शस्त्रक्रिया करावी लागेल. मी व माझी तिन्ही मुले खूपच घाबरलो. मला तीन मुलं आहेत. चि. साधना वय १६ वर्षं, मुल्गा चि. नितिन १२ वर्षं व सर्वात लहान मुलगी अलका वय ११ वर्षं. मी मुलांना सांगितले की, साईबाबांचा जप रोज सर्वांनी करायचा व मी पण बाबांची मनोभावे करुणा भाकू लागले की बाबा ! यांच्या नाकाचे ऑपरेशन न झाले पाहिजे व रोज यांना नाकाच्या आत उदी लावायची व पाण्यातून प्यायची, असा क्रम चालू ठेविला शिवाय नाकाचे एक्स-रे वगैरे काढून डॉक्टरी औषधपण चालू ठेवले. जवळ जवळ पंधरा दिवसात पुन्हा डॉक्टरनी बोलविले व नाकाची पुन्हा तपासणी करून पुन्हा एक्स-रे घेण्यास सांगितले. दुसरा एक्स-रे पाहिल्यावर डॉक्टरनाच आश्चर्य वाटले की आता ऑपरेशनची जरुर नाही. जे डॉक्टर अगोदर ऑपरेशन करा म्हणत होते तेच डॉटकर आता ऑपरेशन नको म्हणू लागले याचे आम्हाला आश्चर्य वाटले. हे ऐकल्यावर माझे मन बाबांच्या कृतज्ञेने भरून आले व डोळयातून: अश्रू वाहू लागले. मुलांच्या आनंदाचा पारावार राहिला नाही. बाबांची ही उक्ती मला आठवली कि " जो जो मज जैसा जैसा भजे तैसा तैसा पावे मीही त्यासी "

## पुढील अंक जानेवारी १९७८

श्रीसाईलीलाचा हा अंक नव्हेंबर–डिसेंबर १९७७ जोड अंक असल्याने डिसेंबरचा वेगळा अंक प्रसिद्ध होणार नाही. पुढील अंक जानेवारी १९७८ त प्रकाशित होईल याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# शिरडी-वृत्त माहे ऑगस्ट सन १९७७

या महिन्यात अधिक श्रावण आल्यामुळे बाहेर गावचे साईभक्तांची श्रींच्य दर्शनासाठी गर्दी बरीच होती. दिनांक १४ व १५ ला तर एवढी गर्दी होती की, चावडी ते समाधी मंदिर अशा दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे :–

**किर्तन** :– १) संस्थान गवई काव्यतिर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. म. किसनराव रा. बोरावके सांगली ३) ह. भ. प. मारुती महाराज, बुलढाणा ४) ह. भ. प. रामदास महाराज बुलढाणा.

**प्रवचन** :– १) वेदरत्न श्री. वा. द. जोशी. चाळीसगाव यांचे अधिकमासा निमित्त एक आठवडा प्रवचन झाले. २ ह. भ. प. जाधव गुरूजी, शिर्डी ३) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी ४) सौ. ताराबाई देशपांडे पुणे.

**भजन** :– १) कु. विजया, कु. ललिता, कु. **काथी पीना (अमेरिकन** मुलगी) श्रीमती विनाम्मा व इतर साथीदार सत्यसाईबाबा पुट्टपार्थी भजन मंडळ यांनी एक आठवडा भजन केले. २) सौ. पंचफुलाबाई पुणेकर ३) के. कल्पवल्ली गुंटुर ४) ओम मिश्रा व भजन मंडळ, इंदूर ५) स्वामी विश्वनाथ, अयोध्या.
६) सौ.सीता लक्ष्मी सुंदरेशन, पुणे. ७) श्रीसाईबाबा भजन मंडळ, ऊल्हास नगर.
८) श्रीसाईनाथ महिला भजन मंडळ, शिर्डी.

सौ. इंदीराबाई का. पाठक, सौ शकुंतला रा. खोत, उषा प्र. मुळे, सौ. स्नेह-लता प्र. भाटे, सौ. प्रतिभा रा. ढुसे, सौ. प्रतिभा क. कुळकर्णी, सौ. मालती मृ. कोटस्थाने, सौ. लक्ष्मी, श्री वर्मा, सौ. कावेरी म. कोळपकर सौ. सुशीला गुजराथी.

**गायन, वादन, नृत्य-प्रयोग वगैरे** :– १) श्री. चंद्रशेखर म. देशपांडे, पुणे २) श्री. शिवाजी शं कालेकर यांनी आपले साथीदारासह कसरतीचे व जादूचे प्रयोग केले. २) श्री. भानुदास शि. गुजराथी, शिर्डी. ४) श्री. विनायक कृ. देशपांडे, कोल्हापूर ५) श्री. शंकर रा. देशपांडे, कोपरगाव ६) श्री. रमेश रा. धमा व पार्टी, मुंबई. ९ श्री. श्यामसुंदर भेडा व पार्टीचे गायन, सनई वादन वगैरे कार्यक्रम झाले.

**स्वराज्य प्रातिदिन** :– सोमवार १५ ऑगस्ट १९७७ रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तर्फे कोर्ट रिसीव्हर मा. श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे शुभ हस्ते प्रति वर्षा-प्रमाणे ध्वज वंदनाचा कार्यक्रम, श्रींचे मंदिरावरील कळसाजवळ झाला. कार्यक्रमास

संस्थान कर्मचारी, श्रीसाईनाथ हायस्कूल बॅण्ड पथक, शिक्षक वर्ग, होमगार्डस, विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्रतिष्ठीत, साईभक्त, पाहुणे मंडळी उपस्थीत होती. त्यांना चहा पान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्री समाधिमंदिर कळसावर रोषणाई करण्यात आली होती.

**माननीयांच्या भेटी :–**

१) मा. श्री. एकनाथराव निंबाळकर राज्यमंत्री, मध्यम व मोठे पाठबंधारे महाराष्ट्र
२) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.
३) मा. श्री. विजयसिंगराव ठाकूर IAS जिल्हाधिकारी, बीड.
४) मा. श्री. रामनाथराव वाघ, जिल्हा परिषद अध्यक्ष जि. अहमदनगर.
५) मा. श्री. जंबुनाथ IAS ट्रान्सपोर्ट कमिशनर, महाराष्ट्रराज्य
६) मा. श्री. केशवयल्लू खादी ग्रामोद्योग मंत्री आंध्रप्रदेश.
७) मा. श्री. मोडक, पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्रराज्य.
८) मा. श्री. आय. जे. नायडू IAS सेक्रेटरी प्लॅनिंग डिपार्टमेंट सें. गव्हर्नमेंट
९) मा. श्री. बागची IAS असि. कलेक्टर अहमदनगर.
१०) मा. श्री. काणेकर जज्ज, श्रीरामपूर.

**हवापाःणी :–** शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## श्रीसाईलीला

**लेखक – कवी चतुर्थ स्नेहसंमेलन १९७८**

**जानेवारी ऐवजी फेब्रुवारीत शिर्डीत थाटात साजरे होणार**

**विशेष माहिती जानेवारीच्या अंकात वाचा.**

# शिरडी-वृत्त माहे सप्टेंबर सन १९७७

या महिन्यात बाहेरगावचे साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली ती खालीनप्रमाणे :–

**कीर्तन** :– १) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी प्रमाणे एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. कपिलेश्वर आ. सोनवणे, आळंदी.
२) वे. शा. सं. श्री. दिवाकर पु. भालेराव. शिर्डी.
३) ह. भ. प. लक्ष्मण म. रणदिवे, दादर मुंबई.

**गायन, वादन, भजन वगैरे** :– श्रीसाई शिरडी भजन मंडळ, १) श्री. ज्ञानेश्वर वैद्य २) श्री. विठ्ठलराव मांजरेकर ३) श्री. दत्तोबा गुरव, शिर्डी.
४) श्री. भगवतीप्रसाद चर्तुवेदी. मुंबई ५) सौ. अलका भा. रिसवडकर, अंधेरी मुंबई.
६) श्री. चिदानंद सि. जाधव व पार्टी, सोलापूर ७) ह. भ. प. सखाराम गावडे, गंगापूर ८) श्री. बंडोपंत सोलापूरकर, ९) श्री. वसंतराव देवळणकर, श्री. दिनकर पांडे पुणे यांचे साथीदारासह क्लॅरनेट, सनई, तबला वादन कार्यक्रम झाले.
१०) श्री. गजानन ताडे, खैरागड म. प्र. ११) श्री. नूतन बाळगोपाळ विद्यार्थी बॅण्ड पथक मुंबई ११. १२) श्री. लक्ष्मण बा. मालुसरे, कुलाबा १३) श्री. भगवती साई संस्थान कुर्ला मुंबई १४) श्री. भगवतीप्रसाद चर्तुवेदी मालाड मुंबई. १५) श्री. विनायक द. नगरकर, औरंगाबाद. १६) स्वामी रामानंद, बेळगाव. १७) श्री. एम. धनसिंग स्वामी, खडकी पुणे. १८) कु. मंगला विधाते व गायन पार्टी कोल्हापूर. १९) श्रीमती राणी रूपलता, श्री. . प्रल्हाद शिंदे व पार्टी मुंबई नं. ९. २०) श्री. प्रभाकर करंदीकर, पर्वती पुणे व पैंजणात गुंतला कविराज पार्टीचे कलाकार पुणे. २१) नाट्य रसिक संच शिर्डी निर्माते श्री. भास्करराव गोंदकर. संचालक शाम मिराणे व पार्टी, शिर्डी २२) सुनहरी यादे, प्रमिला दातार ब पार्टी मुंबई. २३) व्हीनस म्युझिकल नाईट ऑर्केस्ट्रा, अहमदनगर, संचालक श्री. गोपाळराव देवचक्के, अहमद नगर.

**श्रीकृष्ण जयंती** :– सोमवार दि. ५-९-७७ रोजी नित्याचे कार्यक्रम झाल्यावर रात्री ७-३० ते १० वाजे पर्यंत श्री. बंडोपंत सोलापूरकर पुणे याचे क्लॅरनेट वादन. श्री. वसंतराव देवळणकर यांचे सनई वादन व श्री .पांडे यांचे तबला वादन कार्यक्रम झाले. १० ते १२ वाजे पर्यंत संस्थान गवई श्री. ग.वि. जोशी शास्त्री यांनी

श्रीकृष्ण जन्म कीर्तन केले. त्यानंतर शेजारती होऊन सर्वांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुसरे दिवशी गोपालकाला, कीर्तन, दही हंडी कार्यक्रम झाल्यावर रात्री श्रींच्या रथाची मिरवणूक फिरून आली.

**माननीयांच्या भेटी :–**

१) मा. श्री. नरेंद्र तिडके, अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी.
२) मा. श्री. बी, के. चौगुले IAS सेक्रेटरी मुख्यमंत्री कार्यालय मुंबई.
३) मा. श्री. आर. डी. दैठणकर IAS जिल्हाधिकारी, धुळे.
४) मा. श्री. शिवाजीराव पाटील RDC अहमदनगर.
५) मा. श्री. दुल्ला IAS.
६) मा. श्री. खुळे जिल्हा न्यायाधिश व सन्माननिय जज्ज अ. नगर.

**हवापाणी :–** शिरडी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.


श्रीसाईनाथ रोजनिशी १९७८

श्रीबाबांच्यासंबंधीची व शिरडीसंबंधीची भरपूर माहिती.

श्रीसाईबाबांच्या आरत्या.

मुखपृष्ठावर श्रीबाबांचे मोहक चित्र

नूतन वर्षादिनी श्रीसाईभक्तांची वर्षभर सेवा करण्यासाठी

अत्यंत आकर्षक स्वरूपात येत आहे.